कोणीही केल्या माझे कीर्तन।
तयासी देईन आनंदघन।
नित्य सौख्य समाधान।
सत्य वचन मानावे ॥१४॥

जो मजलागी अनन्य शरण।
विश्वास युक्त करी मद्भजन।
माझे चिंतन माझे स्मरण।
तयाचे उद्धरण ब्रीद माझे ॥१५॥

माझे नांव माझी भक्ती।
माझे दप्तर माझी पोथी।
माझे ध्यान अक्षय चित्ती।
विषय स्फूर्ति कैसी त्या ॥१६॥

कृतांताच्या दाढेतुन।
काढीन मी निजभक्ता ओढुन।
करिता केवळ मत्कथाश्रवण।
रोग निरसन होईल ॥१७॥

कथा करा सादर श्रवण।
त्यावरी करा पूर्ण मनन।
मननावरी निदिध्यासन।
समाधान पावाल ॥१८॥

अहं सोहं जाईल विरोन।
उन्मन होईल श्रोतियांचे मन।
चित्त होईल चैतन्य घन।
अनन्य परीपूर्ण श्रद्धेने ॥१९॥

''साईसाईति'' नामस्मरण।
करील सकल कलिमल दहन।
वाणी श्रवणगत पापभंजन।
एक लोटांगण घालिता'' ॥२०॥

### पार्श्वभूमी

**या**नंतरचा श्री. अण्णासाहेब (दाभोलकर) यांचा स्वत:चे बाबतीत आलेला अनुभव फार ऐकण्यासारखा आहे. १९१६ मध्ये श्री. अण्णासाहेबांनी सरकारी नोकरी पुरी केली व ते पेन्शनर बनले. त्यावेळी ते शिरडीस श्री साईबाबांच्या दर्शनास गेले. तो गुरुपौर्णिमेचा दिवस होता व त्याचवेळी त्यांचे स्नेही मोठे साईभक्त श्री. अण्णासाहेब चिंचणीकरही साईदर्शनार्थ शिरडीत आले होते. त्यांना श्री. दाभोलकरांच्या आर्थिक परिस्थितीची चांगली जाण होती व पेन्शनमध्ये संसाराच्या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडणे हे श्री. अण्णासाहेब दाभोलकरांना फार कठीण जाणार होते हे श्री. चिंचणीकरांना अवगत होते. बाबांशी सलगीने बोलण्याचा साईभक्तीपोटी त्यांना अधिकार प्राप्त झाला होता. त्यांना श्री. अण्णासाहेबांची दया आली व त्यांच्याशी आगाऊ काहीही चर्चा न करता, श्री. चिंचणीकरांनी मोठ्या अदबीने, अजीजी करीत, शिफारसवजा बाबांना विनवणी केली की, बाबांनी श्री. अण्णासाहेबांची चिंता निवारावी व त्यांना एखादी चांगली नोकरी लावून द्यावी. त्यावर श्री साईनाथ काय म्हणाले ते ऐका :

''मिळेल मेली तयासी नोकरी।
करावी आता माझी चाकरी।
सुख संसारी लाभेल ॥७६॥

ताटे याची भरली सदा।
यावज्जीव न रिती कदा।
भावे मत्पर होता सर्वदा।
हरतील आपदा तयाच्या ॥७७॥

काही केले काय झाले।
म्हणती जन ते समजा चळले।
धर्माचरण जयांनी वर्जिले।
तयास पहिले वर्जावे ॥७८॥

समोर येता बाजूस जावे।
महाभयंकर ते समजावे।
त्यांच्या छायेसही न राहावे।
पडल्या सहावे कष्टही ॥७९॥

आचारहीन शीलभ्रष्ट।
विचारहीन कर्मनष्ट।
देखेना जो इष्टानिष्ट।
केवी तो अभिष्ट पावेल ॥८०॥

लाग्याबांध्याविण विशेषी।
कोणी नये आपुले पाशी।
श्वास सुकर का माशी।
हडहड कुणासी करू नये ॥८१॥

येथून पुढे भक्तिभावा।
करावी याने माझी सेवा।
करूणा येईल देवाधिदेवा।
अक्षय ठेवा लाभेल ॥८२॥

मग ही पूजा करावी कैसी।
मी कोण कैसा जाणावा भरवंसी।
साईचा तो देह विनाशी।
ब्रह्म अविनाशी सुपूज्य ॥८३॥

मी तो अष्टधा-प्रकृतीरूपाने।
भरलो आहे चौबाजूने।

हे चि अर्जुनासी भगवंताने ।
गीता व्याख्याने निवेदिले ॥८४॥

यावन्नाम रूपाकृती ।
स्थावर जंगमात्मकही जगती ।
मीचि नटलो अष्टधा प्रकृती ।
ही एक चमत्कृती माझीच ॥८५॥

ॐ प्रणव हा माझा वाचक ।
वाच्य तयाचा मीचि एक ।
विश्वाकार वस्तु अनेक ।
त्यांतही मी एक भरलेला ॥८६॥

आत्मभिन्न वस्तू नाही ।
तेथ कामना कशाची पाही ।
मीचि अवघा ठायीठायी ।
भरलो दाही दिशांती ॥८७॥

परीपूर्ण सर्वत्र एणे भावे ।
मी माझे हे जिथे विरावे ।
तया कामनीय काय असावे ।
सर्वी वसावे सर्वस्वी ॥८८॥

कामना या बुद्धीत उगवती ।
आत्मयासी संबंध न धरिती ।
साई महाराज निजात्ममूर्ती ।
कामनास्फूर्ती येथे कैची ॥८९॥

कामनांचे नाना प्रकार ।
मी कोण हे कळतांची सार ।
विरोनि जाती जैसी गार ।
रविकर निकर संतप्त ॥९०॥

मनबुद्ध्यादि इंद्रिया सकट ।
नव्हे मी स्थूल विराट ।
नव्हे मी हिरण्यगर्भ अप्रकट ।
साक्षी मी जुनाट अनादि ॥९१॥

एवंगुण इंद्रिया परता ।
नाही मन विषय तत्परता ।
नाही मजविण ठाव रिता ।
कर्ता करविता मी नव्हे ॥९२॥

मनबुद्ध्यादि इंद्रियगण ।
अवघा जड ही जेथे ओळखण ।
तेथेचि विरक्ति प्रगटेल जाण ।
सारील आवरण ज्ञानाचे ॥९३॥

स्वरूपाचे जे विस्मरण ।
तेचि मायेचे अवतरण ।
शुद्ध पूर्णानंद स्मरण ।
तोचि मी चैतन्य घनरूप ॥९४॥

त्या मजकडे फिरविणे वृत्ति ।
तीच सेवा तीच मद्‌भक्ति ।
चिदानंद मी होता प्रतीती ।
शुद्ध स्थिती ते ज्ञान ॥९५॥

आयमात्मा ब्रहम ।
अज्ञानमानंद ब्रह्म ।
जगन् मिथ्यत्वे जगद्‌भ्रम ।
सत्यत्वें ब्रह्म तो हा मी ॥९६॥

नित्य शुद्ध बुद्ध मुक्त ।
वासुदेवोऽहमोमन्वित ।
सत्य श्रद्धा भक्तिसहित ।
पूजन स्वहित ते माझे ॥९७॥

ऐसे ते मी कोण समजून ।
करावे माझे यथार्थ पूजन ।
वरी व्हावे अनन्य शरण ।
जावे समरसून मज माजी ॥९८॥

नदी जाता समुद्राशरण ।
येईल का ती पुन्हा परतोन ।
उरेल का वेगळे नदीपण ।
देता आलिंगन अर्णवा ॥९९॥

स्नेहयुक्त कार्पास वाती ।
भेटू जाता दीपक ज्योती ।
स्वये पावे दिव्य दीप्ती ।
तैसिचि गती संतपदी ॥१००॥

अल्लामालिक चैतन्यघन ।
यावीण चित्ता नाही चिंतन ।
शांत निरपेक्ष समदर्शन ।
तयाचे मीपण तैं कैंचे ॥१०१॥

निर्ममत्व निरहंकृती ।
निर्द्वंद्वत्व निष्परिग्रह स्थिती ।
याही चार गुणांची जैं वस्ती ।
मीपण स्थिती तैं कैची ॥१०२॥

तात्पर्य हे आठही गुण ।
साई अंगी असता संपूर्ण ।
मीपणासि तैं कैसे स्थान ।
सरे मीपण तैं कैसे ॥१०३॥

विश्वी भरले जयाचे मीपण ।
तयाचाचि अंश माझेही मीपण ।

करावे साईपदी समर्पण।
हीच संपूर्ण ममसेवा ॥१०४॥

माझी सेवा माझे भजन।
अनन्यपणे मजसी शरण।
तो होय मद्रूप जाण।
भगवंत वचन भागवती ॥१०५॥

कीटकासही भ्रमरध्यान।
तेणे ती लाधे भ्रमरपण।
शिष्यही करिता निजगुरुभजन।
निजगुरु समान तो होय ॥१०६॥

समान शब्दे जे वेगळेपण।
तेही न साहे गुरु एक क्षण।
गुरुत्व नव्हे शिष्यावीण।
शिष्यत्वा अभिन्न गुरुपण'' ॥१०७॥



पार्श्वभूमी

पुढे एकदा शिरडीत एक रोहिला आला व तो बाबांच्या अगाध लीला व गुण पाहून बाबांकडे मोहित झाला. प्रेमाने बाबांची सेवा करू लागला. तो अगोदरच माथेफिरू होता व बाबांच्या पाठिंब्याने फारच मदोन्मस्त, चढेल व ताठर झाला. रात्रंदिवस तो मशिदीत व चावडीत मोठमोठ्याने नमाज पढू लागला. त्यामुळे लोकांची झोप पार उडाली व त्यांना फार त्रास होऊ लागला; दिवसभर शेतात व रानात लोकांनी राबराब राबावे व रात्री या रोहिल्याने त्यांची झोप उडवावी. म्हणून लोक रोहिल्यावर उलटले व त्यांनी त्याच्याबद्दल बाबांकडे तक्रार केली. बाबांना हे सारे कळत नव्हते असे थोडेच होते; तरीपण बाबा रोहिल्यास पाठीशी घालून त्याचे समर्थन करीत होते. का व कसे त्याचे इंगित बाबांच्याच शब्दांत ऐका :

''नका सताऊ रोहिल्याप्रती।
तो मज अतीप्रिय वाटे ॥११९॥

या रोहिल्याची बाईल घरघुशी।
नांदून घरे तयापाशी।
यावया ती टोके मजपाशी।
चुकवूनि त्यासी ते विवशी ॥१२०॥

नाही रांडेला पदरपोशी।
लाजलज्या लाविली वेशी।
हाकूनि बाहेर लावला तिजसी।
बलात्कारिसीं घर घुसे ॥१२१॥

ओरडू थांबे तेचि संधी।
शिरू पाहे रांड दुर्बुद्धी।
तो ओरडतां ती पळे त्रिशुद्धी।
सुखसमृद्धी मज तेणे ॥१२२॥

जावे न कोणी त्याच्या वाटे।
ओरडू द्या मुक्तकंठे।
तयाविण मज रात्र न कंठे।
सौख्य मोठे त्याचेनी ॥१२३॥

याची ही ओरड एणेपरी।
आहे मज बहू हितकारी।
ऐसा हा रोहिला परोपकारी।
बहु सुखकारी मजलागी ॥१२४॥

ओरडू द्या त्यासी यथेष्ट।
त्यांतचि आहे माझे इष्ट।
नातरी ती रोहिली दुष्ट।
देईल कष्ट मजलागी ॥१२५॥

स्वयेचि मग जै थकेल।
आपोआप स्वस्थ राहील।
कार्यभाग तुमचा साधेल।
मजही न बाजेल ती रांड'' ॥१२६॥

**पार्श्वभूमी**

**त्या** रोहिल्याबद्दलचा वरील आदेश ऐकून शिरडीवासी अचंब्यात पडले. त्यांना वाटे, बाबा केवढे क्षमासंपन्न आहेत. ज्या रोहिल्याच्या ओरडाओरडीमुळे लोकांची डोकी फुटण्याची वेळ आली, ती बाबांना प्रिय झाली !! रोहिल्याच्या घशाला कोरड तरी कशी पडत नाही याचे लोकांना आश्चर्य वाटे. रोहिल्याचा ''अल्ला हो अकबर'' हा पुकार बाबांना फार आवडे. कारण त्यायोगे तो देवाचे नामस्मरण करीत होता व तशा स्थितीत तो आनंदनिर्भर राही. याउलट हरिनामाचा कंटाळा असे अशांचा विटाळही बाबांना सहन होत नसे. बाबांना ब्राह्मण का पठाण हा फरक माहीतच नव्हता. याच संदर्भात बाबांच्या मुखावाटे जी मधुर वचनावली निघाली ती ऐका :

**''कुठेही असा, काहीही करा ।**
**एवढे पूर्ण सदैव स्मरा ।**
**कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा ।**
**मज निरंतरा लागती ॥१४३॥**

**येणें निदर्शित ऐसा जो मी ।**
**तोचि मी सर्वांच्या अंतर्यामी ।**
**तोचि मी ह्रुदयस्थ सर्व गामी ।**
**असे मी स्वामी सकळांचा ॥१४४॥**

**भूती सबाह्याभ्यांतरी ।**
**भरोनि उरलो मी बराबरी ।**
**हे सकळ सूत्र ईश्वरी ।**
**सूत्रधारी मी त्याचा ॥१४५॥**

**मी सकळ भूतांची माता ।**
**मी त्रिगुणाची साम्यावस्था ।**
**मीचि सकलेंद्रिय प्रवर्ता ।**
**कर्ता धर्ता संहर्ता ॥१४६॥**

**लक्ष लावी जो मजकडे ।**
**नाही तयासी कैसेही साकडे ।**
**तोचि माझा जैं विसर पडे ।**
**माया कोरडी उडवी तैं ॥१४७॥**

**दृश्यजात हे मत्स्वरुप ।**
**कीड मुंगी रंक भूप ।**
**हे स्थिर जंगम विश्व अमूप ।**
**हेचि निजरुप बाबांचे''**

■■

# साई माझा राम

साई माझा राम
शिरडी माझे धाम

तव दर्शनाने मिळते समाधान
तयास करीतो आम्ही भक्तगण वंदन

साई तू आमुची माऊली
साई लाभे हर भक्ता तुझी साऊली

साई ठेव आशीष तव भक्ता
निरसन होती सर्व भयरोग व्याथी चिंता

साई ऐक रे साद या भक्ताची
रक्षण नित्य करशील आमचे मायबापावाणी

साई तुझ्या आशीषाने जीवन आमचे घडवावे
साई तुझ्या चरणधुळीने जीवन आमचे फुलवावे

साई तुझ्या अर्चनेने संकट निरसावे
तव भक्तीची पुण्याई आम्हा लेकरा लाभू दे

साई तुझ्या नामस्मरणाने जीवन प्रसन्न व्हावे
तव आधारे या जन्मी यशस्वी जीवन लाभावे

साई साध्य करी आपुल्या भक्तांचे मनोरथ
श्रद्धा आणि सबुरीने जीवन आम्ही घडवावे

तुझ्या आशीर्वादाने मिळावे
भक्ता उदंड आयुष्य सुखासमाधाने

साई तू मायमाऊली आम्हा अजाण भक्तांची
सदैव छत्र धरावे ही आस मनीची सर्व साईभक्तांची


म्हणून म्हणावे सर्व भक्तांनी ''ओम साई ओम साई
ओम साई ओम साई राम ॥''

■ **दर्शना औदुंबर तोरस्कर,**
परेल, मुंबई.

# श्री साईनाथांच्या अनुग्रहाची कथा

- सौ. उषा गोडकर

श्री साईसचरित्रांत अण्णासाहेब दाभोलकर २७ व्या अध्यायात म्हणतात, "बाबा ज्या भक्तांवर प्रसन्न होत त्यांच्यावर ते स्वतःहून अनुग्रह करीत. दीक्षा देण्याचे तर त्यांचे अनंत प्रकार होते. कुणाला भागवत; तर कुणाला रामायण; तर कुणाला महाभारताचे पठण करायला सांगत. माधवरावांसारख्या अत्यंत निकटच्या भक्तास त्यांनी विष्णुसहस्त्रनामाची माला स्वहस्ताने गळ्यात घातली होती.



अशाच प्रकारचा अनुग्रह बाबांनी माझ्यावर केल्याची प्रचिती मला आली, ती मी थोडक्यात सांगू इच्छिते.

आईवडिलोपार्जित साईभक्तीचा अनमोल वारसा मला लाभल्याने गेली ४० वर्षे प्रत्येक सुखदुःखात अखंड साईस्मरणाची माला आमच्या घरी-दारी जपली जात आहे, अनेक वेळा शिरडीची वारी घडत आहे.

६ महिन्यांपूर्वी शिरडीस जाण्याचा योग आला. श्रींच्या दर्शनाची मुराद पुरी होताच संस्थानच्या पुस्तकविक्री केंद्राकडे वळले. मैत्रिणीने एक पुस्तक आणावयास सांगितले होते, पण नाव आठवत नसल्याने मी पुस्तकविक्रेत्यास संस्थानतर्फे प्रसिद्ध होणारी सर्व पुस्तके दाखविण्यास सांगितले. त्यांनी काही पुस्तके समोर ठेवली, त्यात नेमके श्री विष्णुचे वरदनारायणाचे मुखपृष्ठ असलेले विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र हे पुस्तक समोर आले. हेमाडपंतलिखित साई सच्चरित्रांत या विष्णुसहस्त्र नामस्तोत्राची बाबांनी स्वतः गायलेली महती वाचलेली असल्याने मला त्याविषयी फार कुतुहल होते. म्हणून मी ताबडतोब ते विकत घेतले. येथेच बाबांच्या माझ्यावरील अनुग्रहाला सुरुवात झाली. घरी आल्यावर स्तोत्र वाचून पाहू लागले. जरी रोज अथर्वशीर्ष, कधीकधी गीतेचा १५ वा अध्याय यांचे पठण करीत असले तरीही यातील श्लोक थोडे कठीण वाटले. परंतु "ओजे ओजे वाचीत जाई। रोज एखादे अक्षर घेई, आनंददाई ही मोठी" या बाबांनी माधवरावांना विष्णुसहस्त्रनाम-स्तोत्र देताना केलेल्या उपदेशानुसार रोज दोन श्लोक म्हणत हळूहळू पूर्ण स्तोत्र वाचू लागले. तरीही कांही उच्चार, विसर्ग यांचा गोंधळ मनात होत होता. पण परमेश्वर आपल्या सत्कृत्यात नेहमीच सहाय्य करीत असतो, हे नक्की. कारण त्यानंतर एकदा दादरला श्री अक्कलकोट स्वामी समर्थांच्या मठात दर्शनाला गेले असता, दर्शनाहून बाहेर पडले आणि बाहेरच्या दुकानदाराकडे स्वामींच्या भजनाच्या कॅसेटस् पहात असता दुकानदाराने आपणहून एम्. एस्. सुब्बलक्ष्मीच्या आवाजातील विष्णुसहस्त्रनामस्तोत्राची कॅसेट पुढे ठेवली. मी अत्यानंदाने ती उचलली. श्री साईनाथांच्या संकेतानुसार मी विष्णुसहस्त्रनाम स्तोत्राचे धडे गिरविण्याचा प्रयत्न करताच श्री स्वामी समर्थांनी त्यास सहाय्य करावे असाच महा चमत्कार मला वाटला.

अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने गोड आवाजात म्हटलेली ती कॅसेट मला फारच मार्गदर्शक ठरली. रोज सातत्याने ती टेपरेकॉर्डर लावून स्तोत्र म्हणण्याचा मी सराव करू लागले. मनाला अपरिमित आनंद होऊ लागला. घरातील वातावरणात मंगलमय, प्रसन्न लहरी खेळू लागल्या.

असे थोडे दिवस गेले. आणि एक अत्यंत आनंददायी घटना


घडली एके दिवशी दुपारी जेवण वगैरे आटोपून मी लवंडले असता स्वप्नात घराच्या दारात हातात मुरली घेतलेली कृश, सावळी श्रीकृष्णाची अस्पष्ट आकृती दिसली. दुसऱ्याच क्षणी अखंड पायापर्यंत फुलांच्या माळा घातलेला वनमाली कृष्ण माझ्या अगदी निकट येऊन उभा राहिलेला मी पाहिला. त्या देखण्या मनोहर रुपड्याकडे भान हरपून मी पहातेय तोच जाग आली. काही सेकंदच स्वप्नात झालेल्या त्या अप्रतिम दर्शनाने मी इतकी मोहित झाले की, जाग आल्यावरही खूप वेळपर्यंत ते दृश्य नजरेसमोरून जाईना. एखाद्या अमूल्य खजिन्याप्रमाणे ते स्वप्न मी माझ्या हृदयाच्या कप्प्यात अगदी जपून ठेऊन दिले.

या घटनेला २-३ आठवडे लोटले, आणि मी आमच्या भजनी मंडळातील एका भगिनीकडे काही कामास्तव गेले असता तिने नुकतीच विकत आणलेली हातात मुरली घेतलेली ४ ते ५ इंच उंचीची श्रीकृष्णाची ब्रॉन्झची मूर्ती दाखविली. ती मूर्ती पाहून मी चकित झाले. कारण मी स्वप्नांत दारात उभी असलेली श्रीकृष्णाची काळीसावळी मूर्ती पाहिली होती तिच्यात आणि हिच्यात विलक्षण साम्य होते. माझ्या आश्चर्यचकित चेहऱ्याकडे पाहून मैत्रिण म्हणाली, ''माझ्या मामी औरंगाबादला गेल्या होत्या, तेथूनच त्यांनी ही मूर्ती आणली. आणखी एक त्यांच्याकडे शिल्लक आहे, तुला हवी असल्यास मी मागवते.'' अर्थात मी मोठ्या कौतुकाने ती मूर्ती घरी आणून पूजेला लावली.

आता इथे बाबांचा चमत्कार पहा. श्रीकृष्णाची मूर्ती माझ्या घरी आली, औरंगाबादहून, जेथील धूपखेडे येथे बाबा प्रथम अवतरले होते. मूर्ती ज्यांनी आणली त्या मामी श्री कलावती आईंच्या निस्सीम भक्त, आणि कलावती आईंचे आराध्य दैवत श्रीकृष्ण! आहे की नाही अपूर्व चमत्कार! असे चमत्कार आपल्याभोवती सतत घडत असतात, फक्त ते ओळखण्याची दृष्टी ठेवली पाहिजे.

आता रोज सायंकाळी तिन्हीसांजेच्या वेळी बाबांच्या तसबिरीसमोर उभे राहून तो वनमाली मुरलीधर माझे विष्णुसहस्त्रनास्तोत्र पठण ऐकत असतो.

हातात मुरली घेऊन, एक पाय तिरका ठेऊन उभ्या असलेल्या या श्यामसुंदरात आणि लेंडीवर जाताना वाटेत आपल्या भक्तांसमवेत भिंतीला एक पाय तिरका ठेऊन उभ्या असलेल्या साईनाथांच्या पायाच्या ठेवणीमध्ये मला फार साम्य वाटते.



साईभक्तहो, मी सांगितलेल्या माझ्या आयुष्यातील ह्या घटना केवळ योगायोगाने घडल्या असतील असे मला वाटत नाही. या साऱ्यांच्या मागील सूत्रधार केवळ माझे सद्गुरु साईनाथच होते!

श्री बाबांच्या सहवासात त्यांचा अनुग्रह लाभलेल्या त्या थोर साईभक्तांच्या पासंगालाही उभे रहाण्याची माझी क्षमता नाही. पण सद्गुरु हा केवळ भोळ्या भक्तिभावाला भुलणारा असतो, मग तो काळ ते सदेह असतानाचा असो की समाधीनंतरचा असो! आपण आपल्या सद्गुरूवर निस्सीम प्रेम करायचे आणि बदल्यात तो जे काही भरभरून देईल ते घेण्यासाठी पदर पसरायचा एवढेच आम्हाला ठाऊक!

आज बाबांनी माझ्या पदरांत घातलेली विष्णु सहस्त्रनामस्तोत्राची दीक्षा माझे जीवन समृद्ध बनवित आहे.

हे साईसद्गुरुराया, तू दिलेल्या या दीक्षेचे माझ्याकडून आमरण पालन होवो आणि इतरांनाही त्याचा लळा लावण्याचे सामर्थ्य मला लाभो, हीच तुझ्या पवित्र चरणी प्रार्थना!

ooo

बोध कथा

# मंतरलेले घर

- ह. ल. रानडे, सातारा.

गणेशराव सुरुवातीला शाळामास्तरच, पण त्यात मिळकत फारच तुटपुंजी म्हणून मुळीच रमले नाहीत. मिळकत वाढविण्यासाठी काय करावे, याची चर्चा मित्राबरोबर करत असताना मित्राने व्यापारी पेढी भागीदारीमध्ये काढण्याची सूचना केली व त्या पेढीत भागीदार म्हणून सामील होण्याची तयारीपण त्याने दर्शविली. प्रत्येकाने थोडे थोडे भांडवल जमा केले, थोडे बँकेकडून कर्ज काढले व पेठेत छोटीशी जागा भाड्याने घेऊन पेढी काढली. पेढी जर व्यवस्थित चालायला व टिकायला पाहिजे असेल तर त्यामध्ये स्वतः खूप कष्ट करण्याची तयारी, प्रामाणिकपणा, चिकाटी, माणसे जोडण्याची कला या गुणांची अत्यंत जरूरी आहे, हे दोघांनाही पटले असल्यामुळे त्यांनी प्रथमपासूनच ती पथ्ये पाळण्याचे ठरविले. पेढीसाठी त्यांनी प्रथम साखर, रवा, मैदा, खोबरे, खोबरेल तेल अशा काही वस्तू घाऊक दराने घेऊन किरकोळ दराने विकण्याचे ठरविले. गिऱ्हाईक जोडण्यासाठी म्हणून प्रथम त्यांनी त्यात अगदी बेताचा नफा घेण्याचे ठरवले. त्यामुळे गिऱ्हाईक तर वाढलेच, पण मालाचा जास्त उठाव होऊ लागल्यामुळे नफापण वाढू लागला. शिवाय गिऱ्हाईकांना माल देणे, हिशेब ठेवणे वगैरे कामासाठी त्यांनी नोकर न ठेवल्यामुळे व स्वतःच सर्व काम करण्याचे ठरविले असल्यामुळे त्यांचा तो खर्चही वाचत असे. वर्षअखेर हिशेब केला असता त्यांना भागीदारीमध्ये अपेक्षेइतका नफा झाला; म्हणून हा धंदा आणखी वाढवावा किंवा कसे याबद्दल त्यांचा विचार सुरू झाला. पण हा धंदा वाढवावयाचा तर त्याला माल ठेवण्यासाठी मोठी जागा घ्यावयास हवी होती. तशी मोठी जागा पेठेत मिळणे शक्य नसल्यामुळे त्यांनी त्या जागेत दुसरा व्यवसाय करण्याचे ठरविले.

चांदीचा धंदा सुरू केला तर त्याला फार मोठी जागा लागणार नाही असे वाटल्यावरून गणेशरावांनी चांदीची भांडी, खेड्यात लागणारे चांदीचे दागिने वगैरे वस्तूंची विक्री पेढीतर्फे करण्याचे ठरविले. व्यापाराची थोडीफार माहिती झालेली असल्यामुळे व पूर्वीचा माहीतगार भागीदार मिळाला असल्यामुळे त्यांना तो व्यवसाय सुरू करण्यास काहीच अडचण पडली नाही. नजिकच्या मोठ्या शहरातून भांडवल असेल त्या प्रमाणात थोडीथोडी भांडी आणायची व ती किरकोळ भावाने विकायची असा धंदा त्यांनी सुरू केला. भांडी खरेदी करताना ती तयार करण्यासाठी लागणारी मजुरी अत्यल्प व सरसकट प्रमाणात असल्यामुळे, पण गिऱ्हाईकांकडून भांड्यांच्या निरनिराळ्या प्रकाराप्रमाणे ते मजुरी घेत असल्यामुळे त्या धंद्यात त्यांना प्रथमपासूनच चांगला फायदा होऊ लागला. शिवाय पूर्वसंस्कारामुळे धंद्यात संपूर्ण सचोटी ठेवल्यामुळे व गिऱ्हाईक आकर्षित करण्याची कला त्यांना चांगलीच अवगत झाली असल्यामुळे त्यांना माल खपण्याची कधीच फिकीर पडली नाही. चांदीच्या धंद्याचा जम बसल्यावर गणेशराव व त्यांचे भागीदार यांचा आत्मविश्वास खूपच वाढला आणि म्हणून त्यांनी हळूहळू सोन्याचे दागिने, सोने वगैरे विक्रीसाठी ठेवण्यास प्रारंभ केला. सोन्याचा भाव बराच असल्यामुळे ते खरेदी करताना आपणास सराफ फसविणार तर नाही ना अशी सर्वसाधारण शंका गिऱ्हाईकांच्या मनात डोकावते. पण त्याबाबत त्यांच्या पेढीने खूपच काळजी घेतली होती. त्याबाबत त्यांच्या एका गिऱ्हाईकाशी संवाद झाला तो याप्रमाणे. एका गिऱ्हाईकाने त्यांना एकदा विचारले की, ''आम्ही तुमच्याकडून सोने अगर सोन्याचे दागिने घेतो, पण ते चोख सोन्याचे असल्याची गॅरेंटी काय? आम्ही तुमच्याकडे घेतलेले दागिने कधी मोडावयास आलो तर तुम्ही ते चोख सोन्याच्या भावाने घ्याल ना!'' गणेशरावांनी तत्पर उत्तर दिले, ''अलबत! आम्ही तुम्हाला तो भाव जर दिला नाही तर आम्ही तुम्हाला चोख सोने दिले नाही असाच त्याचा अर्थ होणार नाही का? आणि मग आमची पत ती काय रहाणार? मग सगळंच मुसळ केरात की? पण याबाबत तुम्ही हे लक्षात ठेवा की आम्ही आमचे सोने चोख भावाने घेऊ ही काही त्याची खरी कसोटी नव्हे. खरी कसोटी ही की तुम्ही आमचे दागिने मोडण्यासाठी कोणत्याही दुकानात जरी नेलेत तरी त्यानेसुद्धा तुम्हाला आम्ही देऊ तो चोख सोन्याचा भाव दिलाच पाहिजे. त्याने जर तो तसा दिला नाही तर आमचा अप्रामाणिकपणा आपोआपच सिद्ध झाला. सचोटीची, प्रामाणिकपणाची, चोखपणाची आणखी कसोटी ती कोणती?''

गणेशराव लौकिकार्थाने देव मानत नव्हते. पण या जगाचे व्यवस्थित व बिनचूक संचालन करणारी एखादी अदृश्य शक्ती निश्चित असली पाहिजे हे त्यांना मान्य होते. देवपूजा, देवदर्शन, यात्रा, व्रतवैकल्ये, नवससायास, उपासतापास यावर त्यांचा विश्वास नव्हता. पण हे जरी नसले तरी ते एक गोष्ट प्रामुख्याने मानत होते व ती म्हणजे माणसामधील परमेश्वर. त्यामुळे आपल्यापासून माणसाला दुःख होणार नाही याची खबरदारी ते घेत. त्यांच्या मते देवघरातील नैवेद्य न खाणाऱ्या देवाला तो देण्यापेक्षा तो जर भुकेलेल्या माणसाला दिला तर ते भगवंतास अधिक आवडेल. म्हणून तहानेलेल्याला पाणी, भुकेलेल्याला अन्न व उघड्या माणसाला कपडा दिला तर ती अदृश्य शक्ती चांगलीच सुखावेल व त्यामुळेच माणसाचे समाधान, शांती वाढेल. गरजूंना मदत करण्यासाठी म्हणून त्यांनी घरात एक दानपेटी ठेवली होती व त्यावर 'डोळस धर्मनिधी' अशी अक्षरे लिहिलेली होती. सणासुदीच्या दिवशी, जयंति, पुण्यतिथि या दिवशी, कोणाच्या वाढदिवशी, संकष्टी चतुर्थीच्या दिवशी किंवा एखादे काम यशस्वी

झालेल्या दिवशी हे गणेशराव त्या पेटीत काही रक्कम टाकत व त्या धर्मपेटीतून गरीबांसाठी अन्न, औषध, कपडे, शिक्षण वगैरेसाठी मदत करीत.

रंजल्यागांजलेल्यांना मदत करणे यावर गणेशरावांचा ज्याप्रमाणे कटाक्ष होता त्याप्रमाणे प्रत्येक माणसाने सतत कार्यमग्न असले पाहिजे यावर त्यांचा भर होता. त्यांच्या मते प्रत्येकाने आपल्या वाट्याला आलेले काम तक्रार न करता मनापासून, प्रामाणिकपणे व झटून केले तर असा माणूस पोटभर खातो, त्याचे आरोग्य चांगले रहाते व त्यास शांत झोपपण लागते. शिवाय असा माणूस लोकांना हवाहवासा वाटतो व त्यामुळे तो लोकादरास पात्र होतो. आपले कामच पूजेप्रमाणे केले तर ती ईश्वरोपासनाच होते म्हणून ''कर्मे ईशु भजावा'' या संतवचनाप्रमाणे ते स्वतः सतत कार्यमग्न असत व लोकांकडूनही त्याप्रमाणे अपेक्षा करीत.

गणेशराव व त्यांचे भागीदार यांनी सराफी धंद्यात प्रामाणिकपणे चांगली कमाई केली. परंतु Do not keep all your eggs in one basket या न्यायाने त्यांनी त्या धंद्यातील कमाई पुनश्च त्या धंद्यात न टाकता घरदार, सोनेनाणे, याशिवाय शेतातपण गुंतविण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी नजिकच्या खेड्यात थोडीशी कोरडवाहू व थोडीशी बागाईत जमीनपण खरेदी केली.

गणेशरावांना दोन मुलगे. पैकी एकाला त्यांनी दुकानात ठेवले व दुसऱ्याला शेतीवर ठेवले. शेती जर चांगली फायेदशीर करावयाची असेल तर आपण शेतीवरच राहिले पाहिजे या मताचे गणेशराव असल्यामुळे त्यांनी शेतीवरच घर (Farm House) बांधले. त्यामुळे त्यांना शेतीवर चांगले लक्ष ठेवता येऊ लागले व सकाळी लवकर कामास सुरुवातपण करता येऊ लागली. गणेशरावांची वृत्ती ही व्यावसायिक असल्यामुळे त्यांनी शेतीसुद्धा पारंपारिक पद्धतीने न करता ती हिशेबी व व्यवसाय (Profession) म्हणून कशी करता येईल याकडे लक्ष दिले. स्वतःचा योग्य वापर, सुधारित बी-बियाणे व नवीन अवजारांचा वापर करून शेतीचे उत्पन्न कसे वाढविता येईल याबाबत ते मुलाला सतत मार्गदर्शन करीत. तसेच नुसती ज्वारी, गव्हाची शेती न करता त्यात मिरची, कपासी, ऊस वगैरे चांगले उत्पन्न देणारी पिके कशी घेता येतील यावर भर दिला. मुलालापण खेड्यात रहाणे आवडत असल्यामुळे शेतीत पैसे गुंतवल्याबद्दल ते समाधानी होते.

खेड्यात राहणाऱ्या मुलास खेड्यातील वातावरणात रमणारी व शेतीची आवड असणारी मुलगी पत्नी म्हणून लाभल्यास दुधात साखर पडेल व मग शेतीकडे आपल्याला जास्त लक्ष द्यावे लागणार नाही या दृष्टीने गणेशरावांनी मुलासाठी वधू-संशोधन सुरू केले. ते व त्यांचा मुलगा नशीबवान म्हणून त्यांना सुसंस्कारित घराण्यातील, खेड्यात रहावयास तयार असलेली, कामसू व शेतीची आवड असणारी मुलगी सून म्हणून लाभली. त्यामुळे त्यांनी शेती अधिक किफायतशीर कशी होईल याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. ऊस हे आगदी भरवशाचे, बेताच्या खर्चाचे व चांगले उत्पन्न देणारे पीक असल्यामुळे त्यांनी उसाचे क्षेत्र वाढविले व त्याला बारमाही पाणी उपलब्ध व्हावे म्हणून शेतीत दोन-तीन विहिरीपण फोडून घेतल्या. त्यामुळे ऊसाचे भरघोस उत्पन्न मिळू लागले. पण गणेशराव येथेच थांबले नाहीत. शेतीत सून खूप रस घेत आहे असे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायपण सुरू केला. त्यासाठी त्यांनी गोठा बांधून चांगल्या पैदाशीच्या गायी व म्हशी विकत घेतल्या. सर्वच व्यवहार अगदी सचोटीने, लक्षपूर्वक व आदर्श पद्धतीने करण्याचे गणेशरावांचे व्रत असल्यामुळे त्यांनी अगदी निर्भेळ दुधाची विक्री केली. त्यामुळे त्यांच्या दुधाला सतत मागणी होती व शेवटी दूध संपले म्हणून काही गिऱ्हाईकांना परतपण जावे लागे. दुधात पाणी घालण्याचे पाप चुकूनसुद्धा करू नकोस अशी त्यांची सुनेस सक्त ताकीद होती व तीसुद्धा संस्कारित घराण्यातील असल्यामुळे तिच्या मनात पाणी घालण्याचे पापपण कधीच आले नाही.

गणेशरावांची सून आल्यापासून त्यांच्या घरी त्यांची शेती पहाण्यासाठी म्हणून पाहुण्यांचा राबता सुरू झाला. सुनेला कामाची व माणसांचीपण आवड असल्यामुळे आलेल्या पाहुण्यांचे उत्तम आदरातिथ्य होऊ लागले व पुनः येण्याचे आश्वासन देऊनच ते परत जाऊ लागले. काही पाहुणे तर स्वागताबद्दल एवढे खूष व्हायचे की First of its kind म्हणून सर्टिफिकेटपण देऊन मोकळे होत. त्यामुळे गणेशराव सुनेवर अगदी खूष होते व आपण व आपला मुलगा त्याबाबत खूपच भाग्यवान म्हणून मोकळेपणी सुनेला सांगूनपण टाकत असत. सुनबाई पाहुणे मंडळींशीच चांगली वागे असे नसे तर तिने आपल्या चांगल्या वागणुकीची छाप हाताखालच्या गडीमाणसांवरपण पाडली होती. त्यांना ती वेडेवाकडे तर कधीच बोलत नसे, उलट त्यांच्या अडीअडचणींची आपलेपणाने चौकशी करून त्यांना जी मदत करता येईल ती सढळ हाताने करत असे. त्यामुळे त्यांच्या गडीमाणसांना त्यांची चाकरी सोडण्याचे कधीच मनात आले नाही. उलट सून माहेरी जावयास निघाली की त्यांच्या डोळ्यात अश्रू येत व तिने माहेरीपण जाऊ नये असेच त्यांना वाटे. ती जेव्हा कधी माहेरी जाई तेव्हा ''वहिनी फार दिस राहू नका; अगदी लवकर वापस या; आम्हासी तुम्ही लई चटका लावलाय'', म्हणून जड अंतःकरणानेच तिला माहेरी जाण्याचा निरोप देत.

फार्म हाऊसवर शेजारपाजार असणे शक्य नसल्यामुळे गणेशरावांनी आपले शेतीवरील घर चोरांपासून संरक्षण व्हावे म्हणून भरपूर सिमेंट व लोखंड वापरून अगदी मजबूत करून घेतले होते. पण तरीसुद्धा चोर चोऱ्या करण्याचा आपला धंदा थोडाच थांबवणार ! असाच चोरीचा एक बाका प्रसंग गणेशरावांचा मुलगा व सून यांच्यावर गुदरला होता, पण त्यातून ते सहीसलामत बचावले व असत्प्रवृत्तीचे मंतरलेल्या घरात काहीच चालू शकत नाही याची त्यामुळे प्रचितीपण आली.

तो प्रसंग असा. त्या रात्री गणेशरावांच्या फार्म हाऊसवर रात्री साडेअकराच्या सुमारास काही चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. व्हरांड्यात असलेल्या बाथरूमचा वरचा थोडा भाग घरात प्रवेश करण्याएवढा असल्यामुळे दोन-तीन चोरटे त्या भागातून

बाथरुममध्ये उतरले. त्या दिवशी बाथरुमचा दरवाजा रात्री बाहेरून कडी लावून घेतलेला नसल्यामुळे चोरट्यांना साहजिकच घराच्या व्हरांड्यात प्रवेश मिळाला. व्हरांड्यातून घरात प्रवेश करण्यासाठी प्रथम एक ग्रीलचे लोखंडी दार होते व त्याला कुलुप लावलेले होते व त्या ग्रीलच्या मागे लाकडी दरवाजा होता. ग्रीलचे कुलुप उघडले की आपल्याला घरात सहज प्रवेश करता येईल म्हणून चोरांनी प्रथम ग्रीलच्या कुलुपात किल्ली घातली व ते कुलुप उघडण्याचा प्रयत्न केला. किल्ली फिरली, पण कुलुप काही निघेना, म्हणून ती किल्ली काढून दुसरी किल्ली चालवून बघावी म्हणून त्यांनी पहिली किल्ली काढण्याचा प्रयत्न केला. पण काय आश्चर्य ! कुलुपात अडकलेली पहिली किल्लीच निघेना. त्यामुळे दुसरी किल्ली कशी घालणार ? ठोकाठोकी करून जास्त वेळ घालविणेपण शक्य नव्हते, कारण त्यामुळे आवाज होऊन मालक जागा होईल व मग काहीच पदरात पडणार नाही. म्हणून त्यांनी कुलुप उघडण्याचा प्रयत्न सोडून दिला व दुसरीकडून कोठून घरात प्रवेश मिळविता येईल का हे पहाण्यासाठी पुनश्च बाथरुममधून घराबाहेर आले. तो त्यांना बाहेरून जिना असलेल्या घराच्या भिंतीला एक जाळी दिसली, पण त्यावर बाहेरून लोखंडी जाळी मारलेली होती. ती कापून काढून मग खिडकीचे गज वाकवून घरात शिरायचा चोरांचा बेत असावा म्हणून त्यांनी प्रथम जाळी कापायला सुरुवात केली. योगायोगाने गणेशरावांचे चिरंजीव व त्यांची पत्नी त्या दिवशी शेजारच्या खोलीत झोपलेली होती. (ती दोघं नेहमी आणखी पलीकडच्या खोलीत झोपत असत.) त्यामुळे त्यांच्या पत्नीला काहीतरी कापण्याचा आवाज येऊ लागला, म्हणून तिने आपल्या पतीला कसला आवाज येतो म्हणून पहाण्यास सांगितले. पण त्यांनी प्रथम कानाडोळाच केला. आवाज थांबेना म्हणून पत्नीने पुन: आपल्या पतिराजांना जबरदस्तीनेच उठविले व पहावयास सांगितले. ते उठून दिवा लावून पहातात तो काय ? खिडकीपलीकडे दोन-तीन चोरटे दिसले व त्यापैकी एकजण जाळी कापत असल्याचे त्यांनी पाहिले. लगेच ते ''चोर चोर'' म्हणून ओरडले व त्यांनी बाहेर झोपलेल्या गडीमाणसांनापण जागे केले. ते समजताच चोरांनी अंधाराचा फायदा घेऊन पोबारा केला. मग दारे उघडून पाहिल्यावर त्यांना ग्रीलच्या कुलुपात किल्ली अडकून बसलेली आढळली. बऱ्याच प्रयत्नांनंतर ती किल्ली-कुलुप उघडल्यावर ते व्हरांड्यात येऊन पहातात तो त्यांना तेथील बरेच सामान गायब झाल्याचे लक्षात आले. नंतर जिन्यात येऊन पाहिले तर तेथे व्हरांड्यातील सामानाने भरलेली पिशवी व किल्ल्यांचा जुडगा, कटावणी, हातोडा करवत, सळ्या वगैरे हत्यारे लावलेली चोरांची पिशवी सापडली. खिडकीची जाळीपण बरीच कापलेली आढळली. वाटेल ते प्रयत्न करून घर फोडून आत प्रवेश मिळविण्याच्या व सर्व चीज-वस्तू लुटून आपल्याला जीवे मारण्याचा चोरांनी केवढा कट रचला होता व तो संपूर्णपणे अयशस्वी झाल्याचे लक्षात येताच दोघेही पतीपत्नी अगदी थिजून गेली व अवाक् झाली. जमलेले गावकरीपण आश्चर्यचकित झाले. लोखंडी दरवाजाच्या कुलुपात किल्ली अडकून बसणे व त्यामुळे तो उघडला न येणे, खिडकीची लोखंडी जाळी कापली जात असताना त्यावेळी नेमकी जाग येणे, त्याच दिवशी नेमके शेजारच्या खोलीत झोपणे वगैरे सर्व घटना त्या पतीपत्नींच्या डोळ्यांसमोरून सरकन घसरल्या व घरात वास्तव्य करणाऱ्या कोणत्यातरी अदृश्य शक्तीनेच त्या नक्की घडविल्या याची त्या दोघांना खात्री झाली व त्यामुळे त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले व त्यांचे हात नकळत जोडले गेले. त्याच वेळी गावातील एका वयस्कर गृहस्थास बोलल्याशिवाय रहावले नाही. तो म्हणाला ''वहिनी ! हे तुमचं घर साधंसुधं घर नाही. ते एक मंतरलेले घर आहे. खरोखरीच मंतरलेले ! अन् त्याचं कारणपण तसंच आहे. या घरातला सर्व पैसा प्रामाणिकपणे कष्ट करून घाम गाळून मिळविलेला आहे. शिवाय तो मिळवून नुसता साठवून ठेवलेला नाही. त्यातून या गावातील काही लोकांचे संसारपण उभे राहिलेत. तुमच्या सासऱ्याला अन् तुमच्या मालकाला मी खूप दिवसांपासून ओळखतोय. खेड्यातल्या लोकांचं भलं व्हावं, त्यांना पोटभर खायला मिळावं म्हणून त्यांनी सोन्याचांदीतला काही पैसा या खेड्यांत, शेतीत ओतला, सुधारित शेती करून ती कशी फायदेशीर करावी हे इतर शेतकऱ्यांनापण शिकवले. गडीमाणसांना नुसती मजुरीच दिली नाही तर त्यांना जीवपण लावला. मुलगापण बापासारखाच. पण खरं सांगायचं वहिनी ना, तुम्ही या घरात पाऊल टाकल्यापासून या घराला आणखीनच बरकत आली. तुम्ही खरोखरीच सोन्याच्या पावलांनी या घरात आलात. तुमचे सासरे तर म्हणतात की मी मागच्या जन्मी काही पुण्याई केली म्हणून मला अशी विनम्र व कर्तबगार सून मिळाली. अहो वहिनी ! तुमचं घर म्हणजे देवघरच वाटतं. घरातील सर्वच कारभार अगदी उघडा व सत्याचा. लबाडीचा तर कोठेच स्पर्श नाही. शिवाय तुम्हा सर्व मंडळींना कामाचं खूप प्रेम. तुमच्या घरात मी कोणाला मोकळं कधी बसलेलं पाहिलं असं मला आठवतपण नाही. तुम्ही स्वतः काम करणार अन् लोकांनापण करायला लावणार. शिवाय त्यांना आईच्या मायेचा हातपण देणार ! देण्यात तर तुमचा हात अगदीच सढळ. अहो, या घरात जे जे लोक येऊन गेले ना ते काहीना काही खाल्याशिवाय, रिकाम्या हाताने कधीच परत गेले नाहीत. मग मला सांगा, अशा मंतरलेल्या घरात चोराची किल्ली कुलुपात अडकून बसेल नाहीतर काय होईल? चोर जाळी कापताना तुम्हाला जाग येईल नाहीतर काय होईल ? अहो, खऱ्या कमाईचा पैसा चोराला कधीच गवसत नसतो. तुम्ही या गावचं भूषण आहात भूषण.'' असं म्हणून वहिनींना नमस्कार करण्यासाठी म्हणून ते वयस्कर गृहस्थ वहिनींजवळ आले, पण वहिनींनी तुमच्यासारख्यांचे आशीर्वादच आम्हाला हवेत म्हणून उलट त्यांनाच नमस्कार केला व हे महाभयानक संकट, तुम्हा ग्रामस्थांच्या पुण्याईनेच टळले अशी कबुलीपण देऊन टाकली. सदाचरणाने वास्तु पुनीत झालेली असली म्हणजे त्या ठिकाणी असत् प्रवृत्ती कशा बोथट होतात याची चर्चा करतच तेथे जमलेले ग्रामस्थ आपापल्या घरी परतले.

OOO

# महान साईभक्त श्री उद्धवेश

## भाग १

**श्री शाम साई सदन, खेडीघाट, पोस्ट मोरटक्का, रे. स्टे. ओंकारेश्वर रोड, जिल्हा - नेमाड (मध्य प्रदेश) येथील १०८ सिद्ध श्री उद्धवेश उर्फ साईसुत शामदास - एक परिचय**

ब्रह्मीभूत श्री साईबाबा हे शिरडी येथे प्रगट झाल्यानंतर त्यांच्या चमत्कारांचा आणि आध्यात्मिक शिकवणुकीचा अनुभव हजारो भक्तांना त्यांच्या प्रत्यक्ष सान्निध्यात लाभला. श्री साईबाबा समाधिस्त झाल्यानंतर श्री साईलीला मासिकाद्वारे अशा भक्तांची ओळख जनसाधारण व्यक्तींना झाली. त्यात अशाही काही विभुती होत्या की प्रसिद्ध पराङ्मुख राहून आपले सर्वस्व श्री साईचरणी अर्पण करून त्यांच्या नावाचा व उपदेशाचा जयघोष परप्रांतात पसरविण्याचे पुण्यकर्म शिरोधार्य घेऊन बाहेर पडले. हे पुण्यकर्म त्यांनी इहलोकाची यात्रा संपेपर्यंत तर केलेच पण नंतरही श्री साईमहिमा अबाधित चालूच राहील अशी चिरस्थायी व्यवस्था करून ठेवली.



अशा थोर व्यक्तींपैकी एक १०८ सिद्ध श्री उद्धवेश उर्फ साईसुत शामदास हे होत. यांचे पूर्ण नाव श्री उद्धवेश गंगाधर रानडे गोत्र भारद्वाज. हे मूळचे कोकणातले. इकडे हे श्री शामबाबा या नावाने ओळखले जातात. यांची समाधी श्री रेवा (श्री नर्मदा नदी)च्या दक्षिण तटावरील श्री रामानंद अरण्याच्या एका भागात आहे. 'श्री शाम साई सदन' या नावाने ओळखले जाणारे हे स्थान इंदोर-खांडवा रेल्वेमार्गावर ओंकारेश्वर रेल्वे स्टेशनजवळ आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी श्रीक्षेत्र ओंकारेश्वर येथून फक्त १२ कि.मी. आहे. सडकमार्गे हे स्थान इंदोरहून ६५ कि.मी. आहे. खांडव्याहूनसुद्धा हे इतक्याच अंतरावर आहे.

शामदास हे नाव श्री प्रभु गुरु मालिक श्री साईबाबांनी इ.स. १९०४ मध्ये दर्शनास गेले असता ठेवलेले लाडके नाव. शामदास म्हणजे श्रीकृष्णाचा मित्र. "दास श्री उद्धव हेच नाव तुझे असेच दृढरीते दर्शवूनच नेहमी बेटा शाम याच नावाने हाक मारीत असत. श्री शामबाबा श्री साईबाबांना परम पिता श्री साईश या नावानेच संबोधित असत. यांनी श्री साईबाबांवर अनेक पदे, भजनं, आर्यासप्तकं रचली. श्री शामबाबांनी गावोगावी भ्रमण करून कीर्तनांद्वारे श्री साईबाबांच्या उपदेशाचा प्रचार केला. ही भक्तिपरंपरा चालू ठेवून लिंगार्चन, रुद्राभिषेक व अतीरूद्र महोत्सवही जागोजागी केले. एक अतिरूद्र गंगासागर या ठिकाणी केला. दुसरा बडोदे शहरी केला. तेव्हा श्री साईबाबांच्या तसबिरीसहित यांची तात्कालिक बडोदे महाराजांनी हत्तीवरून सोन्याच्या अंबारीतून मिरवणूक काढून सत्कार केला. तिसरा अतिरूद्र इंदोरला इ.स. १९३० मध्ये केला. त्यावेळी शहरातील गणमान्य नागरिक नारायण गोविंद खासगीवाले, जस्टीस जांभेकर, डोसाभाई इंजिनीयर, शेठ कन्हैयालाल नंदलाल भंडारी, शेठ जगन्नाथ नारायणजी, गिरधरलालजी, पंडित ख्यालिराम वैद्य, वासुदेव वामन ठाकूर, बाबूराव लोकनाथ व्यास, मुकुंद पांडुरंग मोघे आदि प्रभुतींनी या

कार्यास सर्वतोपरी सहाय्य करून महोत्सव सफल रीतीने आयोजित केला. या प्रसंगाची आठवण म्हणून श्री साईबाबांच्या पादुकांचा भरतकामाने केलेला एक रूमाल शिरडी येथे श्री म्हाळसापती यांना सप्रेम भेट म्हणून पाठवला होता.

इ.स. १९०७/८ च्या दरम्यान श्री शामबाबा हे रामेश्वरची यात्रा करून परत येत असता शृंगेरी मठाधिपती यांच्याशी बोलणे झाल्यावरून त्यांनी ''१०८ सिद्ध श्री'' ही पदवी नावाच्यापूर्वी लावत जाण्याबद्दल आज्ञा केली. श्री शामबाबांना योग्य न वाटल्याने त्यांनी ही पदवी हयात असे पावेतो आपल्या नावाच्याआधी कधी लावली नाही. पुढे इ.स. १९१४ साली शृंगेरी व शिवगंगा मठाधिपती यांच्याशी 'संध्या' या विषयावर समक्ष चर्चा झाली त्यावेळी त्यांना ही चर्चा गोड वाटून त्यांनी ''श्रीकृष्ण शरणं मम'' व उजव्या हाताच्या पहिल्या बोटावर चक्र धारण केलेले चिन्ह अशी मुद्रिका तयार करवून घालणे अशी आज्ञा केली. नंतर इसवी सन १९१९/२० साली उदेपूर वगैरे पुण्यक्षेत्री सहपरिवार यात्रेस गेले असता मेवाड प्रांती वल्लभी संप्रदायाचे, उदेपूर महाराजांचे गुरू गोवर्धन महाराज, श्री संस्थान नाथद्वारा गादीवर असताना यांची भेट झाली. तेथे सहपरिवार श्री शामबाबांचा मुक्काम एक-दीड महिना होता. तेथे त्यांनी एक काव्यही केले. श्री गोवर्धन महाराज यांनी प्रसन्न होऊन 'श्री राधेशाम' भजन करीत असता नित्य हेच भजन करावे असे सांगून श्रीकृष्ण भांडारातून प्रासादिक वस्त्रे, सोन्याचे पाणी दिलेली चांदीच्या रुपयाच्या आकाराची ज्यावर राधाकृष्णाची मूर्ती व ज्या पदवीने श्री शामबाबांना भूषविले त्यासह ती मुद्रा दिली.

एकदा डहाणूहून काही मित्रांबरोबर श्री शामबाबा द्वारकेस जात असता बोटीच्या कठड्याजवळ उभे राहून खिशातून पैशाचे पाकिट काढले परंतु ते हातातून निसटून खाली पाण्यात गेले. पैसे व तिकिटे सर्वच गेले. तिकिटांच्या काउंटरवरून प्रवास चालू राहण्यास परवानगी मिळाली परंतु पैशाअभावी यात्रा कशी होणार ही घोर चिंता लागली. इकडे डहाणूस गिरधर गोपाळ यास स्वप्न पडले. स्वप्नात एक साधू पांढरे कपडे घातलेला त्याला सांगू लागला की तुझ्या वडिलांजवळ पैसे नाहीत ते पाठव! गिरधर गोपाळ याला बोध न होऊन तो परत झोपी गेला. परंतु तेच स्वप्न परत पडले ! तोच साधू व तेच शब्द ! विचार करता त्याला आठवले की श्री शामबाबा द्वारकेस गेले आहेत ते नक्कीच संकटात असणार. दिवस उजाडताच त्याने टेलिग्राफिक मनिऑर्डरने पैसे पाठवले. श्री उद्धवेश यांना आश्चर्य वाटले की पैसे अचानक कसे आले. पुढे शिरडीस ते जेव्हा श्री साईबाबांना भेटले तेव्हा श्री साईंनी हसून त्यांना सांगितले की मीच तुला पैसे पाठवले होते. परमदयाळू प्रभुपिता श्री साई आपल्या भक्तांची कशी काळजी घेतात व संकटात कसे सहाय्य करतात हे जाणून श्री शामबाबा यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले व त्यांनी प्रभुपित्यास साष्टांग दंडवत घातले.

प्रभुपिता श्री साई यांचा इ.स. १९१० साली एक दात व एक दाढ पडली. त्यापैकी दात कै. श्री. काकासाहेब दीक्षित यांना दिला. दाढ श्री शामबाबा यांना मिळाली. ती त्यांनी एका चांदीच्या पेटीत ठेऊन शेवटपर्यंत सांभाळली. तसेच इ.स. १९१२ मध्ये 'प्रसाद' म्हणून दोन कफन्या व एक उपरणे श्री प्रभुपिता साईंनी श्री शामबाबा यांना दिल्या.

श्री शामबाबा हे निरनिराळ्या तीर्थक्षेत्री राहून चातुर्मास करीत असत. प्रभुपिता श्री साईंची त्यांना आज्ञा होती की, चातुर्मासात जेथे आहात तेथेच असावे. शिरडीस येण्याचे कारण नाही. एकदा श्री शामबाबांचा मुक्काम नेमावर गावी होता. हे गाव त्यावेळी होळकर संस्थानमध्ये होते. आता मध्यप्रदेश राज्यात येते. हे ठिकाण पवित्र नर्मदा नदीचे 'नाभीक्षेत्र' म्हणून प्रसिद्ध आहे. नर्मदा प्रदक्षिणा करणारे सर्व साधु, संत, महंत या गावी मुक्काम करतातच. श्री वासुदेवानंद सरस्वती, श्री बीडकर महाराज आदि अनेक महात्मे येथे येऊन राहिल्याचे पुरावे त्यांच्या चरित्रांतून मिळतात. येथे नर्मदाकिनारी एक श्री सिद्धनाथाचे मंदिर आहे. हे दगडी, सुंदर कोरीव काम केलेले मंदिर पांडवकालीन आहे अशी कथा आहे. या मंदिरास पेशव्यांकडून सात गावे इनाम व वार्षिक रु. ९००/- ची नेमणूक होती. या मंदिराचे पुजारी साधू महंत गोसावी महाराज श्री सिद्धनाथलिंगजी असताना एका चातुर्मासाच्या समाप्तीनंतर श्री उद्धवेश उर्फ शामबाबा यांनी प्रभुपिता श्री साई महाराज यांची तसबीर पालखीत घालून मोठ्या थाटात मिरवणूक मंदिरापासून गावापर्यंत नेली. त्या मिरवणुकीत गावची सर्व भक्तमंडळी भजन, नामस्मरण करीत रस्ताभर मोठ्या प्रेमाने सामील झाली. अनेक प्रकारची फुले व गुलाल पालखीवर उधळून आनंदोत्सव केला. ज्या कुटीत चातुर्मास झाला ती जागा सिद्धनाथचे महंत वयोवृद्ध सात्विक महाराज यांच्या मालकीची आहे. ती 'साईकोठी' अगर 'श्री साई सिद्धनाथ कुटी' या नावाने प्रसिद्ध झाली. तेथे श्री साईंच्या

फोटोची नित्य पूजा होत जाईल अशी महंतांनी आज्ञा केली व तेथे श्रींच्या नावे भगवे निशाण लावले गेले. येथे रोज आरती, पूजा होते.

श्री शामबाबा यांनी एकदा श्री. कुंटे यांच्याकडून ज्ञानेश्वरी घेऊन ती वाचण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना काहीच अर्थबोध न झाल्याने पुस्तक बंद करून प्रतिज्ञा केली की श्री साईबाबा आदेश करतील तरच ज्ञानेश्वरी वाचू. पुढे श्री साईबाबांनी त्यांना शिरडीस बोलावले. श्री साईबाबा भक्तांकडून पैसे मागून घेत असत हे सर्वांस ठाऊक आहेच. श्री शामबाबांकडूनही ते रोज रु. ११/- मागून घेऊ लागले. असे रोज रु. ११/- प्रमाणे दहा दिवस दिल्यानंतर अकराव्या दिवशी रुपये न देता श्री शामबाबा त्यांना म्हणाले की मी माझी अकराही इंद्रिये (Senses) आपणास आधीच अर्पण केली आहेत. श्री साईबाबा यावर उत्तरले की तू ते देणारा कोण ? ते तर माझे झालेलेच आहेत. श्री साईबाबा यांना खात्री झाली की याचे चित्त आता भौतिकतेपासून दूर झालेले आहे. तेव्हा श्री साईंनी त्यांना आज्ञा केली की, ''जा, बापूसाहेब जोग यांच्याकडून एकनाथी भागवत आण व वाच.'' पुस्तक आणून काही पाने चाळत असता श्री साईबाबा म्हणाले, ''अकरावा अध्याय काढ व नीट वाच.'' श्री साईबाबांनी हे पुस्तक श्री शामबाबांना नियमित वाचावयास सांगितले व म्हणाले की हे वृंदावनाचे पुस्तक आहे व मी स्वत: उद्धवशी बोलत आहे हे लक्षात घे. त्या दिवसापासून श्री उद्धवेश उर्फ श्री शामबाबा हे एकनाथी भागवत सतत वाचीत असत व शेवटपर्यंत हे पुस्तक त्यांच्या उशाशी ठेवलेले असावयाचे.

श्री शामबाबा एकदा संक्रांतीच्या वेळी शिरडीस होते. त्यावेळी तेथे कै. काकासाहेब दीक्षित, श्री दासगणू महाराज वगैरे अनेक मंडळी होती. श्री शामबाबांना संक्रांती सणाबद्दल शंका होती की, हा सण काय आहे ? याचे महत्त्व काय हे न जाणता आपण फक्त परंपरा म्हणून साजरा का करतो ? याबद्दलची शंका मनात असतानाच याविषयी प्रश्न श्री साईबाबांना विचारावे असे मनात होते. परंतु हिंमत होत नव्हती. त्यांच्या मनातील आशय श्रींच्या लक्षात आला. आरतीनंतर श्रींच्या हातून उदी घेताना श्री साईबाबा म्हणाले, ''आपल्या अल्ला मालकाच्या दरबारात वाटेल तेव्हा चांगले बोलावे. अल्ला मालिक सर्वांचा आहे.'' ह्या वाक्यांचा श्री शामबाबांनी आपल्या ठाई असा विचार केला की, जे जे विचारणे ते ते सर्व विचारावे. बहुतेकांशी श्री मालिक असेच बोलत. तथापि निश्चयात्मकही ज्या त्या व्यक्तीस कधी कधी स्पष्ट इशाराही मिळत असे. श्री शामबाबांनी श्रींना विचारले की ''बाबा ही उद्या महापर्वणी 'तिलसंक्रांत' आहे, हीची महती काय असावी?'' मंडळी स्थिर बसतात न बसतात तो श्री साईबाबांनी जात्याच्या बाजूस बसलेल्या इसमाकडे पाहून म्हटले की, ''काय करावे, मालकाचं नाव घ्यावं. मी खूपच लांब पण मैदानच, लई मैदान, लई मोठ्या नद्या लागल्या, त्यांत दोन-चार तर सर्वांना ठाव्या आहेतच. तसाच पुढे गेलो. अफाट मैदान, खूपच गर्दी. समद्यांचे हाती तरवारी न् बंदुका ! कोणी मरतो, कोणाचं हातपाय, डोके उडते, तर धुमधडाका. तसाच पुढे मी बी खेळलो. लई दमलो. मग भोवताली मंडळी फारच जमली. मी तर लांबलांब तरवारी जमिनीवर अंथरल्या. त्यात आणखी लोखंडाचे खिळेबी जमिनीत उलटे (हातांनी खूण करून दाखवली) गाडले, अन् त्यावर निजलो. त्यावेळेस सूर्य उगवतकडून निगून राहात्याकडून निमगावाकडे जात होता. त्या सूर्याला असे फिरायला सहा महिने लागतात. जेव्हा सूर्य उत्तर निमगावचे बाजूला आला, तेव्हा आपण आपल्या घरी गेलो. अशी लई मोठा दिवस बरं ! समदं लोक जमतात, गोडगोड बोलतात बरं. अल्ला मालिकशिवाय कोण मोठा आहे, अशी अल्ला मालिकची करणी, अन् अल्लामियाची माया, लई गमती बरं ! मग आपला धरम कळतो, अन् मोठा दिवसबी कळतो. सबुरी असावी बरं.'' श्री शामबाबांचे समाधान झाले नाही. दुसऱ्या दिवशी श्रींच्या हातून तिळगुळ घेताना त्यांनी परत विचारले की, ''बाबा, आजचा दिवस मोठा का ? मी शाम दीन आहे. दया असावी.'' श्री साईबाबांनी पुढील वाक्य उच्चारले, ''आपण मोठे आहोत व ह्या तिळगुळाचे सार काका सांगेल. त्याजपासून तिळगुळ घ्यावा व द्यावा. अल्ला मालिकशिवाय मोठा कोण आहे? मालिक सर्वांचे भलेच करतो बरं, असंच 'धर्म' विचारतो व मी बी खिळ्यावर निजूनशान त्याला सांगतो व सांगन बी. काल-परवां समद्यास्नी, तूं बी काल-परवा तवां होतांना ? लई नामी दिवस बरं कां, निमगावकडे सूर्य जातो अशी अल्ला मालकाची करणी. जा, काकाला भेट बरं.''

श्री प्रभुपिता श्री साई यांनी इ.स. १९१८ च्या सुरुवातीसच श्री शामबाबांना आज्ञा केली की आता येथे वरचेवर येण्याची तुला गरज नाही. मी तुझ्याकडेच आहे. पवित्र नदी नर्मदाकिनारी वास्तव्य करून रहा.

श्री शामबाबा यांनी इंदूरला अतिरुद्र केल्यानंतर नर्मदा नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर खेडीघाट गावी मुक्काम केला.

त्याकाळी हे क्षेत्र जंगलाने वेढलेले होते. पवित्र नर्मदाकिनारा व एकांत जागा साधनेकरता पूर्ण योग्य अशीच होती. श्री शामबाबांनी येथे एक एकर जमीन खरेदी करून आराधनेकरतां योग्य व्हावे असे श्रीसदन बांधावयास प्रारंभ केला. जमीन खरेदी करण्याच्याआधी योग्य भुगर्भ शास्त्रज्ञांकडून संशोधन करवून तज्ञांच्या सल्ल्याने सर्वप्रकारे योग्य प्रमाणपत्रे मिळवून मगच खरेदी केली. या परिसरात बरीच कडूलिंबाची झाडे असून सर्व परिसर क्षयीं इसमास लाभदायक असा आहे याची खात्री श्री शामबाबांनी करून घेतली. त्यांनी लिहून ठेवले आहे की, ''ही भूमी मारक नव्हे, तर तारकच आहे व असणारच हे सत्य जाणावे.'' श्रीसदनाच्या बांधकामास शुभमुहूर्तावर सुरुवात केली. मुख्य हॉल मध्यबाजूस पूर्वाभीमुखी असा ठेऊन एक सिद्धासन हमचौरस असे केले. उत्तरेच्या बाजूस एक मोठी खोली पुरुषवर्गासाठी बांधली. दक्षिणेच्या बाजूस एक खोली स्वत:ची बैठक म्हणून बांधून घेऊन त्याला लागूनच एक खोली स्त्रियांच्या वसतीकरता केली. या खोलीतच श्री शामबाबांच्या पत्नी कै. सौ. जानकीबाई यांचा फोटो ठेवण्यात आला. मध्यभागी जे सिद्धासन केले, त्यावर परमपिता श्री साईश यांच्या तीन तसबिरी ठेवण्यात आल्या. त्या सिद्धस्थानाच्या समोरच एक अग्निकुंड करण्यात आले. हे सर्व बांधकाम श्री शामबाबांच्या स्वत:च्या योजनेप्रमाणे त्यांनी स्वत:च करवून घेतले. तसेच श्री साईबाबांच्या चरणापाशी सिद्धासनाच्या चौथऱ्यावर एक समाधी भुयारही त्यांनी तयार करून ठेवले होते. सदनाचे बांधकाम इ.स. १९३६ मध्ये पूर्ण झाले.

***

# सुभाषित रसास्वाद

**क्षणे तुष्टा: क्षणे रूष्टा: तुष्टा रुष्टा क्षणे क्षणे ।**
**अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयंकर: ।।**

(लोकोक्ती)

क्षणात समाधान पावणारा तर क्षणात रागावणारा, क्षणाक्षणात (कधी) रागावणारा तर (कधी) हसणारा (अशा) अस्थिर चित्ताच्या माणसाची कृपाही भयंकर हानिकारक (भयावह) असते.

ही एक लोकोक्ती आहे. एखाद्या चंचल माणसाची मैत्री वा प्रेमही घातक ठरते. सारासार विचार न करता येणाऱ्याशी मैत्री प्रसंगी हितावह होत नाही; उलट त्यामुळे हानी होण्याचा संभव अधिक.

अशाच एका सुभाषितात म्हटले आहे की, शांत वृत्तीचा, स्थिर मनाचा मनुष्य रागावला तरी हानी होत नाही (तो सकारण रागावतो). परंतु चंचल चित्ताच्या माणसाची कृपासुद्धा भयंकरच असते.

प्रख्यात लेखक श्री. अमरेंद्र गाडगीळ म्हणतात, क्षणोक्षणी विकारांच्या आहारी जाणाऱ्या माणसाचे प्रेमही लाभदायक होत नाही, म्हणून अशा माणसापासून चार हात दूर राहणाऱ्याला उपदेश करणारी ही पदावली मार्गदर्शक होते. एखाद्याला धोक्याची सूचना देताना पदावलीचा उपयोग केला जातो. मनाचा समतोल बिघडला की घोटाळा झालाच. लहरी श्रीमंत, सत्ताधारी किंवा राजे यांच्या हाती सत्ता अमर्याद असते. तिचा वापरही ते मर्यादा सोडून करतात. कोणावर प्रसन्न झाले तर गळ्यातला कंठाही देतील आणि त्यांच्या मनाविरुद्ध कोणी वागला तर त्याचा कंठ चिरायलाही ते मागेपुढे पाहणार नाहीत... खूप उदाहरणे आहेत -

निजामशहा अत्यंत लहरी सुलतान... अत्यंत हलक्या कानांचा. श्रीमंत लखुजीराव जाधव म्हणजे त्याच्या पदरचे फार मोठे आसामी, फार मोठे सरदार, पण अव्यवस्थित चित्तामुळे मर्जी फिरली... काही विषारी जिभा त्याच्या कानांशी लपलप करू लागल्या... आहे, कोणीतरी म्हटले 'लखुजी हराम आहे !' तर लगेच सुलतानाने मान डोलवली... लखुजीराव जाधव आपल्या तीन पुत्रांसह रघोजी, अचळोजी नि यशवंतराव यांच्यासह दौलताबादच्या म्हणजे देवगिरीच्या दरबारात प्रविष्ट झाले नि या लहरी सुलतानाने अकस्मात् मारेकरी घालून त्यांना ठार केले... देवगिरीच्या सिंहासनाचे हे जाधवराव म्हणजे औरस वारसदार पण त्यांची बेवारशी प्रेते त्याच तख्तासमोर रक्ताच्या थारोळ्यात बेवारशी पडली होती... हाच तो लहरीपणाचा भयंकर परिणाम !

**- सुहास हरि जोशी**, पुणे.

# साईवंदना

## अंतःरंग

भाव तोचि देव
देव तोचि भाव
नाही दुजा ठाव
अंतःरंगी।

धर्म-धर्म केला
आयुष्यभर मेला
नाही मनी उदेला
दुजा भाव।

काय करू बावडी
ईश्वरा जी आवडी
साधनेविना खडी
अंतःदेही।

देव देव भला
काय कामी आला
जीवनी एकला
अंतःप्रवाही।

बाहेर अन् आंत
निब्बळ तुझी मात्र
पाहू किती वाट
पांडुरंगा।

■ जी. सुरेशन्

## साईनाममहिमा

नाम ज्याचे मुखी साई,
त्यास काळभय नाही।
उद्धरूनी सहजी जाई,
नाम साईचे घेता ॥१॥

नाम घ्यावे श्रद्धा ठेवून,
तरीच पावती साई जाण।
श्रद्धा नसल्या सारे क्षीण,
न येई फळ हाता ॥२॥

नाम घ्यावे अपेक्षेवीण,
साई जाणती सर्व जाण।
भार त्यांचेवरी ठेवून,
शुद्ध भाव असो चित्ता ॥३॥

साई नाम कल्पतरू,
भव सागरीचे तारू।
नेई सहजी पैलतीरू
साई हात देती भक्ता ॥४॥

नाम आर्ततेने घेई
त्याचे पाठी उभा साई।
साई हेच शेषशायी,
भक्त प्रतिपालनकर्ता ॥५॥

■ वसंत गोडबोले, पुणे.

## आत्मनिवेदन भक्ती

जगी धन्य तोचि। साईभक्त झाला।
विवेकी स्वरूपी। एकरूप झाला ॥धृ॥

आनंदे एकांती। करावे चिंतन।
साईमय होता। चरणी अनन्य ॥१॥

योगक्षेम देई। अंती समाधान।
जीव शिव दोन्ही। होती पायी लीन ॥२॥

अंतरी उल्हास। साईचा निवास।
देई निजप्रेम। सांभाळी भक्तास ॥३॥

असा माझा साई। विश्वी तो पहावा।
घेई नाम त्याचे। जीवाचा विसावा ॥

■ कृष्णा तेली, कुडाळ.

# साई अनुभव



## नाम व समाधान

**जेथे नामाचे अधिष्ठान**
**तेथे वसे समाधान ॥**

माणसाची सारी धडपड समाधान मिळविण्यासाठी असते. प्रत्येकाला समाधान व शांती पाहिजे असते. परंतु ती काही सहजासहजी मिळणारी वस्तू नव्हे. माणसाच्या दु:खाचे मूळ हाव आहे. याचेही तीन प्रकार आहेत. हाव म्हणजे वस्तू हवी, असे वाटते. हव्यास म्हणजे ती कायम जवळ असावी, असे वाटणे व ध्यास म्हणजे त्या वस्तूशिवाय काही न सुचणे. जर हाव कमी झाली तर माणूस सुखी होईल. नामस्मरण केल्याने आपली हाव हळूहळू कमी होईल. देवावर, नामावर पूर्ण निष्ठा ठेवली पाहिजे. एखादी गोष्ट जर आपल्या हिताची असेल, तर नाम ती घडवून आणील, असा विश्वास निर्माण व्हायला पाहिजे. म्हणजे मग आपली हाव कमी होईल. पण हे नामस्मरण केले तरच साध्य होईल. या हावेमुळे माणूस केव्हा केव्हा राक्षस बनतो व वाटेल ते कृत्य करतो. प्रत्येक माणसाच्या मनात एक सैतान लपलेला असतो. परंतु जर आपण प्रयत्न केला तर या सैतानाचा नायनाट करता येतो. त्याला एकच उपाय, म्हणजे नामस्मरण करणे. नामामध्ये अशी शक्ती असते की, तिच्यामुळे पापाचे डोंगर भस्म होतात. वाल्याचा वाल्मिकी केवळ नामामुळेच झाला. सुरुवातीला नामस्मरणाचा कंटाळा येईल, परंतु प्रयत्नांनी तो कंटाळा जाऊन हळूहळू गोडी निर्माण होईल. नामस्मरणच आपल्या विकारांवर ताबा मिळवू शकते. नामाची गोडी किती आहे ? तर ते अमृताहूनही गोड आहे. मग ते आम्हाला गोड का लागत नाही, तर आमच्या तोंडाला चव नाही. परंतु एकदा या नामाची गोडी कळली की, मग ते सुटत नाही. त्यासाठी प्रयत्न करायला हवा, हे मात्र सत्य. नाम घेतलेत की त्यापाठोपाठ समाधानाला यावेच लागते. जसे आपले शरीर चालते त्यामागून आपली सावलीही येतेच. संतांनी या समाधानाचा अनुभव घेतला आहे. तुम्हालाही हे समाधान मिळावे म्हणून ते कंठरवाने नाम घेण्यास सांगत असतात. आपण हाव धरून कितीतरी गोष्टी मिळवतो, पण त्या आपल्याबरोबर येतात का ? मग त्या जर इथेच ठेवून जायचे आहे, तर त्याचा काय उपयोग ? हाव, हव्यास, ध्यास फक्त नामाचा धरा आणि बघा, काय गंमत होते ती ! संत तुकाराम एवढे गरीब, परंतु किती समाधानी, शांत होते. रामदास एवढे समर्थ होते, परंतु त्यांनी आपली लंगोटीच घातली ती काही टाकून भारी वस्त्रे परिधान केली नाहीत. त्यांना त्याची जरूरीच नव्हती. समाधानाची वस्त्रे पांघरल्यावर दुसऱ्या वस्त्रांची गरज काय ? हे समाधान मिळविण्यासाठी आपली हाव कमी करा व नामाची कास धरा की समाधान मिळेलच. वासरामागे जशी गाय येते तसे नामामागे समाधान येतेच. तरी आजपासून नाम घ्यायचेच, असा निश्चय करा. जन्माला येऊन जर समाधानात जगता आले नाही, तर त्या जगण्याला काय अर्थ आहे ? हाव अशी आहे की तिची तहान कधीच भागणार नाही. उलट ती वाढतच जाते व शेवटी दु:खातच लोटते. मग तिची कास धरून काय उपयोग ? समाधानी मनुष्य भेटला की, आनंद होतो व आपण तसेच व्हावे असे वाटते. पण उपाय सुचत नाही व पुन्हा आपण त्यातच बुडी मारतो. यातून तरण्यासाठी संतांनी नामरूपी नाव ठेवली आहे.

पण आपले लक्ष तिकडे जातच नाही. जन्माला येऊन जर समाधान प्राप्त होत नसेल तर काय उपयोग ? आपल्या जन्माचे सार्थक करायचे असेल, तर नामाची संगत धरा व समाधान प्राप्त करून शांतपणे जीवन जगा ! पैसा-अडका येथेच रहाणार आहे. तो मिळविण्याची इच्छा पुरी होणार नाही. परंतु जर वृत्ती समाधानी असेल तर आहे तेच खूप वाटते व आपला चरितार्थ व्यवस्थित चालतो. यासाठी नाम घ्या व प्रचिती पहा !

**–सौ. गीता गो. कुंटे**
मुलुंड, मुंबई.

## मला पावलेली साईमाऊली

खूप वर्षांपूर्वीची घडलेली ही सत्यघटना आहे. तेव्हा मी दादरला माझ्या आजीकडे रहात होतो. आता मी ठाकूरद्वार झावबावाडीमध्ये रहातो. दादरला माझी आजी, आत्या, काका व मी असे चारचजण रहात होतो व मी १२वीला शिकत होतो. तेव्हा श्री. प्रकाश, माझे काका व कु. बाबी, माझी आत्या व इतर चार-पाचजण श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिरडीला गेलो.

मी कॉलेज करत होतो. त्यामुळे मी त्यावेळेला त्यांच्याबरोबर जावू शकलो नाही आणि नंतर माझ्या मनात शिरडीला जाण्याचा विचार आला आणि मी माझा मनोदय घरी सांगितला. तोपर्यंत शिरडी गाव कुठे आहे ? श्री बाबांची समाधी कुठे आहे ? ते मला बिलकुल माहीत नव्हते. मला शिरडीला बाबांकडे जाण्याची परवानगी घरून मिळाली. आणि मला शिरडीला जाण्यासाठी घरून २०० रुपये देण्यात आले. ही गोष्ट १९८१ सालची. गाडीचे तिकिट तेव्हा ३७ रुपये ५० पैसे होते.

मी कपड्याची छोटी पिशवी भरली व घरून शिरडीला जाण्यासाठी निघालो. मी मुंबई सेन्ट्रलला गेलो आणि मुंबई-शिरडी संध्याकाळची आठची गाडी पकडली. मी शिरडी स्थानकावर पहाटे ३.०० वाजता पोहचलो. सगळे प्रवाशी उतरले, त्यापाठोपाठ मीपण शिरडीच्या पवित्र धरतीवर उतरलो व त्या प्रवाशांपाठोपाठ चालू लागलो. मधेच चालता-चालता फुलवाल्यांची दुकाने लागत होती. तेथेच एका फुलवाल्याच्या दुकानात गेलो. कपडे भरलेली पिशवी ठेवली. त्याने सांगितलेल्या ठिकाणी आंघोळ केली व ठीक ७.०० वाजता मी बाबांच्या समाधीमंदीराजवळ हार-प्रसाद घेऊन रांगेत उभा राहिलो. त्याचवेळी माझ्यापुढे जवळजवळ पाचशेच्या वरती माणसे उभी होती. रांग पुढेपुढे सरकत होती आणि मीही श्री बाबांचे नाव घेऊन पुढेपुढे जात होतो.

मी बाबांच्या समाधीजवळ केव्हा येऊन पोहचलो ते मला कळलेच नाही. मी बाबांच्या मूर्तीजवळ जावून वंदन करून बाबांच्या गळ्यात हार घातला. बाबांच्या समाधीवर गुलाब ठेवले आणि डोळे मिटून बाबांचा मनात जप केला. डोळे उघडले तेव्हा खरंच माझे मन बाबांच्या दर्शनाने भरून आले.

मी म्हटले, श्री साई-माऊली तुमचे आशीर्वाद या गरीब मुलाच्या डोक्यावर सदैव असू देत. मी तुमचा जन्मभर ऋणी राहीन. असे म्हणून मी बाबांच्या समाधीमंदिरातून बाहेर पडलो आणि बाबांचे गुरुस्थान आहे तेथे गेलो. तेथे दर्शन घेतले. मी तेथून मशिदीमध्ये गेलो. बाबांनी पेटवलेली धुनी आहे, बाबा ज्या शिळेवर बसायचे त्या शिळेचे दर्शन घेऊन मी चावडीचे दर्शन घेतले. तेथे बाबांची बाज आहे. ज्या बाजेवर बाबांना शेवटची आंघोळ घालण्यात आली, त्या बाजेचे दर्शन घेऊन मी लेंडीबागेमध्ये गेलो. थोडी विश्रांती घेतली व श्री साईमाऊलीचे ध्यान केले.

थोड्या वेळाने घरी प्रसाद घेण्यासाठी प्रसादाच्या दुकानात गेलो. प्रसाद घेतला व ठीक १२.३० वाजता मी संपूर्ण दर्शन घेऊन मोकळा झालो. मी खिशात पाहिले तेव्हा माझ्या खिशामध्ये फक्त ३७ रुपये ५० पैसेच शिल्लक उरले आहेत असे माझ्या लक्षात आले. मी तडक माझी कपड्यांची पिशवी व प्रसाद घेऊन एस्.टी. स्टँडवर गेलो व तिकिट ऑफिसमध्ये तिकिट मिळते का ते पाहू लागलो. पण मला पाहिजे त्या गाडीची तिकिट फुल होती आणि त्या दिवसाची तिकिटे सर्व बुक झाली होती. मी खूप निराश झालो. घाबरलो. कारण माझ्याजवळ फक्त तिकिटापुरतेच पैसे शिल्लक होते.

मी एस्.टी. स्टँडजवळून थेट साईबाबांच्या मंदिराजवळ आलो आणि बाबांची प्रार्थना करून म्हटले की, बाबा, मला तिकिट मिळत नाही आहे. मला वाचवा. तेव्हा मी खूप रडवेला झालो होतो. एवढी प्रार्थना करून मी परत एस.टी. स्टँडवर येऊन पोहचलो आणि कुणाकडे तिकिट मिळते का ते पाहू लागलो.

आणि चमत्कार घडावा तसा एक मुलगा मला भेटला व बोलला की, तुला तिकिट पाहिजे का ? तेव्हा त्या मुलाला बोललो की, मला २.०० वाजताच्या गाडीचे एकच तिकिट पाहिजे. तो मुलगा बोलला की, माझ्याकडे एकच तिकिट आहे. मी त्याला ३७ रुपये ५० पैसे दिले व तिकिट घेतले. त्या हर्षानंदाने मी तिकिट घेऊन परत साईबाबांच्या मंदिराजवळ आलो आणि बाबांना म्हटले की, बाबा, तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. एवढे बोलून मी परत एस्.टी. स्टँडवर

त्या मुलाचा शोध घेऊ लागलो. परंतु तो मुलगा मला दिसला नाही. तेव्हाच मी समजून गेलो की तो मुलगा म्हणजे दुसरा-तिसरा कुणी नसून आपले साईबाबाच होते. हेच मला शिरडीचं बाबांचं प्रथम दर्शन.

खरंच बाबांचा महिमा खूप महान आहे. आता माझा असा एकही दिवस जात नाही की, बाबांचे नाव घेतले नाही आणि तेव्हापासून साईबाबा माझे गुरु, आई-बाबा सर्वेसर्वा आहेत.

**– मोहन शंकर खरडे**
मुंबई.

## सच्च्या भक्तांना साईंचा आधार

मी गेल्या १०-१२ वर्षांपासून साईंची सच्ची भक्त आहे. साई म्हणजेच सर्वस्व असं झालं आहे आणि प्रत्येक वेळी संकटसमयी बाबाच धावून आल्याचा अनुभव आला आहे.

दहा वर्षांपूर्वी शिरडी आणि बाबा यापासून फारच दूर होते. पण पहिल्यांदा ऑफिसमधल्या मैत्रिणींबरोबर शिरडीला गेले आणि ती बाबांची मनोहर मूर्ती पाहून मन शांत झालं. बाबांचे दर्शन भक्ताला मिळायला भाग्य लागते याचा अनुभव आला. त्यानंतर मी दरवर्षी शिरडीला जाते. मनात आलं की शिरडीला जाण्याचा योग येतो.

तसे बाबा नेहमीच माझ्या पाठीशी असतात पण तरी काही अनुभव लिहावेसे वाटतात. एकदा माझी आई आजारी आहे व तिला ॲडमिट केलं आहे असा मला फोन आला. वडिलांचं वय झाल्यामुळे त्यांचं सर्वच काम तिला करावं लागत असे. तिच आजारी पडली तर काय होणार हाच विचार मनात आला. ती बरी व्हावी म्हणून मी साईंचा धावा सुरू केला. मनात फक्त साईंचे नाव घेत केव्हा डोळा लागला तेच कळलं नाही. अचानक एकदम दचकून जाग आली. समोरच बाबा उभे होते. मला स्पष्ट ऐकू आलं की, "बाळ, मी आईला वाचवू शकत नाही." मला दरदरून घाम फुटला. घड्याळात सकाळचे चार वाजले होते. मी तशीच बसून राहिले. संपूर्ण साईनामाचा जप केला. बाबांना म्हटलं, आता साईभक्ताची खरी परीक्षा आहे. आई बरी झालीच पाहीजे. सकाळी हॉस्पिटलमध्ये जाऊन बघते तर आई उठून बसली होती. दोन दिवसात तिचे सर्व रिपोर्टस्सुद्धा नॉर्मल आले. तिला बघितलं आणि माझे डोळे पाण्यानं भरले. मी मनोमन बाबांचे आभार मानले. कारण माझ्या बाबांनीच तो चमत्कार घडवून आणला होता. त्यानंतर प्रत्येक सुख-दुःखात, संकटात बाबाच माझ्या पाठीशी असतात.

त्यानंतर आत्ताच घडलेला एक चमत्कार सांगते. मी स्वतः दोन महिन्यापासून आजारी होते. आजार तसा साधाच होता. माझा डावा पाया खूपच सुन्न व्हायचा, पायातनं शिरशिरी यायची, थंडी वाजायची. औषधं चालूच होती, पण जराही गुण नव्हता, उलट मानसिक ताण वाढत गेला. डॉक्टरांनी एक्स-रे काढायला सांगितला. एक्स-रेमध्ये डाव्या किडनीत गाठ (क्लॉट) दिसली. घरातील सर्वांनाच चिंता वाटू लागली. मी तर पूर्णपणे ढासळून गेले. सोनोग्राफी करा, असं सांगितलं. मनात नको ते विचार येत होते. रडू येत होतं. बाबांचा एकच आधार वाटत होता. दुसऱ्या दिवशी गुरुवार, त्यामुळे मन थोडं शांत झालं. कारण जे जीवावर बेतलं होतं ते बाबांशिवाय कोणीच निभावून नेणार नव्हतं. रात्रभर बाबांचा धावा केला. आमचा देव्हारा समोरच आहे. तिथेच मध्यरात्री पूर्णपणे प्रकाशमान होऊन बाबांची सगुण मूर्ती मला दिसली. ते मला आशीर्वाद देण्यासाठीच आले होते. दुसऱ्या दिवशी सोनोग्राफीचे सर्व रिपोर्टस् नॉर्मल आले. हा बाबांचाच चमत्कार म्हणावा लागेल. बाबाच माझं दैवत आहे. बाबांच्या आशीर्वादाने माझ्या मुलाचे नावसुद्धा 'साईराज' आहे.

**– ज्योती जगदीश-बोरकर**
खार, मुंबई.

## ....आणि श्रद्धा आणखी दृढ झाली !

**जगी ज्यास कोणी नाही, त्यास देव आहे**
**निराधार आभाळाचा तोच भार वाहे ॥**

खरंच कुठल्याशा कवीने ह्या ओळी लिहिल्या आहेत, त्या योग्य आहेत. मी साईबाबांची एकनिष्ठ भक्त आहे. बाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. ज्या ज्या वेळी मी संकटात सापडले, त्या त्या वेळी बाबा माझ्या हाकेला धावून आले आहेत. अशीच एका संकटात मी सापडले असतानाचा हा अनुभव लिहीत आहे. माझं एक वर्षापूर्वी लग्न झालं. लग्नानंतर मला लगेचच दिवस गेले. माझे पती हे त्यांच्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा असल्याकारणाने साहजिकच सासू-सासऱ्यांना खूप आनंद झाला. परंतु ३ महिन्यांनी अचानक माझं ॲबॉर्शन झालं. माझ्या दुःखाला पारावार राहिला नाही. पण मी नियमित साईबाबांच्या देवळात जात राहिले. त्यांचा जप करीत राहिले. माझ्या भक्तीत, सेवेत कुठेही खंड पडला नाही.

पुन्हा सहा-सात महिन्यांनी मला दिवस गेले. डॉक्टरांनी तपासून इंजेक्शन व गोळ्या चालू केल्या. कारण त्यांच्या निदानानुसार गर्भाची वाढ कमी होती. मी नित्यनेमाने साईबाबांचा धावा सुरू केला. 'साईमाहात्म्य'चे रोज वाचन सुरू केले. परंतु याही वेळेला दोन महिन्यांनी अचानक एके दिवशी पुन्हा ब्लिडिंग सुरू झाले. झाले ! पुन्हा सर्वजण घाबरले. डॉक्टरांनी ॲडमिट केले व उद्या सोनोग्राफी करू, असे सांगितले. या परिस्थितीत अख्खी रात्र मी रडत होते व बाबांचा फोटो समोर आणत होते व म्हटलं, बाबा, आता सर्व भार तुमच्यावरच ! तुम्हीच काय ते पहा. दुसऱ्या दिवशी दुपारी सोनोग्राफी रूममध्ये मला नेण्यात आले. माझी एक खास मैत्रिण जी साईबाबांची भक्त आहे, ती बाहेर होती. तिच्या हातात बाबांचा फोटो असलेली अंगठी होती. ती त्या अंगठीला धरून बाबांचा धावा करीत होती व आतमध्ये मी ! आणि अर्ध्या तासातच रिपोर्ट मिळाला की काहीच झालेले नाही. सर्व व्यवस्थित ! अक्षरश: त्यावेळी झालेला आनंद मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. खरंच, बाबा, तुमच्या लेकीच्या हाकेला तुम्ही धावून आलात. अशीच तुमची कृपा माझ्यावर व कुटुंबावर राहू देत ! केवळ बाबांमुळेच माझं संकट टळलं होतं.

बाबा तुमच्यासमोर मी नतमस्तक आहे !

**– सौ. भक्ती सावंत**
दहिसर.

## साई : माझा रक्षणकर्ता

मला अजून आठवतो तो दिवस ते वर्ष (१९९६). या वर्षी मी शेवटच्या वर्षाचा (T.Y.B.Com.) चा अभ्यास करत होते. माझे कॉलेज, ट्युशन व्यवस्थित चालू होते. मी शेगावच्या गजानन महाराजांची भक्त. साईंच्या चरणी श्रद्धा होती. १९९६ च्या सप्टेंबर महिन्यात गणेशोत्सवात मी आजारी पडले, पण आजार किरकोळ असेल म्हणून मी दुर्लक्ष केले व औषधपाणी घेऊन पूर्ववत् ठीक झाले.

पण दसऱ्याच्या नंतर तो दिवस रविवार म्हणजेच मला आठवतं की साईंनी माझं संकट दूर केलं. त्या दिवशी सकाळपासून मी ठीक होते. पण संध्याकाळी अचानक उलट्या सुरू झाल्या. माझा जीव कावराबावरा झाला. रविवार असल्याने डॉक्टरदेखील नव्हते व मी राहते तेथे के.ई.एम. हॉस्पिटल जवळ असल्यामुळे मी आईला सांगितले, मला हॉस्पिटलला घेऊन चल. आईचीदेखील घाबरगुंडी उडाली. मला चक्कर येऊ लागली व डोळ्यासमोर काळोख आला. मला वाटले, आता माझे काही खरे नाही. पण मी झोपलेल्या ठिकाणी साईलीला मासिकाच्या मुखपृष्ठावरील साईबाबांचा फोटो माझ्याजवळ होता. माझ्या मुखातून साईनामाचा जप चालू होता. थोड्या वेळाने माझी चक्कर थांबली व मी पुन्हा साईनामाचा जप चालू केला व साईभक्तांचे अनुभव वाचू लागले.

मी साईंच्या चरणी लीन झाले. माझे कॉलेजचे शेवटचे वर्ष असल्यामुळे मी अतिशय दु:खी होती. मी अनेक डॉक्टरांचे इलाज करून पाहिले. एक डॉक्टर म्हणाले, मोठ्या आतडीला सूज आली आहे. पण हा तर्क डॉक्टरांचा खोटा ठरला. रक्ततपासणीत आढळून आले की, माझ्या रक्तातल्या पांढऱ्या पेशींचं प्रमाण अतिशय कमी झालं आहे. माझे पप्पा अतिशय घाबरले. माझी साईंच्या चरणी ठाम श्रद्धा होती. मला माहीत होते, साई माझं रक्षण करणार. हळूहळू माझ्या प्रकृतीत अचानक बदल झाला व मी हळूहळू पूर्ववत झाले. पण चार महिन्यांच्या आजारपणामुळे मी अतिशय दु:खी झाले होते. कारण माझे ट्यूशन कॉलेज बुडाले होते. मी पास होणार नाही, असं सर्वांना वाटत होतं.

शेवटच्या वर्षीचा कठीण अभ्यास मी आजारपणानंतर कशी करणार ? मी स्वत: त्रस्त होते. मी साईंना विनविले व साईंनी माझी काळजी दूर केली. मला सगळे पेपर चांगले गेले व कठीण रिझल्ट असतानादेखील मला सेकंड क्लास मिळाला. ही सगळी त्या साईंची कृपा. मी आयुष्यात जे जे काही साईंकडे मागितले ते त्यांनी दिले व पुढेही आयुष्यात घाल, ही साईचरणी विनंती.

साईनामाने व साईंच्या उदीने मला जीवनात यश मिळाले. साई माझा जणू कल्पतरूच झाले. साईबाबांनी माझे आईवडिलांसारखे रक्षण केले व माझे संकट दूर केले. साई म्हणजेच माझा रक्षणकर्ता झाला.

**– दर्शना तोरस्कर**
परळ, मुंबई.

## "घाबरू नकोस, सर्व ठीक होईल"

माझा मुलगा अर्चिस व माझे पती ह्यांच्यामुळे मला साईभक्तीची आवड निर्माण झाली. वकिली व्यवसाय, महिलांसाठीचे सामाजिक काम व राजकीय पक्षाचे काम ह्यामुळे

आध्यात्मिक कर्मकांडासाठी मला फारच थोडा वेळ मिळतो. पण दररोज रात्री मी स्वतःशीच साईबाबांची आरती म्हणते. ''बाबा मालिक है'', हा अनुभव आम्हाला नेहमीच येतो व तो नुकत्याच घडलेल्या प्रसंगावरून दृढ झाला.

२३ डिसेंबरची सुरेख संध्याकाळ. जवाहर महिला सूतगिरणीसंबंधीच्या हायकोर्ट केसचे काम संपवून मी व इतर चार प्रशासक महिला संभाजीनगरहून (औरंगाबाद) आमच्या 'साईकृपा' ॲम्बॅसडरमधून धुळ्याला परत येत होतो. काम व्यवस्थित पार पडल्याने आम्ही आनंदात होतो. कन्नडच्या पुढे कालीमठाला जाऊन दर्शन घेतले व ड्रायव्हरने गाडी सुरू केली. इतर गप्पांमधून आमचे संभाषण अपघात ह्या विषयाकडे वळले होते. आता कन्नड घाटाकडे गाडी भरधाव धावत होती. अपघात फक्त वृत्तपत्रात वाचायचे असतात असा कदाचित समज असल्याने आमच्यावर काही क्षणातच येणाऱ्या आपत्तीची आम्हाला चाहूलही नव्हती. आता असं वाटतं, बाबांनी आम्हाला पूर्वसूचना देण्याचा प्रयत्न या संभाषणातून केला. कन्नड घाट ८ किलोमीटरचा असून पहिल्या २ कि.मी. मध्ये उजवीकडे दरी व नंतर ६ कि.मी. डावीकडे दरी आहे. दरी १ ते १॥ हजार फूट खोल आहे. रस्ता अतिशय अरुंद व नादुरुस्त अवस्थेत आहे.

घाटाचा पहिला टप्पा ओलांडताना असे जाणवले की गाडी प्रचंड वेगात आहे. घरी लवकर जाण्याच्या ओढीने आमच्या ते लक्षात आले नाही. सूर्य मावळतीला क्षितिजाला टेकलेला होता व अंधार पडू लागला. तेवढ्यात आमचा ड्रायव्हर ओरडला ''बाई, गाडी थांबत नाही.'' आमच्यावर एकदम भीतीचे सावट पसरले. लगेच तो ओरडला - ''ब्रेक फेल झाले आहेत.'' आणि तो हिस्टेरिया झाल्यासारखा ''हा-हा-हा-हा'' करायला लागला. त्याने स्टिअरिंगवरचे हात सोडून दिले आणि गाडी नियंत्रणाबाहेर गेली. त्याने धीर सोडून दिला. त्याच्या शेजारी बसलेल्या नर्मदाबाईंनी उडी मारली. मागे ड्रायव्हरच्या अगदी पाठीमागे मी, नंतर पुष्पाताई, मंगलाताई व विवरेकरताई बसल्या होत्या. आपली मृत्यूशी शर्यत चालली आहे, हा चट्कन विचार आला. मात्र याचवेळी ''धीर धर, घाबरू नकोस, सर्व शेवटी ठीक होईल,'' असा अंतर्मनातून आवाज उठत होता. सर्वांची आरडाओरड सुरू होती आणि ड्रायव्हरचे अवसान पार गळाले होते. मीही दोनदा उडी मारण्यासाठी दार उघडले. पण असे ठरविले की सर्वांबरोबर जे होईल ते होऊ दे. इंडिकेटर बोर्डच्यावर लावलेल्या श्री साईंच्या फोटोभोवतीच्या, माझ्या मुलाने लावलेल्या रुद्राक्षमाळा खालीवर होत होत्या. असं वाटत होतं की साई आपल्याबरोबरच आहेत. आम्ही ड्रायव्हरला ओरडून सांगितले - ''गाडी उजवीकडे ठोक.'' पण त्याच्यावर काहीच परिणाम होत नव्हता. आणि गाडी दरीकडे सारखी जात होती. आम्ही अंतःप्रेरणेने पुढे वाकून स्टिअरिंग सतत उजवीकडे फिरवायला लागलो. ड्रायव्हर आमचे हात सतत बाजूला फेकत होता. आणि गाडी 'रफ-टफ' शर्यतीसारखी ८० च्या वेगाने खाली जात होती. आमच्या प्रयत्नांनी ड्रायव्हरलाही आत्मविश्वास आला. त्याने स्टिअरिंगला हात लावला. मी त्याला म्हणत होते - ''हं, अस्सं, हळूहळू हं.'' आणि गाडी उजवीकडच्या चरीत उतरली व उजव्या बाजूला डोंगराला घासून उभी राहिली. मी जेव्हा हा प्रसंग आठवते तेव्हा आम्हाला हे धैर्य साईबाबांनीच दिले याची खात्री पटते. खाली उडी मारलेल्या निर्मलाबाईंना डोक्याला थोडे लागले. आम्हाला इतरांनाही केवळ मुका मारच बसला. गाडीलाही, उजवे मडगार्ड, क्लॅम्प सोडले तर, विशेष नुकसान झाले नाही. त्यानंतर चाळीसगावपर्यंत आम्हाला लगेच मदत मिळाली. डॉ. पूर्णपात्रेंनीही आम्हाला धीर देऊन औषधोपचार केला. त्यांनी फीही घेतली नाही. ही साईंचीच कृपा.

याचवेळी धुळ्याला घरी आलेल्या माझ्या पतींना सतत काहीतरी संकट येणार असल्याने अस्वस्थ वाटत होते व फोनची रिंग वाजताच तो माझाच अपघातासंबंधी फोन असल्याचे जाणवले होते. रात्री दुसरी गाडी घेऊन ते जेव्हा घाटात गेले तेव्हा घाट चढत असताना काळ्याकभिन्न प्रचंड डोंगराच्या पार्श्वभूमीवर एका वळणावर लहानशी ॲम्बॅसॅडर हाताच्या पंजावर अलगद उचलून धरलेली भासली आणि गाडीवरची साईकृपा ही अक्षरे चमकत होती. मेकॅनिकने गाडी पाहिली. गाडी चवथ्या गिअरमध्ये होती. ब्रेक व्यवस्थित लागत होते. काही लोक म्हणाले क्रेन लागेल. पण मेकॅनिक म्हणाला - ''मुझे गाडी निकालनी है और मैं निकालुंगा.'' गाडी दुसऱ्या दिवशी रात्रीपर्यंत तेथेच पडून राहिली. थोडीही चोरी झाली नाही. २४-२५ तारखेच्या मध्यरात्री माझे पती, मेकॅनिक व मुलाच्या मित्रांना घेऊन गेले. गाडी काढली व मेकॅनिकने ती धुळ्यापर्यंत ७० कि.मी. चालवत आणली. ही सर्व साईबाबांची कृपा. या प्रसंगाने घाबरट ड्रायव्हरपासूनही आमची व गाडीची मुक्तता झाली. ''साई तारी त्याला कोण मारी ?''

**- ॲड. सौ. अलका यावलकर**

धुळे.

ग्रंथ परिचय

## औदुंबराचे वृक्षातळी
# दत्तभक्तांनी संग्रही ठेवावी अशी अक्षर स्मरणिका

महाराष्ट्रामध्ये रुजलेल्या पंथ संप्रदायांमध्ये वारकरी, महानुभव, समर्थ या पंथाबरोबरच दत्त संप्रदायसुद्धा एक प्रमुख पंथ-संप्रदाय आहे. गाणगापूर, नृसिंहवाडी आणि औदुंबर ही दत्त संप्रदायाची मुख्य तीर्थस्थाने असून गुरुचरित्रात त्यांचा महिमा वर्णिलेला आहे.




सांगली जिल्ह्यातील, कृष्णानदीच्या पूर्व किनारी वसलेल्या श्रीक्षेत्र औदुंबर येथे श्री नृसिंह सरस्वती यांनी तपसाधना केल्याने या स्थानास एक विशेष महत्त्व आहे. येथील श्री नृसिंह सरस्वती जन्मोत्सव मंडळाने नुकतेच सुवर्ण महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन केले असून 'औदुंबर वृक्षतळी' नावाच्या सुमारे पावणेदोनशे पानांच्या या सुंदर सुबक संग्राह्य अशा स्मरणिकेचे पूज्य गगनगिरी महाराज यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम कवीवर्य श्री सुधांशु यांनी या स्मरणिकेचे संपादन केलेले आहे.

परम आदरणीय दत्तमहाराज कविश्वर यांच्यासारख्या तपस्वी व्यक्तीच्या लेखाने स्मरणिकेचा श्री गणेशा करण्यात आला असून श्री गुरुनाथ कोटणीस, श्री. वेंकटरमण दीक्षित, पं. शरद जोशी, प्रा. रमेश मिरजकर, श्री. ग. श्री. छात्रे, डॉ. दीपक टिळक, श्री. एस. ए. कुलकर्णी, डॉ. दीपा देशपांडे, श्री. शरद उपाध्ये आदी मान्यवरांचे या स्मरणिकेत लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

श्री. वासुदेव बाळंभट पुजारी यांचा 'औदुंबर वर्णन' हा लेख औदुंबरच्या मंदिरातील नित्य नैमित्तिक उपासनासह औदुंबरची साद्यंत माहिती देणारा आहे. अनुऋता साही यांचा हिंदी लेख हिंदी भाषिकांना औदुंबर क्षेत्राचे महत्त्व समजण्यास अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे.

विदर्भामध्ये कारंजे ग्रामी जन्म झालेल्या 'नरहरी' ने काशी क्षेत्री जाऊन श्री कृष्णसरस्वती यांच्याकडून संन्यास दीक्षा घेतली आणि नरहरी 'नृसिंहसरस्वती' झाले. घोर तपश्चर्या करून नृसिंहसरस्वतींना सिद्धावस्था प्राप्त झाली. अशा सिद्धपुरुषाने आपल्या वास्तव्यासाठी औदुंबर हे क्षेत्र निवडले. आणि सोन्याला सुगंध लाभावा तसे औदुंबर क्षेत्रीचा महिमा महान तपस्वी नृसिंहसरस्वती यांच्या पावन वास्तव्याने शतगुणीत झाला.

अशा या औदुंबर क्षेत्राचे, महान तपस्वी नृसिंह सरस्वती यांच्या जन्मोत्सव समितीने, 'औदुंबराचे वृक्षतळी' या स्मरणिकेच्या रुपाने केलेले अक्षर संपादन, मराठी साहित्यामध्ये अक्षर ठरेल. तसेच दत्त भक्त भाविकांनाही तो एक अक्षय ठेवा ठरावा असे आहे. या कार्याबद्दल जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष, स्मरणिकेचे संपादक, कार्यकारी संपादक मंडळ यांचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे.

**'औदुंबराचे वृक्षातळी'**
**श्रीनृसिंह सरस्वती महाराज स्मरणिका**
संपादक : **कवि सुधांशु** पाने : **१६१**

ग्रंथ परिचय

# श्रद्धा, भक्तीचे महात्म्य सांगणारा ग्रंथ
# भक्तीबोध

– सौ. भारती देशमुख, मुंबई.

आपल्या महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा आहे. अनेक थोर संत आपल्याकडे होऊन गेले. अंधश्रद्धा सोवळे-ओवळे, धर्माबद्दलच्या खोट्या कल्पना इ. गोष्टींचे अवडंबर न करता या सर्व संतांनी कलियुगात देवाची भक्ती करण्यासाठी नामस्मरणच श्रेष्ठ आहे हे पटवून दिले आहे.




आपल्याकडे संतांची आणि संतवाङ्मयाची मोठी परंपरा आहे. तसेच या संत साहित्याचा अभ्यास करून त्यावर चिंतन, लेखन, मनन करून हे संत साहित्य सामान्य जनांपर्यंत पोहोचविणारे अभ्यासक आणि उपासकही आहेत. संतवाङ्मय सामान्यांपर्यंत सोप्या भाषेत वाचनिय करून देण्याचे काम या अभ्यासकांनी केले आहे.

श्री गुरुदेव रानडे यांच्या परंपरेतील उपासक, संत साहित्याचे संशोधक अभ्यासक प्रा. नरेंद्र सदाशिव कुंटे हे त्यापैकीच एक आहेत. त्यांची संत साहित्यावर **नित्यक्रम आणि उपासना, रामचिंतन, ज्ञानेश्वरीतील भक्तीसंवाद, श्री. गुरुदेव रानडे चरित्र व साधनामार्ग** इत्यादी अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. या पुस्तकांद्वारे ते भक्तीप्रसाराचे कार्य करती आहेत.

महाराष्ट्राचे आधुनिक महिपती म्हणून ज्यांचा गौरव केला जातो त्या संतकवी **ह. भ. प. दासगणू महाराज** यांची ग्रंथसंपदा महाराष्ट्र सारस्वतातील एक फार मोठे अमृतधन आहे. त्यांनी **लिहिलेला 'गजाननविजय'** हा ग्रंथ महाराष्ट्रात सर्वत्र भाविकांच्या घरोघर वाचला जातो. विशेषत: हा ग्रंथ म्हणजे गजानन महाराजांच्या चमत्काराचे वर्णन नसून गजानन महाराजांच्या लिलांबरोबरच त्यामध्ये दासगणू महाराज यांनी भक्तीतत्त्वेही विषद केली आहेत. म्हणून भक्तीच्या दृष्टीने या ग्रंथाचे मूल्य अमोल आहे. या ग्रंथावर प्रा. कुंटे यांनी सोलापूर येथील 'तरुणभारत'मधून भक्तीबोधाचे विवरण करणारी लेखमाला लिहिली. ही लेखमाला लोकप्रिय झाल्यामुळे ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने सोरेगाव येथील गजानन महाराज सांस्कृतिक मंडळाने ती लेखमाला पुस्तकरुपाने प्रकाशित केली आहे.

'गजाननविजय' या ग्रंथातील भक्तीतत्त्वाचे विवेचन प्रा. कुंटे यांनी भक्तीबोध या पुस्तकात केले आहे. 'गजाननविजय' हा ग्रंथ महाराजांचे भक्तीमहात्म्य सांगणारा आहे. या ग्रंथातील नुसत्या चमत्कारांवर भर न देता त्या चमत्कारामागे असलेली भक्तांची श्रद्धा आणि भक्ती या पुस्तकात उदाहरणाद्वारे उलगडून दाखविली आहे.

अहंकार हा भक्तीमार्गातील मोठा अडथळा आहे. अहंकार हा फक्त पैसा, शिक्षण यांचाच नसतो तर भक्तीमार्गात गुरुवरील भक्तीचाही अहंकार असतो. संतकृपा प्राप्त करायची असेल तर अहंकार, ढोंगीपणा, श्रीमंतीचे प्रदर्शन इत्यादी गोष्टींचा त्याग करायला हवा. भक्तीचा व्यापार करू नये संतसेवेत पैशापेक्षा भावाला जास्त महत्व असते. तसेच आपल्यावर जी संकटे, दु:खे येतात ती सर्व आपल्या प्रारब्धाचे भोग असतात आणि हे भोग भोगूनच संपवायचे असतात. त्याशिवाय माणसाची सुटका नाही इत्यादी गोष्टींचा महाराजांनी भक्तांना केलेला बोध गोष्टीरुपाने सोप्या भाषेत या पुस्तकात सांगितला आहे.

गजानन महाराज सतत 'गणी गण गणात बोते' असा जप करीत असत. आणि इतरांनाही हा जप करण्यास सांगत असत. या जपाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न प्रा. कुंटे यांनी या पुस्तकात केला आहे.

माणसाने केवळ दैववादी व निष्क्रीय बनू नये. त्यांनी प्रयत्नांची कास धरायला हवी. प्रयत्नांना जर 'श्रद्धा-भक्ती आणि उपासना यांची जोड मिळाली तर कार्यसिद्धी होते आणि सुख, आनंद, समाधान मिळते हा सर्वच संतांनी आपल्याला संदेश दिला आहे. त्याचे प्रत्यंतर या पुस्तकातील अनुभव वाचताना येतो.

सोरेगावच्या सांस्कृतिक मंडळाने हे पुस्तक प्रकाशित करून एक उलेखनिय कार्य केले आहे. इतर मंडळांनीही हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून संतवाङ्मय प्रसाराचे कार्य करावे. असे सूचवावेसे वाटते.

**'गजाननविजय'मधील भक्तीबोध**
लेखक : **नरेंद्र कुंटे**
पृष्ठ संख्या : १४० मूल्य : रु ३०/-

# भक्ती (भाग ३ रा)

– वसंत दळवी

ज्ञान्याची भक्ती दोन प्रकारची असते. ज्ञानोत्तर व ज्ञानलक्षण भक्ती.

**१) ज्ञानोत्तर भक्ती :–** ब्रह्मज्ञान झाल्यावर व कृतार्थ अवस्था प्राप्त झाल्यावरही आत्यंतिक प्रेमाने, सगुण, साकार भगवंताची श्रवणकीर्तनादी प्रकारांनी भक्ती करणे म्हणजे ज्ञानोत्तर भक्ती. ज्ञानोत्तर भक्ती अद्वैत प्रधान असून ती सगुण ईश्वराची आहे. श्री ज्ञानेश्वरांना अशा कल्पित द्वैत, 'देव-भक्त'पणाचा शोभा वाढविणारा हा गोड व्यवहार प्रिय होता असे दिसते.

**२) ज्ञानलक्षण भक्ती :–** ह्या भक्तीत ज्ञान हीच भक्ती असून ज्ञान्याकडून जो सहज व्यवहार घडतो तीच त्याची भक्ती असते. श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'पै माझिया सहज स्थिती। भक्तिनाम॥' (१८:१११३). सहज, अकृत्रिम अवस्था हीच भक्ती होते. ही ज्ञानस्वरूप भक्ती क्रियाप्रधान नसते. कारण ज्ञानी भक्ताची सर्व कर्मे सहज ब्रह्मरूप झालेली असतात. भगवंत म्हणतात, 'जे अनन्य, अव्यभिचारी नि प्रेमळ भक्त आहेत, जे भक्त चरित्र गुणागान गातात तेदेखील मला निरुपम आवडतात'. तरी ज्ञानीभक्ताविषयीचे आपले ममत्व सांगताना म्हणतात, 'ज्ञानी माझा आहे, तो मला अत्यंत प्रिय आहे. माझ्या डोक्यावरचा मुकुट म्हणून मी त्याला धारण करतो.' कारण 'ज्ञानी भक्ती पराकाष्ठेची आहे.' सर्वोत्तम भक्त म्हणजे ज्ञानीभक्त होय.

महाराष्ट्रातील सर्व संप्रदाय व संतांनी आचार्यांचा मायावाद स्वीकारला असला तरी निर्गुणाबरोबर सगुणोपासनेचा उपदेश केला आहे. संतसाहित्यात त्याचे प्रत्यंतर येते. अद्वैत ज्ञानाने प्राप्त होणारी ब्रह्मरुपता सगुण ईश्वराच्या प्रेमाशिवाय अपूर्ण आहे, हे आवर्जून सांगणारे संत ज्ञानोत्तर भक्तीवादी होते. आधुनिक संत गजानन महाराज म्हणतात, ''ज्ञानमार्गाचे अवलंबन केले असता विश्वव्यापी होता येऊन सत्स्वरूप कसे जळी, स्थळी, पाषाणी हरेक वस्तूंत सत्तत्वाने खेळत आहे हे प्रत्यक्ष अनुभवास येते. भक्तीमार्गाने लहान होता होता अणू एवढे होऊन अति नम्रत्वाने हरिला जिंकता येते.'' ''नम्र झाला भूतां, तेणे कोंडिले अनंता'', हे तुकाराम महाराजांचे वचन हेच पटवून देते. ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग एकमेकांना पूरक आहेत. दोन्ही मार्गाचे फळ एकच. अज्ञान व अविद्येचा नाश दोन्हीने होतो. पुराणांतरी भक्तीने ज्ञान होते असे म्हटले असले तरी ज्ञानानंतरच खऱ्या भक्तीचा उदय होतो असे सांगितले आहे. भक्तीमध्ये आंतरांश प्रेमभावना मुख्य भक्तीचा उदय होतो असे सांगितले आहे. भक्तीमध्ये आंतरांश प्रेमभावना मुख्य असते, तर ज्ञानांश गौण असतो. भक्ताला परमेश्वराचा एक आकार हवा असतो. त्याचे दृश्यरूप पाहून त्याला आळवणे सोपे होते. ज्ञान हे वस्तूतंत्र व उपासना कर्तृतंत्र, म्हणजे कर्त्याच्या आधीन असते. कर्त्याच्या भावनेवर अवलंबून असते. ज्ञान झाल्यानंतर स्वात्मरूपाने भगवंताला जाणून त्याची केली जाणारी भक्ती ही खरी भक्ती व त्यापूर्वीची भक्ती उपासना भक्ती होय.

श्रुतिमध्ये भक्ती हे श्रेष्ठ साधन मानले आहे. मुक्तीपेक्षाही भक्ती श्रेष्ठ होय असे म्हटले आहे. चार पुरुषार्थ, म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष ही खरी पाहता भक्तीचीच साधने आहेत. भक्ती त्याचे परम फल आहे. भक्ती हा पंचम पुरुषार्थ मानला आहे. श्रीधराचार्यांच्या मते आत्मप्राप्तीसाठी भक्ती हे श्रेष्ठ साधन आहे.

उद्धवाला उपदेश करताना श्रीकृष्ण भगवान म्हणतात, ''जीवांच्या पारलौकिक कल्याणासाठी मी ज्ञान, भक्ती, कर्म हे तीन योग सांगितले. ह्याव्यतिरिक्त कोणत्याही उपायाने मोक्ष प्राप्त होणार नाही.''– ''योगस्त्रियो मया प्रोक्ता नृणां श्रेयो विधित्सया । ज्ञानं कर्मश्च भक्तिश्च नापायोऽन्येस्ति कुप्रचित्॥'' (भा. ११:१२०६). परंतु ह्या तिन्ही योगांचे अधिकारी भिन्न आहेत. जे लौकिक जीवनापासून व विषयभोगांपासून पूर्ण विरक्त आहेत व ज्यांनी विधिपूर्वक संन्यास घेऊन सर्व कर्मांचा त्याग केला आहे अशा विरागी वृत्तींच्या लोकांसाठी ज्ञानयोग सांगितला आहे. ज्यांचा ओढा कर्माकडे आहे व जे विषयांपासून मुक्त झालेले नाहीत त्यांच्यासाठी कर्मयोग सांगितला आहे. जेणेकरून हळूहळू ते मोक्षमार्गाकडे वळतील. परंतु ही कर्मे शास्त्रशुद्ध, विधियुक्त असायला हवीत हा कटाक्ष हवा. सर्व कर्मे अनासक्त वृत्तीने व भगवद् आज्ञा समजून करावयास हवी. म्हणजे मन क्रमाक्रमाने शुद्ध होत जाईल व ज्ञानाचा त्यात उदय होईल.

ज्ञानमार्गात इंद्रियनिरोध आवश्यक आहे. त्यासाठी मुमुक्षूला प्रयत्न करावे लागतात. परंतु भक्तीमार्गात इंद्रियनिरोधनासाठी परिश्रम करावे लागत नाहीत. योगी आपली इंद्रिये कोंडतो, तर भक्त ती भगवंताकडे वळवितो. सर्व विषय भगवंतास अर्पण करतो. मग परमेश्वरच त्याच्या सर्व इंद्रियांचा विषय बनतो. विषयांकडे धावणाऱ्या मनाला, प्रेमाला, आसक्तीच्या प्रवाहाला सगुण ईश्वराकडे वळवतो. परिणामी विषयांवरची त्याची गोडी कमी होते. विषयांची गती कुंठीत होते. भोगाविषयींची प्रवृत्ती नष्ट होत जाते. विशेष प्रयत्न केल्याशिवाय इंद्रियनिग्रह अनायासे साधला जातो. बळेबळे इंद्रियनिग्रह करणाऱ्या मुमुक्षूला इच्छाशक्ती कमी पडली तर पतनाचे भय असते. भक्तीमध्ये हे भय बिलकुल रहात नाही. भक्तीत विघ्ने कमी आलीच तर त्याचे निवारण करणारा परमेश्वर आपल्या पाठीशी आहे ही भक्ताची श्रद्धा असते. त्यामुळे तो संकटांनी विचलित होत नाही. निश्चिंत असतो. म्हणून भक्तीमार्ग सुलभ व निष्कंटक म्हटला आहे. शिवाय सामान्यजनांना इतर मार्ग कष्टदायक वाटतात. ते अनुसरण्यास कठीण असल्यामुळे त्या मार्गांकडे जाण्यास उत्सुक नसतात. त्यांची तेवढी मानसिक तयारी झालेली नसते.

भक्तीविरहित ज्ञानी पुरुषाला इंद्रियनिरोधनासाठी कष्ट घ्यावे लागतात, प्रयत्न करावे लागतात, सतत जागृत राहावे लागते. निर्गुणोपासकाला सतत विघ्नांशी सामना करावा लागतो. श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''कामक्रोधाचे विलग । उठवती अनेग । आणि शून्येंसी आंग । जुंझवावे की ॥'' (१२:६२) तर भक्तीमार्गात हे सायास नाहीत. दुःखं कष्ट सहन करावी लागत नाहीत. - ''म्हणोनिया येर ते पार्था । नेणतीचि व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोटंगले ॥'' (१२:७५)

पू. विनोबाजी म्हणतात, '' कर्ममार्गात व ज्ञानमार्गात कठीण असलेली मनाची क्षमता साधण्याची युक्ती भक्तीने हाती येते. ज्ञानमार्ग काही विशेष व्यक्तींकरताच आहे. सामान्य लोकांच्यादृष्टीने पाहिले असता भक्तीमार्ग सोपा आहे. 'सर्व जग मिथ्या आहे' ही जाणीव मुरवण्याचा प्रयत्न ज्ञानमार्गात करावा लागतो. भक्तीमार्गात समजून घ्यावे लागते की, 'सर्वकाही ईश्वराचेच रूप आहे. ज्ञानमार्ग अभावात्मक आहे, तर भक्तीमार्ग भावात्मक आहे. अभाव किंवा शून्यावर आरूढ होणे कठीण आहे. ईश्वरभावावर आरूढ होणे तुलनेने सोपे आहे. स्थूलपणे असे म्हणता येईल की भक्तीमार्ग सोपा आहे. ज्ञानमार्ग तेवढा सोपा नाही. कर्ममार्ग प्रकृती, परायण, ज्ञानमार्ग आत्मपरायण, तर भक्तीमार्ग प्रभु-परायण आहे.'' ज्ञानमार्गात सत्य वस्तूचे अन्वेषण होते तर भगवद्भक्तीने वस्तूस्वरूप केले जाते.

सगुणात निर्गुणाची प्राप्ती होते, परंतु निर्गुणात सगुणप्राप्ती होत नाही. केवळ महावाक्याच्या श्रवणाने प्रत्यक्ष दिसणारा संसाराचा भ्रम नाहीसा करणारा साक्षात्कार होणे शक्य नाही. परंतु ईश्वरभक्तीने व ईश्वरी कृपेने असा साक्षात्कार होऊ शकतो. ज्ञानी पुरुष, ज्ञानप्राप्तीनंतरही ईश्वरभक्ती करतात ती लोकोद्धाराकरता; आदर्श घालून देण्यासाठी असते. अशा ज्ञानीभक्ताचे वर्णन श्री ज्ञानेश्वरांनी बाराव्या अध्यायात (१८५:१९०) करताना म्हणतात - जो भक्त 'ते ब्रह्म मी आहे' हे जाणून द्वैताच्या पैलतीराला पोहचून कृतार्थ झाला तरी भक्ती-सुख भोगण्याकरता स्वतःलाच देव आणि भक्त असा विभागून स्वतःला सेवकपणाचा भाग घेऊन दुसऱ्या भागाला माझे नाव देतो- त्याला देव मानतो. ज्ञानीभक्त प्रेमपूर्वक उत्कृष्ट भक्ती स्वतः तिचे आचरण करून दाखवतो. ह्या ज्ञानोत्तर भक्तीची सहा प्रयोजने सांगितली आहेत.

१) लोकसंग्रहासाठी ज्ञान्याने स्वतः भक्तीचे आचरण केले असता इतर लोकही तशी भक्ती करतात.

२) ज्ञानोत्तर भक्तीमुळे ज्ञान्याचा अभिमान निःशेष होतो. 'मी ब्रह्म आहे' ह्या वृत्तीरूप ज्ञानाचा स्वरूपात लय होऊन तो ज्ञानबंधनातून मुक्त होतो.

३) भक्तीने भगवंताच्या सगुण रूपावर अखंड चित्त लागल्यामुळे इंद्रिये विषयांच्या संबंधातून होणारे दुःख टळते.

४) जीवनमुक्तावस्थेत ब्रह्मज्ञानाने अविद्येचे आवरण गेले असले तरीसुद्धा प्रारब्ध कर्म अवशिष्ट असेपर्यंत देहादी विक्षेप असतो. अर्थात कल्पित द्वैत राहते. त्यामुळे परमार्थात अद्वैत असले तरीसुद्धा त्या कल्पित द्वैतात भक्तीतचा विलक्षण सुखद अनुभव येतो.

५) ब्रह्मज्ञानाच्या पूर्वी ज्यांना सगुण साक्षात्कार झाला नसेल त्यांना तो होतो.

६) ज्ञानोत्तर भक्तीमुळे तो देवाला प्रिय असतो. देव त्याची न सांगता सेवा करतात. हे ह्या भक्तीचे सर्वात महान प्रयोजन आहे.

अशी ही षट्प्रयोजन भक्ती किती श्रेष्ठ आहे हे ज्ञानीभक्त, भक्ती न करणाऱ्यांना तिचे स्वतः आचरण करून दाखवतो. ज्ञानीभक्ताला जीव-परमात्म्यात कल्पित भेद असूनही परमार्थात अभेदाची प्रतिती येते. भगवंत म्हणतात, 'ज्ञानी भक्त माझा आत्मा आहे व मी त्याचा देह आहे'. 'ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।'

**भक्तांचे प्रकार :-** संत एकनाथांची भक्तीची कल्पना व्यापक असून केवळ देवाचे नामस्मरण वा कथाकीर्तन नव्हे तर सर्वांभूती भगवद् भाव ठेवणे ही त्यांच्या मते खरी भक्ती होय. त्यांनी भक्तांचे प्राकृत, मध्यम व उत्तम असे तीन विभाग करून वर्णन केलेले आहे. सर्वोत्तम म्हणजे ज्ञानीभक्त होय. त्याचे सर्वच संतांनी गोडवे गायले आहेत. ज्ञानोत्तर भक्तीचा महिमा गाईला आहे.

**१) प्राकृत :** हा कनिष्ठ प्रतीचा भक्त गणला जातो. 'जो जड भक्तु । तो जाणावा मुख्य प्राकृतु ।' असे नाथ सांगतात. नैमित्तिक पूजा-अर्चा सम्यक् प्रकारे व निष्ठेने करतो तो प्राकृत भक्त. पूजेच्या मूर्तीत देव आहे ह्या विश्वासाने तो पूजा करतो. पण परमेश्वराचे अस्तित्व सर्वत्र व इतर प्राण्यांमधेही आहे असे तो मानत नाही, त्यामुळे त्याला इतरांविषयी प्रेम वा आस्था नसते.

**२) मध्यम कोटीचा भक्त :** त्याचे ईश्वरावर प्रेम असते. तो इतर भक्तांसमवेत भजन-कीर्तन वगैरे करतो. त्यांची मैत्री, त्यांचा सहवास त्याला आवडतो. भगवद्भक्तांविषयी त्याच्या मनात प्रीति असते, मात्र तो मत्सरी माणसांकडे उपेक्षेने पाहतो. अज्ञानी लोकांवर कृपा दाखवतो. तो मध्यम कोटीचा भक्त होय.

**३) उत्तम भक्त :** जो सर्व भूतमात्रांमध्ये परमेश्वर पाहतो तो उत्तम भक्त होय. भागवतात त्याचे वर्णन केले आहे- 'त्याला ही सृष्टी ईश्वराची माया आहे हा बोध झालेला असतो, त्यामुळे विषयसेवनापासून निर्माण होणाऱ्या हर्ष, शोक इत्यादींची बाधा त्याला होत नाही. त्याच्या ठिकाणी 'अहं' बुद्धी नसते. तसेच भेद बुद्धीचा नाश झालेला असतो. तो सर्वांशी समत्वाने वागतो. सदा शांत व समाधानी असतो. ऐश्वर्य प्राप्त झाले तरी तो तल्लीन झालेला असतो भगवंताच्या नामस्मरणात. असा विवेकसंपन्न व लीन भक्त खरा श्रेष्ठ वैष्णव होय. तोच उत्तम भक्त होय. सर्वांभूती तो एकच परमात्मा पाहतो. नाथ म्हणतात, ''जे अनन्य हरिपाशी । हरि त्यांसी अनन्य सदा ।'' अनन्य शरणागता, स्व-स्वरूपाची सद्भावना आणि भगवंत वचनावर आत्यंतिक विश्वास ही उत्तम भक्ताची लक्षणे व उत्तम गुण आहेत. माझा एकांतिक व अनन्य भक्त, जप, ज्ञान, तप, वैराग्य, योगाभ्यास, दानधर्म इत्यादी जी मोक्षाची साधने सांगितली आहेत त्या सर्वांचे फळ सहज मिळवितो.

श्री समर्थ रामदास स्वामींनी भक्तांची चार प्रकारात विभागणी केली आहे. ते म्हणतात, 'पहिल्या प्रकारचे लोक धातू, पत्थर, मृतिका वगैरेंच्या मूर्ती बनवून त्याची पूजा करतात. दुसऱ्या प्रकारचे भक्त ईश्वरअवताराची पूजा व ध्यान करतात. त्यांच्या गुणांचे भजन-कीर्तन करतात वा श्रवण करतात. तिसऱ्या प्रकारचे भक्तजन असतात ते सर्वांतर्यामी वसणाऱ्या परमेश्वराची पूजा व सेवा करतात, जो विश्वव्यापी आहे, चैतन्यमय आहे व साक्षी आहे. तर चवथ्या प्रकारचे जन निर्गुण, निराकार अशा शुद्ध ईश्वराचे ध्यान करतात. अशा ह्या चार प्रकारच्या उपासकांना मूर्तीपूजक, अवतारपूजक, आत्मोपासक व कैवल्योपासक म्हणून संबोधिले आहे. शुद्धाचे उपासक शुद्धाला तर विकारी उपासक स्वत:च विकारी होतात.

ज्या त्रिगुणांचा मनुष्य बनला आहे त्या गुणांचा प्रभाव निर्णय घेणाऱ्या बुद्धीवर पडत असतो. सत्-रज-तमोगुणी व्यक्ती त्यानुसार विचार करून निर्णय घेत असते. ह्या त्रिगुण भेदानुसार भक्तांचे तीन प्रकारात विभाजन केले आहे ते असे: ह्यात ब्रह्मोपासक अर्थात श्रेष्ठ होय. विश्वच ब्रह्मरुप समजून सगुणोपासक भक्त व ब्रह्मबुद्धीस अवतारादीची उपासना करणारे यात येतात. सकाम बुद्धीने, ऋषी, देवता व पितर ह्यांची उपासना करणारे दुसऱ्या वर्गात येतात व क्षुद्र शक्तींची, देवतांची उपासना करणारे लोक तिसऱ्या वर्गात मोडतात. उपदेवता, भूतपिशाच्यांचे उपासक खालच्या वर्गात मोडतात.

ह्याव्यतिरिक्त सकाम भक्ती करणारे व निष्काम भक्तीचे वर्णन भगवंतानी गीतेच्या सातव्या अध्यायांत दिले आहे. चार प्रकारचे भक्त सांगितले आहेत. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, ज्ञानार्थी. अधिकारभेदानुसार केलेल्या ह्या भक्तींचे थोडक्यात वर्णन केले आहे की १) आर्ताने दु:ख निवारणार्थ केलेली भक्ती २) जिज्ञासूने ब्रह्मज्ञानासाठी केलेली भक्ती ३) अर्थार्थीने धनादिकरता व ४) ज्ञान्याने आवडीने केलेली भक्ती. ह्यापैकी ज्ञान्याची भक्ती दोन प्रकारची असते. ज्ञानोत्तर भक्ती व ज्ञानलक्षण भक्ती. सकाम भक्ती करणाऱ्या भक्तांत ज्यांच्या मनात भगवंताच्या प्राप्तीची तीव्र इच्छा निर्माण होते ही 'आर्तता' होय, तर परमेश्वराला जाणण्याची आस लागणे म्हणजे जिज्ञासा व फक्त अर्थाकरता परमेश्वराकडे मागणारे ते अर्थार्थी.

**भक्तीचा हेतू :** माणसाला अखंड सुख हवे असते. देहाद्वारे मिळणारी विषयसुखे क्षणिक आहेत ह्याचा अनुभवही तो घेत असतो. असा भ्रमनिरास झाल्यावर अखंडित सुखाचा शोध घेण्याचा ध्यास त्याला लागतो. अशा थोड्या व्यक्ती अंतर्मुख होऊन आध्यात्मिक विचारांचा मागोवा घेऊ लागतात. तेव्हा अखंडित सुखाची कामना धरणारा व अखंडित सुख, दोन्ही

जर अखंडित असतील, तर अखंडित सुखाची प्राप्ती होऊ शकते ह्याचा बोध त्याला होऊ लागतो. अन्यथा नाही ह्या निश्चयाप्रत तो येतो. जेव्हा त्याला ज्ञान होते की तो स्वतः अखंडित आहे, सुखस्वरूप आहे व ईश्वर अखंडित आहे तर अखंडित सुखाची प्राप्ती येथेच होऊ शकते, इतरत्र नाही. आम्ही जर ईश्वरावर प्रेम केले तर त्या प्रेमाशी एकरूप होऊन आम्ही त्याच्यासारखेच अखंडित व सुखरूप होऊ शकतो ह्या आंतरिक भावनेतून तो भक्तीमार्गाला लागतो. अखंड सुखाची प्राप्ती म्हणजेच मोक्ष होय. त्याच्या प्राप्तीसाठी परमेश्वराने कर्म-ज्ञान-भक्तीमार्ग सांगितले आहेत.

भागवतात म्हटले आहे की ज्याचे चित्त फक्त ईश्वरावर केंद्रित व आसक्त झाले आहे, अशा भक्ताला दोन गोष्टी प्राप्त होतात. मन वासनारहित होते व सुखदुःखादी भोग निर्विकारपणे भोगण्याची क्षमता प्राप्त होते. श्रीमद्शंकराचार्यांनी म्हटले आहे की कलीयुगात मनात सदैव अखंड नामस्मरण करणे हाच वैदिक धर्मात सर्वश्रेष्ठ धर्म आहे (आचार्य भाष्य : विष्णु श्लोक :८). महाराष्ट्रातील बहुतांशी संप्रदाय जरी अद्वैत मतवादी असले तरी सर्वांनी ईश्वराच्या नामस्मरणावर आत्यंतिक भर दिलेला आढळतो. भगवद्‌भक्त असलेल्या नामधारकाच्या अंतःकरणात परमेश्वराविषयी प्रेम उत्पन्न होते. ईश्वराच्या लीला श्रवण करून व कीर्तनाने मुमुक्षूमध्ये आत्मतत्वाला ग्रहन करण्याची क्षमता येते. भगवान श्रीकृष्णांनी उद्धवाला उपदेश करताना म्हटले आहे की, ''अंजनाने नेत्रदोष जाऊन दृष्टी साफ होते. डोळे सूक्ष्म वस्तू पाहू शकतात, त्याप्रमाणेच माझी लीलावर्णने श्रवण केल्याने, कीर्तनाने जसजशी मनाची व अंतःकरणाची मलीनता नष्ट होत जाईल तसा तो ह्दयांतर्गत असलेले आत्मतत्त्व ग्रहण करण्यास सक्षम होईल.

**भक्तीसंप्रदायाचा विकास व तत्त्वे :** भक्तीसंप्रदायात व पंथमतानुसार भक्तीची विविध साधने सांगितली असली तरी त्यात दोन तत्त्वे प्रामुख्याने आढळतात; ती म्हणजे श्रद्धा व भक्ती. वास्तविक ही दोन वेगवेगळी तत्त्वे नव्हेतच, कारण श्रद्धेशिवाय भक्ती निर्माण होत नाही. विभिन्न पंथ-संप्रदायात साधारण तत्त्वे समान आहेत. भक्तीकल्पनेचा सूत्रपात प्रामुख्याने भागवतापासून भासत असला तरी भगवद्गीतेत भक्तीला योगाचे स्थान दिले गेले आहे. त्यापूर्वी भक्ती हा शब्द श्वेताश्वतरात आलेला असला तरी त्याचे विकसित रूप भगवद्गीतेत दिसते. पुढे त्याचा विकास व उत्कर्ष भागवतात झालेला आढळतो. श्रद्धेची कल्पना ऋग्वेदाइतकीच जुनी आहे.

भक्ती आणि प्रेम ही कल्पना पुढे मधुरा भक्तीच्या तत्त्वज्ञानात प्रसूत होताना दिसते. दक्षिणाचारी पंथियांमध्ये भक्तीत येणारी दुसरी भावना आत्मसमर्पणाची किंवा निवेदनरुपी पश्चात्तापाची होय. आत्मनिवेदन, अहंकार, दमन व श्रद्धा ह्या भावना समाजात दृढ झाल्यामुळे निकोप समाजविकासासाठी, उन्नतीसाठी लागणारे नीतीशास्त्र भक्तीतूनच विकसित झाले. दुसरे म्हणजे भक्तीपूर्वक ईश्वराची सेवा करावी ह्या तत्त्वामुळे फार मोठे सामाजिक कार्य साधले आहे, ते म्हणजे सर्व थरातील लोकांच्या व बहुजन समाजाच्या सक्रिय सहभागामुळे एकात्मता साधली गेली. भक्तीची भक्ती समाजाला उमगावी ह्यासाठी भक्ती-शक्ती-मुक्ती ह्या त्रयींचा संगम आणि समन्वय घडविणाऱ्या भागवत धर्माचा उपदेश संतांनी व नाथांनी स्वतः त्याचे आचरण करून, अनुभव घेऊन केला.

संत एकनाथांनी जनजागरणाचा वसा घेऊन भागवताचे अलौकिक तत्त्वज्ञान मराठी भाषेत आणून सामान्य लोकांनाही आकलन होईल अशा सुबोध शैलीत अद्वैताचा डाव मांडला. त्यावेळच्या अधःपतीत समाजाचे चित्तवेधक समालोचन त्यांच्या वाङ्मयात केलेले आढळते. धार्मिकतेच्या नावाखाली चाललेली लूटमार, अनाचारी, भ्रष्ट पुजारी, कथेकरी यांनी देवाच्या नावाने मांडलेला बाजार, त्याबरोबरच क्षत्रियांच्या अरेरावीने बहुजन समाजाला गर्तेत लोटले होते. अशा अवनीतीच्या काळी संतांनी बहुजन समाजाला नवा मार्ग दाखवला. दिशाहीन समाजाला दैनंदिन जीवन जगण्याकरता ईश्वरावरील विश्वासाची बैठक दिली. त्यांनी खरेखुरे जनजागरण केले.

भक्ती हे भक्तीपंथातील दुसरे तत्त्व होय. वैयक्तिक देवतेची भक्ती हे वैशिष्ट्य व त्याबरोबर गुरुला देवस्वरूप समजून त्याची भक्ती, सेवा करणे हा विशेष होय. ह्या विचारातून गुरुचे आणि ईश्वराचे नाम तारक आहे, ही भावना रुजली गेली. त्यामुळे समाजाला स्वतःपेक्षा वेगळे असे मोठे तत्त्व आहे ह्याची जाणीव प्रेरणादायक ठरली. अधःपतनाच्या व संक्रमणाच्या काळात निराशेने घेरलेल्या समाजाला ईश्वर-गुरुभक्तीचा फार मोठा आधार मिळाला. निराशेतून होणाऱ्या अधःपतनापासून समाजाला संरक्षण लाभले. निराशाजनक वर्तमानकाळ, परंतु पुढील काळ चांगला असेल, हा विश्वास रुजला. भजन-कीर्तनादीने दैनंदिन जीवनातील दुःखाचा होणारा निरास ह्यामुळे समाधानी वृत्ती निर्माण झाली. ह्या दोन्ही गोष्टींमुळे समाजात समता व एकता निर्माण होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. एकसंघ समाज निर्माण होण्यास त्यामुळे मदत झाली.

सामान्यत: समजूत अशी की भक्तीने माणूस निष्क्रिय, भोळा, आळशी बनतो, त्यामुळे तो शक्तीहीन व निरुपद्रवी बनतो. वस्तुत: संतांची शिकवण आहे, ती अंगी सामर्थ्य बाणवण्याची व पराकाष्ठेचे प्रयत्न करण्याची. दुबळेपणाचा उपदेश कोणीही केलेला नाही. पण आता अशा गैरसमजुतींना फारसा वाव राहिलेला नाही. त्याचे निराकारण व स्पष्टीकरण विद्वान पंडितानी केले आहे. ईश्वरावरील विश्वास माणसाला जीवनात कितीतरी उपयुक्त ठरतो. सांसारिक कर्तव्य-कर्मे ईशबुद्धीने केल्याने येणारी समता व ईश्वर पाठीशी आहे ह्या भावनेने येणारा विश्वास माणसाला कोणतेही संकट वा दु:ख सहन करण्याची ताकद देण्यास समर्थ होतो. भक्तीमध्ये नीती, प्रीती, समदृष्टी अभिप्रेत आहेत. परिणामी निर्दोष, व स्वच्छ मतांच्या व्यक्तींमुळे सामाजिक नीतीमत्ता वाढून समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. भक्तीत प्रचंड सामर्थ्य आहे ह्याला महाराष्ट्राचा इतिहास साक्षी आहे. भारताच्या एकात्मतेचा अनुभव भक्तीमधून प्रगट झालेला दिसेल. भक्तीने दुभंगलेला समाज एकसंघ झाला असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्याचे कारण भक्तीमार्गात विभिन्न पंथ असले तरी त्या सर्वांमध्ये साधारण तत्त्वे समान आहेत. श्रीरामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य आणि चैतन्यमहाप्रभू हे पंथांचे प्रमुख होत. त्यांची तत्त्वे भक्तीप्रधान असल्याने सर्वसाधारण बहुजन समाज त्याकडे लगेच आकृष्ट झाला. मग समाजाच्या सर्व थरात, तळागळात, सर्व भारतात भक्तीमार्गाचा प्रचार व प्रसार झपाट्याने होत राहिला. ठिकठिकाणी भक्तीकेंद्रे व मठादींची स्थापना होऊ लागली. मध्ययुगात झालेल्या ह्या धार्मिक क्षेत्रात झालेल्या उलथापालथीचा भारतीय समाजजीवनावर खोलवर परिणाम झाला. ईश्वराची द्वारे सर्वांना मोकळी आहेत, तेथे भेदभाव नाही, हा स्वानुभवाने आलेल्या प्रचितीचा उपदेश सुलभ भक्तीच्या माध्यमातून सांगून संतांनी स्वत: आचरण करून केला. संतांनी अशाप्रकारे देशाच्या एकात्मतेचे एक वेगळे चित्र उभे केले. पू. विनोबाजी म्हणतात, ''भक्तीभावाचा आधारच भारताला एकत्र ठेवणारी व भारताला जगाशी जोडणारी कडी आहे.''

संस्कृतीचा आधार भक्ती नाही असा कोणताच प्रांत भारतात आढळणार नाही. भारतातील प्रमुख भाषांतील सर्वोत्तम साहित्य भक्ती व अध्यात्मपर वाङ्मयात आढळते. चौदाव्या शतकानंतर धर्मग्रंथ, दर्शनशास्त्रे ह्यांच्या अभ्यासाला उतरती कळा लागली होती. बंदिस्थ ज्ञानप्रवाहाला मोकळे केले ते भक्तीच्या आविष्काराने. सर्वसामान्यांना बंद असलेली ईश्वरीय ज्ञानाची दारे संतांनी सर्वांसाठी उघडून दिली. भारताच्या सर्व भागात व थरात भक्तीगंगेचा ओघ अविरत वाहू लागला. विश्वव्यापी मानवधर्माचा जणू त्यांनी पाया रचला. आधुनिक संतांनी, संतपुरुषांनी वैदिक धर्माचे विश्व्यापी स्वरूप व विचार जगासमोर प्रभावीपणे मांडले. त्याबरोबर भक्तीचे कार्यक्षेत्र देश-काल मर्यादित राहिले नाही. कारण भक्तीचे अधिष्ठान प्रेम व निष्कामतेने मानवाची सेवा करणे हे आहे. हाच मानवतावादी दृष्टिकोन भविष्यकाळाचा मानवताधर्म व पर्यायाने विश्वधर्म असणार आहे.

तसे पाहिले तर भक्तीरसाची गंगा दक्षिण भारतात दहाव्या शतकापूर्वीच वाहू लागली होती. महासाधू अळवार व त्यांच्या भजनांना, गाण्यांना 'वैष्णव वेद' हे नामाभिधान प्राप्त झाले होते. आचार्यांनी भक्तीला तत्त्वज्ञानाचे स्वरूप दिले. तेलंगणामध्ये निम्बकाचार्यांनी (इ. स. ११५०) राधाकृष्ण संप्रदायाची स्थापना केली. सोळाव्या शतकात मीराबाईने भक्तीचा प्रसार वृंदावनातून केला. गुजराथ-सौराष्ट्रात नरसी मेहता ह्या साक्षात्कारी संताने आपल्या भक्तीने तेथील जनांना कृष्णप्रेमाचे वेड लावले. महाराष्ट्रात भक्तीची अमृतधारा ज्ञानदेव-तुकारामादी संतांनी घरोघरी नेली. बंगालमध्ये चैतन्य महाप्रभूंनी भक्तीसागराला भरती आणली. चांडाळ-ब्राह्मण सारे त्यात एकत्र डुबले. रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, निम्बकाचार्य ह्यांनी भक्तीचे तत्त्वज्ञान परीपूर्ण शास्त्र बनविले. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वांभूती परमेश्वरच भरलेला आहे असे प्रतिपादून मूर्तीपूजेला-सगुणोपासनेला अधिक साधे, सोपे, सुटसुटीत रूप दिले. पंजाबात गुरू नानकांनी लोकांना श्रद्धा-भक्ती दिली. तामिळनाडूमध्ये तिरु कुरल, तिरु वाचकम्, तिरुपावै इत्यादी शैव-वैष्णवांचे भक्ती-रसप्रद ग्रंथ श्रद्धेने घरोघरी वाचले जातात.

वैष्णव पंथात विष्णू हे प्रमुख दैवत असल्याने त्यांच्या दर्शनातही भगवद्गीता, भागवत पुराण हे प्रमुख अभ्यास ग्रंथ आहेत. मधुरा भक्तीत आणि पुष्टी मार्गातील उपासना पद्धतीत राधा आणि कृष्ण ह्यांचे विशेष महत्त्व आहे. रामपंथीयात वाल्मिकी रामायणाबरोबर तुलसी रामायणलाही विशेष मान्यता आहे. ह्यानंतरचा पंथ, ज्याला सुधारणावादी पंथ म्हणता येईल त्यात कबीर पंथाचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील संतांनी अध्यात्मवादी व भक्तीपर साहित्य वाङ्मय लोकाभिमुख व समृद्ध करण्याची महनीय कामगिरी केली आहे. सारे संत, तत्त्वज्ञ, प्रतिभावंत, साक्षात्कारी पुरुष

होते. भक्ती त्यांच्या साहित्याचा आत्मा व स्फूर्तीस्थान होते. भक्तीविषयींच्या त्यांच्या उत्कट भावनांचा आविष्कार त्यांच्या काव्यात झालेला आहे. ईश्वरावरील प्रेम, विश्वास, अढळ श्रद्धा काव्यातून प्रगट झाली आहे, ती त्यांना आलेल्या अनुभवातून. हे प्रचितीचे बोल आहेत म्हणून ते अंत:करणात रुजतात. त्यातील सत्यता पटते. मुकुंदराव (इ. स. १०००) आपल्या विवेक सिंधूमध्ये परमेश्वराविषयी म्हणतात, ''जो सगुण आहे तोच परमात्मा जाणा, त्यालाच परमपुरुष माना. तोच सर्वात्मा, सर्वसाक्षी व तोच सर्वांच्या अंतर्गत वसत आहे. तो आपल्या भक्ताची कधी उपेक्षा करणार नाही.''

वामन पंडित भक्तीचा गौरव करताना म्हणतात, 'भक्ताला भक्तीच्या तुलनेत मुक्ती तुच्छ वाटते. भगवान स्वत: त्याला मुक्ती देतात. मुमुक्षूला मुक्तीची इच्छा असते, परंतु भक्ताला त्याचीही नसते. तो नामातच मुक्ती पाहतो.' 'यथार्थ दीपिकेत' ते लिहितात - 'सर्वात्म भक्तीची दृढतांच ज्ञानाच्या परिपक्वतेचे लक्षण आहे. त्यालाच नीजप्राप्ती असे नाव दिले आहे. तर भक्तकवी श्रीधरस्वामी म्हणतात, 'सद्गुरुशिवाय परमार्थ शक्य नाही. पाण्याविना बीजाला अंकर फुटेल का?' दुसरे भक्त कवी अमृतराव म्हणतात, 'कनक-कांचिनी जो त्याग करतो तोच खरा भक्त.' एकमात्र विठ्ठलाला जाणणे भक्ती व ज्ञान आहे, असे माऊली सांगते व नाथ सांगतात, 'हा नरदेह प्राप्त झाला आहे तर भगवद्भक्ती करून निजात्म लाभ प्राप्त करून घ्या.' भुक्तेश्वर म्हणतात, 'सत्याशिवाय धर्म नाही, सत्यच धर्म आहे. परमेश्वर नेहमी सत्याजवळ राहतो', असा स्वधर्म व सद्विवेकाचा उपदेश करतात. मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ आहे असे कितीतरी अभंग तुकारामगाथेत आहेत. ते म्हणतात, 'मुक्ती मिळाली म्हणजे प्रगतीचा मार्गच खुंटतो. भक्तीमध्ये चढती प्रगती आहे म्हणून नित्य नवा उत्साह आहे.' जाणतेपणा म्हणजे ज्ञान, नेणतेपणा म्हणजे भक्ती. जाणून नेणतेपणा म्हणजे ज्ञान-भक्ती. 'जनी' जाणता भक्त होऊनी राहे । असे रामदास स्वामी सांगतात. 'नाम घेता न लागे मोल । नाम मंत्र नाही खोल । दोचि अक्षरांचे काम । उच्चारावे राम राम ॥ (समर्थ) ह्यासाठी संतांच्या शब्दांवर विश्वास हवा. मग रामनाम सहज अंत:करणात रुजते; कसे ते नामदेव सांगतात, ''संत-चरण-रज सेविता सहजा वासनेचे बीज जळोनि जाय । मग राम-नामी उपजे आवडी!'' मुक्ताबाई, जनाबाई, सेना न्हावी, गोराकुंभार, चोखामेळा अशा थोर ८०० तरी संतांच्या भक्तीपर ओव्या महाराष्ट्रात खेडोपाडी लोकांच्या मुखात रुजलेल्या, रुळलेल्या आहेत.

'श्रीमद्साईसच्चरिता'चे सूत्र व श्रीसाईबाबांच्या उपदेशाचे सार 'भक्ती'त आहे, ती शक्ती आहे. मानवताधर्माचा आधार आहे. ती सर्वसमन्वयी तशीच सर्वसमावेशक व सर्वोधारक आहे. म्हणून तिला देश-कालाचे, मानववंशाचे बंधन नाही. कारण तिचे अधिष्ठान प्रेम आहे. मानवाची ईश्वर समजून निरपेक्ष वृत्तीने व प्रेमाने सेवा करणे हा तिचा धर्म आहे. म्हणून पू. विनोबाजी म्हणतात, 'भक्तीमार्ग विश्वपावन आहे आणि त्यातल्या त्यात पतित पावन आहे. मुक्ती हे साध्य आहे, पण परम साध्य नव्हे. परम साध्य भक्ती. शिवाय मुक्ती हे साध्य आहे असे मानले तरी त्याचे भक्ती हेच सर्वोत्तम साधन आहे. आणि साधकाला साध्यापेक्षा साधनच अधिक महत्त्वाचे आहे. 'उपाये अधिको यत्न: कर्तव्य:।' ह्याही दृष्टीने मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ आहे. मुक्तीत अधिकार भेदाचे लचांड आहे. भक्तीचा अधिकार सर्वांना आहे. देवाला भक्त अत्यंत प्रिय आहे.

भक्तीचा असा साकल्याने विचार केल्यानंतर श्रीसाईबाबांच्या भक्तीच्या उपदेशातील रहस्य कळते. सर्वांमध्ये ईश्वर वास करतो, तेव्हा सर्वांवर प्रेम करा. प्राणिमात्रांवर दया करा. 'मी'च सर्वांच्या ठिकाणी आहे, हे तर्रखांच्या कथेत अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणून ते म्हणतात, मला फक्त तुमचे प्रेम हवे आहे. तुमचा शरणागत भाव व भक्ती हवी. मग मी तुमच्या मागे-पुढे, सांभाळ करण्यास सदैव उभा आहे. माझ्या भक्ताच्या घरी कधी अन्नवस्त्रादीचा तुटवडा पडणार नाही. भगवान श्रीकृष्णांच्या वचनाची आठवण होते. 'एका शरण ये मज, मग तुझा योगक्षेम मी चालवीन.'श्रीसाईबाबा ह्यासाठी सांगतात, ''मात्र माझे करा स्मरण । विश्वास युक्त अंत:करण । ठेवा करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ॥'' (२५:१०८). ''मी डोळ्याआड झालो आहे हा भ्रम काढून टाका. मी सर्वत्र आहे.'' ''माझिया प्रवेशा। नलगे दार । नाही मज आकार ना विस्तार । वसे निरंतर सर्वत्र ॥'' (२८:१९९) ''माझी हाडे ऐकाल बोलता । हितगुज करिता तुम्हा सवे ॥'' ह्याचा अनुभव साईभक्ताला केव्हा ना केव्हा आलेला असणार म्हणून आज शिरडी महान क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस येत आहे. शिर्डीला मुंग्यांसारखी रीघ लागेल, हे बाबांचे शब्द आहेत. 'श्रीसाईसच्चरित' वाचताना चिंतन, मनन करायचे ते भव्य-दिव्य चैतन्याचे, जे निर्गुण-निराकार होते, ते भक्तांच्या प्रेमासाठी सगुण होऊन शिर्डीत अवतरले. त्यांचेच चरणी प्रार्थना करायची की तुमच्या भक्तीचा उदय आम्हामध्ये होवो, हाच कृपाप्रसाद द्यावा.

०००

# संतभक्तांचा विश्वधर्म

– डॉ. अ. प्र. कामत

❖❖❖

**वसुधैव कुटुंबकम् ही आपल्या देशाच्या अतिप्राचीन संस्कृतीची एक मूलभावना आहे. ऋषिमुनी, आचार्य पंडित आणि संतभक्तसत्पुरुष यांनीही वैश्विक दृष्टी नित्य जोपासली आणि या भूमीत ती रुजविण्याचा प्रयत्न, केला. इथं अनेक ज्ञातिपंथाचे लोक आले. कधी संघर्षही झडले. पण पुढे ते इथले होऊन राहिले आणि त्यांना येथील लोकसंस्कृतीने आपलेही मानले.**

**अलिकडे याचा काहींना विसर पडल्यासारखे दिसते. प्रांतिकता आणि संकुचित स्वार्थसाधना यांच्या बळावरच मोठे झालेले लोक याचा अनुचित लाभही घेताना आढळतात.**

**या कटु वास्तवावर मात करण्यासाठी प्रथम आपणच आपला उदात्तमंगल वारसा नीटपणे आठवला, सांभाळला पाहिजे.**

**स्वास्थ्यसंपन्न प्रतिष्ठित नागरिकांचे आजच्या घडीला ते एक मोठेच कर्तव्य ठरते.**

❖❖❖

आज भ्रष्टाचार राजमान्य झाला आहे असे वाटावे, इतक्या चमत्कारिक बातम्या रोज दूरदर्शनवृत्तपत्रातून ऐकायला-वाचायला मिळतात. भ्रष्ट-दुष्ट-नष्ट वृत्तीची खुजी माणसं मुर्दाडपणाने समाजात वावरतात. अस्मिताशून्य आणि बिनचेहऱ्याची पुष्कळ माणसं त्या बिनदिक्कत वृत्तीच्या मंडळींना शरण जातात. सर्वच क्षेत्रात एक प्रकारचा बधीर, बोटचेपेपणा आढळतो. शिक्षणासारखे पवित्र क्षेत्रही याला अपवाद राहाते आहे असे दिसत नाही. या सर्वांच्या जोडीला प्रांतवाद, पंथवाद, अतिरेक अत्याचारही आहेतच... शहाण्याने एखादा मार्ग शोधायला जावे तर त्याचादेखील मार्गच बदलतो ! इतक्या आसुरीशक्ती बळकट बनल्या आहेत.

अशा विपरित वातावरणात 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही ।. मानीयले नाही बहुमता ।' असे रोखठोकपणे सांगणारे आणि त्याप्रमाणे वागणारे संत सज्जन आपल्याला आठवतात. 'मना सज्जना भक्ति पंथेचि जावे' असा उद्घोष करणारे संतभक्त सज्जन समर्थ होते. आज सज्जन दुबळे दिसतात. समर्थ म्हणविणारे सज्जनपणापासून दूर असतात. 'हे घरचि माझे विश्व' ही भावना अनेकांमध्ये बळावते आहे. अशावेळी 'हे विश्वचि माझे घर !' असा उद्घोष करणाऱ्या संतांचा मार्ग स्मरून तो अनुसरण्यासारखा आहे.

संतांनी आत्मज्ञानाचा/अध्यात्माचा अवश्य सांगावा सांगितला. पण त्याहूनही त्यांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी आत्मभानाला अधिक महत्त्व दिले. जनाबरोबरच मनाचेही जागरण घडविले.

संत विश्वराज्याचे विनम्र उपासक होते.

## ॥ आपला सांस्कृतिक वारसा ॥


भारतीय संस्कृतीची आणि विशेषकरून सनातन वैदिक धर्माची काही ठळक वैशिष्ट्ये आज पुन्हा ध्यानात घेण्यासारखी आहेत. या धर्माने कुणा एकास प्रेषित मानले नाही किंवा कोण्या एकाचा वा अनेकांनी मिळून तयार केलेला एकच एक ग्रंथच सर्वथा प्रमाण मानला नाही. वेद, उपनिषदे, पुराणे, महाभारत, रामायण आणि आधुनिक भारतीय भाषांतील यांच्या ज्ञानदेवी, नाथभागवत, दासबोध, तुलसीरामायण, गुरुग्रंथसारख्या अनेकानेक अनुकृतींना त्या त्या प्रदेशात धर्मग्रंथांचीच मान्यता मिळालेली आहे. आजही असंख्य लोक या धर्मसंकीर्तनग्रंथात रमून आहेत.

निसर्गपूजा हा आणखी एक आपल्या संस्कृतीचा मोठा विशेष आहे. आपल्या देवदेवता आणि त्यांच्या अर्चना-प्रार्थना, आपले उत्सवसण आणि आपल्या यात्रा-जत्रा यांचे निरीक्षण केले म्हणजे ही आपली निसर्गप्रीती अनेक परींनी स्पष्ट होऊ शकते. देवावतार कथागाथांचा मतितार्थ उकलतो.

गुरुपरम्परा, गुरुमहती हीदेखील एक आपल्या संस्कृतीचीच वैशिष्ट्यसंपन्न बाब म्हणता येईल. आपण एखाद्या

अधिकारसंपन्न, व्युत्पन्न, सिद्ध नरनारायणाला सद्‌गुरु म्हणून मानतो आणि त्याला अनुसरत आपापले जीवन चरितार्थ करीत असतो. यात केवळ विभूतिपूजाच असते असे नाही. श्रद्धा, विनम्र वृत्ती, मानवी मर्यादाही असते.

सहिष्णुता, सर्वाविषयी स्नेह, सद्‌भाव हेसुद्धा भारतीयांचे एक बलस्थान ठरते. आपल्या देशात शक आले, कुशाण आले, हूण आले, पारसीक आले. इथले होऊन राहिले. इथे अनेक धर्मपंथ निर्माण झाले. कितीतरी वंश आहेत. सारे गुण्यागोविंदाने एकत्र नांदतात. इथे कधी आपापसात मतभेद झाले. पण मनभेद कायमचे कधी झाले नाहीत. परस्पर सामंजस्य हा आपला वारसा ठरला आणि म्हणूनच धार्मिक कट्टरता, अतिरेकी राष्ट्रवाद, हुकूमशाही इथे कायमची रुजत नाही. क्वचित कुणी तसे करायचे म्हणाले तर त्याला यश लाभत नाही. समाजपुरुष बंड करतो. एखादा नामदेव, कबीर, एकनाथ, तुकाराम अथवा टिळक, गांधी त्यातून पुढे येतो.



सर्व धर्मग्रंथातील सारभूत अंश शोधीत राहून त्याचा विधायकरीतीने विचार करणे, सर्वधर्मसमन्वयाची वृत्ती जागी ठेवणे, सृष्टी आणि तिचा निर्माता यांचेविषयी प्रेमाधार असणे, जीव-जगत् अन् जगदीश्वर यांचे सामंजस्य पाहणे, सहिष्णु भावनेने साऱ्या विश्वसमाजाकडे-भूतमात्राकडे पाहणे-अशा सर्व अभिमानास्पद भारतीय गुणसंपदेचा वारसा मुख्यत: संतभक्तजनांनी पुढे नेण्याचा उत्कटरीतीने प्रयत्न केला. आजच्या लोकशाही युगाच्या आधी काही शतके आपल्या देशात प्रांतोप्रांती संतांनी आध्यात्मिक लोकशाहीची मूल्ये जगून दाखविली.

## ॥ तीन थोर परम्परा ॥

भारतीय संस्कृतीचा वारसा मुख्यत: तीन पुरातन परम्परांनी मनोभावे सांभाळला. त्यापैकी पहिली ऋषिमुनींची आहे. मनीषीचिंतकांची आणि विद्वान आचार्यांची आहे. त्यांनी प्राचीन काळी सामान्य जनजीवनापासून दूर वनउपवनात आश्रमीय जीवनसाधना स्वीकारून सृष्टी आणि मानवतेचा सखोल विचार केला. महान वैचारिक वाङ्मयरचना केली. ती वेदवाणी वा देववाणी म्हणून मान्यता पावली. याच परंपरेत पुढे अनेक तर्कपटु आचार्य आणि दार्शनिक झाले. त्यांनी तर्कपद्धतीने नाना सिद्धांत मांडले. दर्शने प्रतिष्ठित केली. जीवनशास्त्र सांगितले.

दुसरी परंपरा काव्यशास्त्री पंडितांची/अभिजनांची आहे. यांनी आचार्यांप्रमाणे पाँडित्याला महत्त्व दिले. कधी राजाश्रय स्वीकारून हे ज्ञानसाधना करीत राहिले. यांनी मुख्यत: ज्ञान आणि काव्य, शास्त्र आणि कला यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. कुणी रसचर्चा केली. काव्यसिद्धान्त स्पष्ट केले. कुणी आचार्यांच्या अभिजात तात्त्विक वाङ्मयसंपदेवरून भाष्यग्रंथही रचले.

या दोन महान ज्ञानसाधक परंपरांबरोबर एक अन्य मोठी लोकपरंपरा आपल्याकडे आढळून येते. ती गावगाड्यातील अठरापगड ज्ञातीतून आलेल्या बहुजन आचारक-विचारकांची आहे. हे लोक कधी अशिक्षितही होते. पण सारे सुसंस्कृत होते. यांचा भर प्रतिष्ठितांच्या भाषेपेक्षा लोकभाषेवर होता. लोकांशी संबंधित कला, उत्सव, यात्राजत्रा, तीर्थस्नाने यांना भावली. त्यांनी लोकांसह, लोकांसाठी, लोकभाषेतून लोकानुभव मांडले. अलौकिकरीत्या ही साख्या/साक्षी नोंदविल्या. यांनी पुरातन भारतीय ज्ञानाचा उदात्तमंगल वारसाही साऱ्यांना खुला केला. ते मुख्यत: लोकाश्रयानेच राहिले. लोकांनीही त्यांना 'नरनारायण' म्हणून श्रद्धापूर्वक पाहिले.

आपल्याकडे देवावताराची कल्पना केली आहे. भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णाने आश्वासनही दिलेले आहे. ज्या ज्या काळात धर्माला ग्लानी येते, आसुरी शक्तींचे दैत्य प्रभावी होतात, सुजनांना जाच होतो, त्या त्या काळात ईश्वर अवतार ग्रहण करतो, मानवात वावरतो. त्यांची दु:खं पीडा दूर करीत असतो. हे कार्य कधी शिवशंकर महादेवांनी केले, कधी भगवान विष्णुरूप श्रीकृष्ण अथवा मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्रांनी केले... मध्ययुगात अशाच रीतीचे कार्य महात्मा बसवेश्वर, योगीराज ज्ञानेश्वर, भक्तश्रेष्ठ नामदेव, समन्वयशील एकनाथ,

गोस्वामी तुलसीदास, जननायक कबीरदास, गुरूनानकदेव अशा महामानवांनी केले.

अशा संतांची अखंड परंपराच आपल्या देशाचा वास्तविक सांस्कृतिक इतिहास घडविणारी ठरली आहे. राजेमहाराजे आले आणि आपापली राज्ये सांभाळून-गमावून गेले. काहींनी उदंड ऐश्वर्य भोगले. पण जनमाणसावर कायमचे अधिराज्य या देशात संतमहात्म्यांचेच राहिले. लोकांनीच त्यांचे काव्य-कार्य ध्यानी घेतले आणि आपापले कर्तव्यकर्तृत्व कसे करावे त्याचा बोध ग्रहण केला.

अन्य देशात इतकी जुनी आणि अशी निरंतर संतमहंतांची परंपरा किती नांदत राहिली कल्पना नाही. इथे मात्र ती आजही आहे. ती केवळ या देशाची म्हणूनच नाही. साऱ्या जगाची म्हणूनच आहे.

## ॥ संत सज्जन कोण ? ॥

संतभक्त कोण होते ? ते ईश्वरनिष्ठ होते. सत् म्हणजे सद्यस्थिती आणि शाश्वतता दोहोंचा ध्यास असणारे होते. ते शांतनिवांत वृत्तिदृष्टीने विचार करीत. पण ते केवळ तत्त्वचर्चा करणारे वा विचार मांडणारे विचारक नव्हते. ते आचार करीत. तो करता करता विचार करीत. त्यामुळे त्यांच्या उच्चाराला मंत्राक्षरत्व प्राप्त झाले.

संतांपाशी ईश्वरतत्त्वांबद्दलचा अनन्य भक्तिभाव आणि भूतमात्रांविषयींचा उत्कट प्रेमभाव नांदत होता. जीव, जगत आणि जगन्नियंता यात त्यांनी ऐक्य अनुभवले. त्यांचे देवानुभव अथवा आध्यात्मिक साक्षात्कार त्यांच्या काव्यातून साकार झाले आहेत. दिव्यता आणि मानवता, अलौकिकता आणि स्नेहसद्भाव, अद्भुत अनुभूती आणि अपार करूणा-सहानुभूती यांचा मनोज्ञ संगम त्यांनी साधला होता.

संत आत्मज्ञानी होते. पण आत्मज्ञानाबरोबरच आत्मभान, हे खरे त्यांचे बळ होते. ज्ञानदेवांनी अशा महामानवांबद्दलच हे म्हटले आहे. ज्यांना परमानुभवाची कृतकृत्यता लाभली त्यांनाही जनलोकांसाठी काही कार्यकर्तव्ये करावयाचे असते :

**देखे प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले ।**
**तयाहि कर्तव्य असे उरले । लोकांलागी ॥**

(ज्ञा. ३.१५५)

अशा लोकहितैषी संतांमध्ये करूणा, मैत्री, प्रेम आणि निःश्रेयता असते. 'साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले' अशी त्यांची रीती असते. 'ऐसी हे सत्यनिष्ठांची जाती । लाभावीण करी प्रीती' ही त्यांची नीती दिसते.

संत सारे लोकसमाजाकरिता करतात. त्यांनी देवकल्पनेचे आणि भक्तिपंथाचे सुलभीकरण नामसाधनेद्वारे केले तर उदात्तीकरण व्यक्तिगत देवानुभूती-कथनातून केले.

## ॥ आधी कळस मग पाया ! ॥

आज आपण व्यक्तिवादी युगात वावरतो. व्यक्ती आणि व्यक्ती/तिचे निकट नातेगोते/फारतर परिवार/ज्ञाती इतकीच आपल्या संबंधांची व्याप्ती राहते. एखाद्याला व्यक्ती-ज्ञाती-समाज-देश अशी उन्नती करता येते. मग समाजवादी, मानवतावादी असा आपण त्यांचा गौरव करतो. संत याबाबतीत अगदी कळसाकडे पोहोचले. व्यक्ती आणि व्यक्ती, व्यक्ती आणि व्यष्टी किंवा समाज, यापलीकडे ते व्यक्ती आणि अवघे विश्व या नात्यापर्यंत गेले. ज्ञानदेवांनी म्हटले :

**हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपणचि जाहला ॥**

असा साऱ्या सृष्टीकडे समदृष्टीने पाहणारा माणूस 'संत' होय. 'जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत' असा त्यांचा विशाल भाव असतो. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद सारे अमंगळ' अशी त्यांची व्यापक दृष्टी असते. समर्थ रामदासांनीही जनाशिवाय 'भजन' नाही असे म्हटले:

**भेटो कोणी येक नर । धेड महार किंवा चांभार ।**
**त्याचे राखावे अंतर । तया नाव भजन ॥**

माणूस सारा एक. उच्चनीच, जातपात मानू नये. प्रत्येकाचे मन ओळखायला शिकावे. मनापासून वागावे. सर्वात ईश्वराचा अंश पाहावा. अशी उदात्तमंगल धारणा म्हणजेच धर्म. संतांनी आचारः परमोधर्मः हे तत्त्व स्वतः आचरले. आधी केले मग सांगितले.

आज आपण विज्ञानाचे महत्त्व मानतो. काय दिले विज्ञानाने ? काही तांत्रिक ज्ञान, काही सुविधा दिल्या. सृष्टीचे अनेक प्रकारचे ज्ञानही दिले. पण संत यापुढे जातात. ते आपल्याला जीवनदृष्टी देतात. चांगल्या जगात चांगल्या रीतीने कसे जगावे हे त्यांनी शिकविले.

संत व्यक्तींकडून विश्वाकडे वळले. किंबहुना त्यांचे काव्य-कार्य असे आहे की, आधी कळस निर्माण व्हावा मग पाया रचण्यात यावा. वरवर पाहता हे विचित्र वाटते. पण ते वास्तव आहे. संतांनी असा चमत्कार करून दाखविला आहे.

## ।। काव्यापेक्षा कार्य ! ।।

ज्ञानदेवांनी उत्तम काव्यरचना केली. नामदेव, तुकारामांनीही केली. एकनाथ-रामदासांची उदंड काव्यसंपदा आहे. पण काव्यापेक्षा त्यांचे कार्य अधिक महत्त्वाचे ठरते.

**हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा ।**
**पुण्याची गणना कोण करी ? ।।**

हा ज्ञानदेवांच्या हरिपाठातील एक उद्‌गार. देवाचे नाव घेत राहावे. नाम आणि ईश्वरस्मरण सहज होत राहिले पाहिजे. पुण्याचे मोजमाप करीत नसतात/करू नये. संतस्वभाव यातून व्यक्त होतो. काव्य त्यांचे एक साधन होते. साध्य ते नव्हते. त्यांचे साध्य होते, विश्वाची सुखशांती, आनंद, अखंड समाधान. संत यासाठी ज्ञानभक्तियोगाबरोबर आपापला उद्योगव्यवसाय करीत राहिले. बसवेश्वरांची धारणा होती : कायकवे कैलास ! मानवी शरीर हेच देवार्चनेचे खरे साधन. ज्ञानदेवांनी म्हटले : स्वकर्मकुसुमांनी देवाची पूजा करावी. नामदेवांचे ब्रीद होते : नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगीं । रामदासांनी आपल्याला मंत्र दिला : 'सामर्थ्य आहे चळवळीचे, परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे !' 'केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे !'



संतांनी केवळ निवृत्ती आपली म्हटली नाही. प्रवृत्ती आणि पुरुषार्थही त्यांना प्रिय असे. म्हणूनच त्यांनी केवळ काव्य करण्यावर किंवा विचार मांडण्यावर भर दिला नाही. कार्य करण्यावर, सेवा करण्याकडे त्यांचा कल असे.

ज्ञानदेवांनी जड भिंत चालविली असे चमत्काराच्या अंगाने म्हणण्यापेक्षा त्यांनी जडमूढ समाजाला जाग आणून त्याला चैतन्य दिले, हे खरे सत्य आहे. चांगदेव वाघावर बसून आले म्हणजे त्यांचा अहंकारच सतत त्यांनी आपल्याबरोबर वाहन म्हणून ठेवला. विसोबा खेचर औंढ्या नागनाथाच्या देवालयात शिवशंकराच्या पिंडीवर पाय ठेऊन झोपले असे नामदेवांना भासले म्हणजे 'देवावीण ठाव रिता नाही' हे परोपरीने पटले, जाणवले. संत नामदेवांसाठी देऊळ देवाने फिरविले, याचा अर्थ नामदेवराय ज्या मागील बाजूला जाऊन भजनगायन करीत बसले, त्याबाजूला बडव्यांसह सारा भक्तभाविक समाज वळला. मग देवमूर्तीही त्या दिशेला करण्यात आली. ज्ञानदेवांनी रेड्याच्या मुखातून वेद वदविले. अर्थात् ज्यांची मती रेड्यासारखी मद्दड त्यांनाही वेदघोषाची आवड उत्पन्न झाली. त्यांचे ठिकाणी ते सामर्थ्य उत्पन्न झाले- असे एक ना दोन, अनेक चमत्कार वैज्ञानिक दृष्टी ठेऊनही उलगडता येतात. तसे करीत राहिले तर संतकार्याचे मर्म अनेकांना अधिक आकळू शकेल.

## ।। उपसंहार ।।

संत चरित्रकार्य ध्यानी घेत राहून आज अनेक रीतीने आत्मोद्धार आणि जनोद्धार साधण्याचा प्रयत्न करायला हवा. ती आजच्या काळाची एक मोठीच आवश्यकता आहे. संतसाहित्यपरिचयाच्या निमित्ताने आपल्याला भारतीय लोकभाषा, लोकसंस्कृती आणि लोकजीवन यांचीही जवळून ओळख घडेल. याहूनही मोठा लाभ म्हणजे संतांच्या सहवासाने आपण विश्वधर्माची खरी ओळख करून घेऊ शकतो. ज्ञानदेवांचे 'पसायदान' हे सर्वश्रुत आहे. सर्वच संतांनी देवापाशी प्रसादाचे मागणे वेळोवेळी मागितले. पण त्यांनी स्वत:साठी केवळ ईश्वरनिष्ठा/देवाची भक्ती करण्याचे समाधानच काय ते मागितले. अन्य सारे त्यांनी इतरांसाठीच मागितले. तेही आपल्या पंथाकरिता, प्रांतासाठी किंवा ज्ञातिसमाजाच्या फायद्याचे म्हणून नव्हे, तर अवघ्या विश्वाच्या कल्याणाच्या उद्दिष्टाने मागितले. तेही पुन्हा विश्वात्मक देवाकडेच त्यांनी मागितले.

**''भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे''** आणि
**''जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात''**

हा संतांचा ध्यास दिसतो. फक्त हे सारे करणारे वा इच्छिणारे सत्प्रवृत्त/ईश्वरनिष्ठ विश्वनागरिक हवेत. असा व्यापक, नैतिक दृष्टिकोन हेच या विश्वधर्माचे खरे बळ होय !

ooo

# दिन विशेष

संकलन : साईचरणकण

## भगवान गौतम बुद्ध



आपल्या मातृभूमीत वैशाख महिन्यात तीन महान पुत्रांचा जन्म झाला. गौतम बुद्ध, शंकराचार्य आणि रामानुजाचार्य. वसंत ऋतु जसा वाळलेल्या वृक्षांना नवसंजीवनी देतो तद्वत या विशाल हृदय-पुत्रांनी आत्म्याला दुःखांपासून मुक्त करून शांतीचा आणि आनंदाचा मार्ग जगाला दाखविला.

सिद्धार्थाचा जन्म वैशाख पौर्णिमेला ख्रिस्तपूर्व ५६० व्या वर्षी नेपाळमधील कपिलवस्तु राजधानीत झाला. येथे यावेळी शाक्य प्रजासत्ताक सत्ता होती. शुद्धोधन राजा कपिलवस्तुमध्ये राज्य करीत होता. कोलीय राज्याच्या अंजन राजाच्या माया आणि प्रजापती या दोन राजकन्यांशी त्याचा विवाह झाला.

एके दिवशी राणी मायावतीने एक स्वप्न पाहिलं. काही दिव्य पुरुष तिला उचलून घेऊन जात होते. एक पांढरा हत्ती तिच्या कुशीत शिरून गायब झाला. राजाने ज्योतिषांना बोलावून स्वप्नाचा उलगडा करवून घेतला. ज्योतिषी म्हणाले, ''घाबरू नका ! तुम्हाला मुलगा होणार !! तो मुलगा जगाचा उद्धार करणार !!! जगद्वंद्य होणार !!!!

काही दिवसांत मायावती गरोदर राहिली. बाळंतपणासाठी माहेरी जाण्यास निघाली. परंतु वाटेतच तिच्या पोटात दुखू लागलं. एका बागेत ती बाळंत झाली. तिला मुलगा झाला. दासींनी तिची सेवाशुश्रूषा केली. तिला राजधानीत परत आणलं.

काही दिवसांनी मुलाचं नाव सिद्धार्थ ठेवण्यात आलं. मायावतीला साधारण ताप येऊ लागला. दिवसेंदिवस ताप वाढत गेला. शेवटी ती मरण पावली. शेवटच्या क्षणी तिने सिद्धार्थला आपली बहीण प्रजापती हिच्या स्वाधीन केलं. शुद्धोधन राजाने सिद्धार्थला अगदी लाडात वाढविले. सर्व प्रकारचं ज्ञान दिलं. दुःखाची साधी सावलीही त्याच्यावर पडू दिली नाही.

एक दिवस सिद्धार्थ बागेत फिरत होता. आकाशात हंस पक्षी स्वच्छंद विहार करीत होते. अचानक एक पक्षी सिद्धार्थच्या पायावर पडला. तो जखमी झाला होता. त्याला बाण लागला होता. सिद्धार्थने हंसाला उचलून घेतले. बाण काढला. त्याच्या जखमेवर पट्टी बांधली. सिद्धार्थचा चुलत भाऊ देवदत्त याने हंसाला बाण मारला होता. सिद्धार्थ आणि देवदत्त यांचा यावरून वादविवाद झाला. देवदत्त म्हणाला, ''हा हंस माझा आहे ! मी त्याला मारलं आहे.'' सिद्धार्थ म्हणाला, ''नाही. हंस माझा आहे ! मी त्याला वाचवलं आहे.'' दोघेही राजाच्या दरबारात आले. देवदत्तने हंसाला बाण मारला होता; आणि सिद्धार्थने वाचविलं होतं. न्याय झाला, मारणाऱ्यापेक्षा वाचविणारा श्रेष्ठ ! या न्यायानुसार सिद्धार्थकडे हंस देण्यात आला. सिद्धार्थने हंसाला आकाशात सोडून दिले.

दुसऱ्या दिवशी सिद्धार्थने गवताच्या पात्यावर एक किडा पाहिला. एक सरडा धावत आला आणि त्याने त्या किड्याला पकडले. थोड्याच वेळात एक सर्प आला आणि सरड्याला त्याने गिळंकृत केलं. इतक्यात, एक घार आकाशात हिंडत होती. लागलीच झेप घेऊन त्या सर्पाला तिनं पकडलं. हा प्रसंग पाहून सिद्धार्थच्या मनाला खोलवर जखम झाली. तो आपल्या मनाला विचारू लागला, ''हे असंच जीवन असतं काय ?''

सिद्धार्थ तासन्-तास बसून विचार करू लागला. त्याची ही अशी अवस्था पाहून राजा शुद्धोधन अधिक काळजी करू लागला. त्याने मार्गदर्शकांना सिद्धार्थबद्दल विचारलं. सिद्धार्थचं लग्न करणं योग्य, असा मार्गदर्शकांनी सल्ला दिला. यशोधरा नावाच्या रुपवती राजकन्येशी सिद्धार्थचा विवाह करण्यात आला. काही वर्षं सिद्धार्थ वैवाहिक जीवनात रमला.

एके दिवशी सिद्धार्थ राजवाड्याबाहेरील जग बघण्यासाठी निघाला. शुद्धोधन राजा सिद्धार्थच्या सहकाऱ्यांना म्हणाला, ''सिद्धार्थच्या नजरेसमोर कोणतीही दुःखद घटना येऊ देऊ नका.'' परंतु दुर्दैव असं की, त्याने एका आजारी माणसाला पाहिलं, हातापायाचे सांधे दुखणाऱ्या, थकलेल्या डोळ्यांच्या एका वृद्ध माणसाला पाहिलं आणि एक प्रेतयात्रा जाताना पाहिली. सिद्धार्थने सोबतीला असलेल्या व्यक्तीला विचारलं,

स्त्रिया हे व्रत त्रयोदशीपासून सुरू करतात.

वट-सावित्री हा सण अनादिकाळापासून आजतागायत साजरा केला जातो. या सणाविषयी एक पौराणिक आख्यायिका प्रचलित आहे.

सत्यवान नावाचा एक तरुण होता. सावित्री त्याची पत्नी होती. सत्यवानाचे आईवडील म्हातारे झाले होते. नेहमीप्रमाणे सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यासाठी गेला होता. सावित्रीही त्याच्यासोबत गेली होती. सत्यवान वडाच्या झाडावर चढून कुऱ्हाडीने लाकडं तोडत होता. सावित्री वडाच्या पायथ्याशी बसली होती.

उन्हाळ्याचे दिवस होते. लाकडं तोडता-तोडता सत्यवानाचा पाय फांदीवरून घसरला. त्याच्या हातातून कुऱ्हाड सुटून एका बाजूला पडली आणि तो दुसऱ्या बाजूला पडला. सावित्रीच्या अगदी समोर सत्यवान पडला. सावित्री पार घाबरली ! काय करावे, हेच तिला सुचेना ! सावित्रीने सत्यवानाला उचलून मांडीवर घेतले. जोरजोराने रडू लागली. सत्यवान बेशुद्ध पडला. सावित्री आपल्या पदराने त्याला हवा घालू लागली. सत्यवानाला शुद्धीवर आणण्याचा आपल्या परीने आटोकाट प्रयत्न करू लागली. सत्यवान घायाळ झाला होता. सावित्री कोणीतरी मदतीला धावून येईल म्हणून जोरजोराने रडू लागली.

सावित्री एक सालस-साध्वी पतीव्रता स्त्री होती. तिने शंकराची आराधना सुरू केली. अचानक यमराजाचे दूत सत्यवानाचे प्राण नेण्यास आले. सावित्री त्यांना पाहात होती. परंतु ती असहाय्य होती. यमदूतांनी सत्यवानाचे प्राण घेऊन स्वर्गाचा रस्ता धरला. एका अदृश्य शक्तीने सावित्रीला यमदूत दाखविले. ती आरडा-ओरडा करीत त्यांच्या मागून जाऊ लागली. यमदूतांना तिने स्वर्गाच्या रस्त्यावर अडविलं. त्यांना विनंती केली, "माझं सौभाग्य मला परत द्या !" यमदूतांनी सावित्रीला समजाविलं. परंतु तिने ऐकलं नाही. आपला पाठलाग सोडवून घेण्यासाठी सावित्रीला अनेक गोष्टी सांगण्यात आल्या. परंतु ती त्यांचा पाठलाग करीत यमलोकी पोहोचली. तिने यमराजाचे पाय पकडले. यमराजाने तिला 'अष्ट पुत्र सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद दिला. परंतु सत्यवान मरण पावला होता. "आपला आशीर्वाद पूर्ण कसा होणार ?" असा सावित्रीने यमराजाला प्रश्न विचारला. नाईलाजाने यमराजाने सत्यवानाचे प्राण परत केले. सावित्री सत्यवानाचे प्राण घेऊन मृत्युलोकी आली. सत्यवानाला उठविलं. सत्यवान जिवंत झाला. सत्यवानाने इकडे-तिकडे पाहिलं. तो सावित्रीच्या मांडीवर पहुडला होता. सावित्रीच्या डोळ्यांतून आसवं गळत होती. त्याला आश्चर्य वाटलं. सावित्रीला रडण्याचं कारण विचारलं. सावित्रीने घडलेली घटना त्याला इत्थंभूत सांगितली. सत्यवानाचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. दोघंही घरी आली. सत्यवानाने आपल्या आई-वडिलांना सर्व हकिगत ऐकविली. सावित्रीमुळे सत्यवानाचा पुनर्जन्म झाला होता. सावित्रीला दोघांनीही आलिंगन दिलं, आशीर्वाद दिला.

ज्या वटवृक्षावरून पडून सत्यवान मरण पावला, जेथून त्याचे प्राण यमराजाचे दूत घेऊन गेले, ज्या ठिकाणी पुन्हा ते प्राण सावित्री परत घेऊन आली आणि सत्यवान जिवंत झाला त्या वटवृक्षाची सावित्रीने विधिपूर्वक पूजा केली. त्या दिवशी उपवास केला. म्हणून या सणाला 'वटपौर्णिमा' किंवा 'वट-सावित्री' म्हणतात.

भारतात घरोघरी सत्यवानावरील सावित्रीचं अपार प्रेम लक्षात घेऊन या दिवशी उपवास करून वटवृक्षाची पूजा करतात.

पहाटे स्नान करून पवित्र वस्त्र परिधान करतात. पवित्र पाण्याच्या घटात वटवृक्षाची फांदी ठेवून पाण्यानं सिंचन करतात. पूजा करतात. प्रत्येक सौभाग्यवती हे व्रत करते. हे व्रत अखंड सौभाग्यासाठी केलं जातं.

काही स्त्रिया वटवृक्षाला पांढऱ्या दोऱ्याचे सात किंवा त्या पटीत फेरे बांधतात. घराचे दरवाजे-भिंती साफ करून त्यावर हळद व चंदनाने वटवृक्षाचे चित्र काढतात. त्रयोदशी ते अमावास्या किंवा पौर्णिमेपर्यंत तीन रात्री तेथे बसून उपवास व पूजा करतात. पूजा संपल्यावर पुष्प, पत्र, वस्त्र, द्रव्य केळीच्या पानातून ब्राह्मणाला दान देतात.

अशाप्रकारे वट-सावित्री व्रत करून अखंड सौभाग्य मागतात. सात जन्मापर्यंत हाच पती मिळू दे, अशी परमेश्वराकडे प्रार्थना करतात.

वट-सावित्री हे व्रत सौभाग्यवती स्त्रियांसाठी महान आहे.

# महाकवी कालिदास

संस्कृत साहित्याला आपल्या प्रतिभाशाली शैलीने स्वतंत्र आणि अनमोल रूप प्रदान करणारा महाकवी म्हणजे कालिदास ! त्याने आपल्या साहित्यात जीवनातील सौंदर्य चित्रित केलं आहे. त्याच्या साहित्याचे विशेष म्हणजे मनुष्याला



आनंदविभोर करणे, उदार, आकर्षक, निःश्चयार्थी आचरण करण्यास प्रवृत्त करणे हे आहेत. त्याच्या साहित्यात चित्रित केलेली व्यक्तीचित्रे हुबेहुब आणि हृदयस्पर्शी आहेत. विस्मय आणि अद्वितीय शब्दशक्ती यांचा अनुपम संगम त्याच्या साहित्यात दिसून येतो. त्याचं साहित्य लोकांना उदात्त जीवनाकडे वाटचाल करण्यास प्रेरित करतं. कालिदासाचे महान ग्रंथ विद्वान आणि सामान्य सर्वांनाच आवडतात.

हा कालिदास कोण ? त्याचा कार्यकाळ आणि कार्यक्षेत्र या प्रश्नांबाबत विद्वानांमध्ये चर्चा झाली. परंतु आजपर्यंत या प्रश्नांची उत्तरं मिळालेली नाहीत, मतभेद मिटलेले नाहीत.

कालिदासाच्या जीवनाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. त्याच्यासंबंधी काही आख्यायिका प्रसिद्ध आहेत. उदाहरण म्हणून एक कथा प्रसिद्ध आहे.

कालिदास हा ब्राह्मणाचा मुलगा होता. तो सहा महिन्याचा असताना आई-वडिलांपासून हरवला. एका गुराख्याने त्याचा सांभाळ केला. त्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारचं शिक्षण मिळालं नाही.

काशी येथे भीमशुक्ल राजा राज्य करीत होता. त्याच्या दरबारी वररुची नावाचा विद्वान होता. राजकन्येचा विवाह वररुचीशी लावून देण्याचा राजाचा विचार होता. ''वररुचीपेक्षा मी हुशार आहे,'' असं सांगून राजकन्येने त्याच्याशी लग्नास नकार दिला. वररुचीला राग आला. त्याने याचं उट्टं काढण्याचं ठरविलं

एक दिवस राजाचा मंत्री जंगलात गेला होता. त्याला कालिदास जंगलात दिसला. तो झाडाची एक फांदी कुऱ्हाडीने तोडीत होता. जी फांदी तोडीत होता त्याच फांदीवर तो बसला होता. हा मुलगा मूर्ख दिसतो. राजकन्येचा अहंकार जिरवायला हाच वर तिला अनुरूप आहे. त्याला मंत्र्याने घरी आणले. मुलगा दिसायला देखणा होता. त्याला किंमती भारी वस्त्र परिधान करण्यात आली. वररुचीला सांगून त्याला थोडसं ज्ञान देण्यात आलं. कोणताही प्रश्न कोणीही विचारल्यास ''ॐ स्वस्ति'' असं उत्तर देण्यास सांगण्यात आलं. राजकन्येच्या मनातही त्याच्याबद्दल प्रेम, विश्वास निर्माण झाला.

वासंतीचं लग्न कालिदासाबरोबर झालं. काही दिवसांत वासंतीला समजलं, आपला नवरा मूर्ख आहे. तिला फार दुःख झालं, पश्चाताप झाला. परंतु तिने धीर सोडला नाही. ती कालिमातेची भक्ती करायची. कालिदासालाही कालिमातेची भक्ती करण्यास तिने सांगितलं. परंतु कालिमाता प्रसन्न होण्याचं काही चिन्ह दिसेना. तेव्हा कालिदासाने प्रतिज्ञा केली, ''हे देवी ! जर तुझा आशीर्वाद मिळाला नाही, तर मी आत्महत्या करीन.'' कालिमाता प्रसन्न झाली. तिने कालिदासाला वाग्वैभव प्रदान केलं. हाच युवक 'महाकवी कालिदास' म्हणून प्रख्यात झाला.

कालिदास संपूर्ण भारतात फिरला. याचं वर्णन आपल्याला त्याच्या साहित्यात आढळतं. कालिदासाच्या 'मेघदूत' या खंडकाव्यात मध्यप्रदेशमधील रामगिरीपासून ते हिमालयातील अलकानगरीपर्यंतचे पर्वत, नद्या, शहरं, गावं यांचं वर्णन आहे. दुसऱ्या महाकाव्यात रघुवंशातील सम्राट रघुच्या दिग्विजयाचे वर्णन करताना कालिदासाने लोकांचं निवासस्थान, राहणीमान, संस्कृती, खाण्या-पिण्याच्या सवयी, व्यापार, उद्योगधंदा यांचं वर्णन केलं आहे. विविध नद्या आणि पर्वतांचाही उल्लेख आहे. हे वर्णन करताना त्याने आसाम, बंगाल, उत्कल (पूर्व), पाण्ड्य, केरळ (दक्षिण), सिंध, गांधार आणि उत्तर व पश्चिम भारत असा संपूर्ण भारत आपल्या नजरेसमोर ठेवला आहे.

महाकवीला आवश्यक असणारी स्वतंत्र प्रतिभा कालिदासला प्राप्त झाली होती. तो विद्वान होता. त्याच्या काव्यातून काव्यात्मवृत्ती आणि विद्वत्ता प्रकट झालेली आहे. जीवनातील सौंदर्य, आदर्श, उद्देश त्याच्या साहित्यात दिसून येतात. राजमहालातील ऐषारामी जीवन, तर आश्रमातील शांत व साधं जीवन त्याच्या साहित्यात आहे. त्याच्या साहित्यात वैवाहिक जीवनातील सुखाचे क्षण, तर विरह जीवनातील वियोग-व्यथांचे क्षण आहेत. गंभीर घटना, आनंद, विनोद यांचंही वर्णन त्याच्या साहित्यात आहे.

कालिदास याने सात ग्रंथ लिहिले. यापैकी 'कुमारसंभवम्' आणि 'रघुवंशम्' ही महाकाव्ये आहेत. 'मालविकाग्नीमित्रम्' आणि 'विक्रमोर्वशीयम्', 'अभिज्ञान शाकुंतलम्' ही त्याची प्रसिद्ध नाटकं आहेत. 'मेघदूतम' आणि 'ऋतुसंहारम्' ही त्याची खंडकाव्ये आहेत.

○○○

# अभिप्राय




## 'पुनर्विकास प्रकल्प' मन लावून वाचला. अभिनंदन !

श्री साईलीलाचा 'रामनवमी विशेषांक' हातात पडल्यावर त्यातील 'समाधी मंदीर पुनर्विकास प्रकल्प' मन लावून वाचला. आजवर प्रत्येक भेटीत, साई मंदिरात ज्या सुधारणा व्हाव्या असे मनात येई त्याहूनही कितीतरी जास्त सुखसोई आपल्या या प्रकल्पात वाचून फारफार समाधान झाले व हा भगवान साईनाथांचाच संकल्प आपल्याद्वारे पार पडत आहे म्हणून अधिक आनंद झाला.

आपले व विश्वस्त मंडळाचे खास अभिनंदन करायचे व आभार मानायचे ते अशासाठी की एवढा मोठा प्रचंड प्रकल्प आपण 'लार्सन अँड टुब्रो' या जगत् विख्यात कंपनीस दिलेला आहे. या कंपनीची धडाडी व कामाचा सपाटा आम्ही अगदी जवळून आज कितीतरी वर्षे पद्मपूर्ती येथे सातत्याने पाहात आहोत. पृथ्वीतलावर नंदनवन करण्याची किमया केवळ याच कंपनीत आहे. जेथे रानमालाशिवाय काहीही नव्हते अशा ठिकाणी हां हां म्हणता टोलेजंग इमारती व प्रासाद या कंपनीने निर्माण केले व कित्येक कामे, वेळेच्या अगोदर पुरी केली म्हणून त्या कंपनीला आम्हा सर्वांच्या मनात मानाचे स्थान आहे. या कंपनीची शिरडीतल्या मोठ्या प्रकल्पासाठी निवड झाली हाही श्री साईनाथांच्या कृपाशीर्वादाचाच भाग आहे. ही माझी मनोभावना आहे. शिरडीत गेल्यावर समाधी मंदीरसमोरील नेहमी पाहिलेली मोठी जागा भक्तांची बसायची दिसली नाही. त्या जागी एक मोठे तळघरासारखे नवे बांधकाम दिसले. ते पाहून आपण हा प्रकल्प किती त्वरेने मार्गस्थ करीत आहात ते कळले. या सगळ्या कामासाठी पुनश्च एकवार आपले व आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार व अभिनंदन.

– ले. कर्नल. प्र. का. सोमण (निवृत्त), पुणे.

## भरपूर ज्ञान प्राप्ती

साईलीला म्हणजे ज्ञानाचा खजिना. आपणाकडे कितीही संपत्ती असली तरी त्यापासून आपणास ज्ञानाची प्राप्ती होत नाही, परंतु आपणाकडे येणारे साईलीला म्हणजे ज्ञानाचा अथांग सागर आहे. साईलीलामधील विविध रुपातील साईंचे चित्र पाहिले म्हणजे प्रत्यक्ष साई दर्शन घडल्याचा आनंद लाभतो असेच साईंचे दर्शन घडावे अशी साई चरणी प्रार्थना.

– उत्तर धारवाडकर, हडपसर, पुणे

## सर्वच लेख वाचनिय

श्रीसाईलीला जानेवारी फेब्रुवारी १९९८ अंक वेळेवर प्राप्त झाला. सदर अंकातील श्रीसाईबाबांचे आध्यात्मिक दर्शन, संसाराची साल, भक्तीचे महात्म्य, नामाच्या संगती हे अंक वैचारिक ज्ञानात भर घालणारे होते. आम्ही फक्त देण्यासाठी जगतो... ही बोधकथा मनाला चटका लावून गेली. गंगासागर महात्म्यमुळे नवीन तिर्थयात्रेचे ज्ञान झाले. सौराष्ट्रीचा सोमनाथाची कथा (आख्यायिका) दिली असती तर अधिक चांगले झाले असते. अवतारी संत शेगावचे गजानन महाराज लेख आवडला.

अंकातील सर्वच लेख तथा कविता वाचनीय व संग्रही ठेवण्यासारख्या आहेत.

## 'ज्ञानभंडार अंक'

'श्री साईलीला'चा जानेवारी-फेब्रुवारी १९९८ चा अतिउत्कृष्ट असा अंक मिळाला. अंक वाचून मनाचे समाधान झाले. विशेषत: प्राचार्य कुलकर्णी यांचा 'बाबांचे आध्यात्मिक दर्शन' हा लेख पूर्णपणे मनाला समाधान देऊन गेला. कारण आध्यात्मिक प्रगतीसाठी मनाची स्थिरता कशी असावी हे या लेखातून पूर्ण मनाला पटून येते. तसेच श्रीसाईलीलातील विविध लेख म्हणजे मनाचे शुद्धीकरण. श्रीसाईलीलाची प्रगती दिवसें-दिवस वाढत जावो, ही श्रीसाईचरणी विनम्र प्रार्थना.

– एस. जे. गुडेकर, गोवा.

## मन:पूर्वक अभिनंदन

प्रथमत: आपले व विश्वस्त मंडळाचे मनपूर्वक अभिनंदन कारण अंक वेळेवर काढून वेळेवर प्रसिद्ध करत आहात म्हणून.

जानेवारी-फेब्रुवारी १९९८ च्या अंकावरचे श्रींचे समाधीमंदिरातील चित्राचे मुखपृष्ठ खूप छान आहे व ते आवडले. अंक पाहताच शिरडीला समाधीमंदिरात आहोत असा काही मिनिटे भास झाला, तसेच बाबांची महती सांगणारे सर्वच लेख वाचनिय आहेत व श्री गजानन महाराजांच्या बाबतची माहितीसुद्धा वाचनीय आहे. तसेच आपण गंगासागर यात्रेचे महात्म्याची माहिती अंकात दिल्याबद्दल व अंकाची सजावटीबद्दल आपले मी व सर्व साईभक्तातर्फे आपले अभिनंदन करतो.

– सुरेश अंबोकर,
साईभक्त मंडळ सदस्य,
वरळी.

## मुखपृष्ठ विलोभनीय

'श्री साईलीला'चा मार्च-एप्रिल १९९८ चा 'रामनवमी' विशेषांक मिळाला. अनेक अनेक धन्यवाद. अंक खूपच छान आहे-त्यातून भक्ती (भाग २) हा श्री. वसंतराव दळवी यांचा लेख खूपच आवडला. तसेच मुखपृष्ठ अत्यंत विलोभनीय आहे. श्री प्रभुरामचंद्राचा लॅमिनेशनचा फोटो अत्यंत सुंदर वाटला. आपल्या या अंकातील आवाहनाप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर आठ (८) वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून प्रत्येक ५० रु. प्रमाणे (एकूण चारशे फक्त) सोबत रोख पाठवीत आहे. त्याचा कृपया स्वीकार व्हावा.

– नारायण शंकर जोशी, सोलापूर.

## प्रभू श्रीसाई-गजानन

'श्री साईलीला'चा मी वार्षिक वर्गणीदार आहे. श्री साईलीला मला खूपच आवडते. मुखपृष्ठ, अक्षर-रचना, लेख-दर्जा, सुबकता आणि भक्तीरसपूर्णता: ह्या सर्वच अंगांनी व अर्थांनी श्रीसाईलीलाचा प्रत्येक अंक उत्कृष्ट असतो. आपण अंकात देत असलेल्या छायाचित्रामुळे प्रत्यक्ष शिरडीत असल्यासारखे वाटते. आजपर्यंतच्या सर्वच उत्कृष्ट अंकांसाठी आपले मन:पूर्वक अभिनंदन! आगामी अंकांना शुभेच्या.

– विनय भिरासे, यवतमाळ.

श्री साईलीला अंक (जाने-फेब्रु) साईबाबांचे अध्यात्मिक दर्शन, गंगासागर यात्रेचे महात्म्य, भक्तीचे महात्म्य, पुण्यस्मरण आदी महान महात्म्य घेऊन वेळेवर येऊन मिळाला.

आपण अतिशय परीश्रमपूर्वक विशेषांक प्रसिद्ध करता. आपल्या हातून घडत असलेला हा साईसेवेचा गुरुमंत्र आम्हा सर्वांनाच मार्गदर्शक ठरो ही साई चरणी प्रार्थना.

विजय राजनकर, बुलडाणा

## AN APPEAL TO THE MEMBERS OF THE SAI BHAKTA MANDAL AND THEIR RELATIVES

We observed and deeply regret to state that, in the post, several members of the Sai Bhakta Mandal of Shri Sai Baba Sansthan, Shirdi, have left for their heavenly abode. However, the information has not reached the Sansthan. Now, the Sansthan is in the process of updating the list of the members of the Sai Bhakta Mandal. We appeal to the existing members to confirm their details as per the Sansthan's present records.

We also appeal to the relatives of the members, who are no longer in this world.

**Executive Officer,**
Shri Sai Baba Sansthan, Shirdi, At & Post Shirdi - 423 109,
Tal. Kopargaon, Dist. Ahmednagar, Maharashatra State.

## સાઈભકત મંડલના સદસ્ય અને તેમના રિશ્તેદારો માટે અપીલ

દુ:ખની વાત છે કે ઘણાં સાંઈ ભકતો/સંસ્થાનના સાઈભક્ત મંડલના સભાસદો આપણી વચ્ચે રહ્યાં નથી. પરંતુ સંસ્થાનને જાણકારી ન હોવાથી સભાસદોની સુચીમાં સુધારા થઈ શક્યા નથી. હાલમાં સભાસદોની નવી સુચી તૈયાર કરવાનું કામ ચાલુ છે. હાલના સભાસદો ને વિનંતી છે કે તેમના નામ તથા સરનામા માં ફેરફાર હોય તો નીચે જણાવેલ સરનામા પર પત્ર મોકલી સંસ્થાન ને પોતાની યોગ્ય માહીતી મોકલે. તે જ પ્રમાણે જે સભાસદો આપણી વચ્ચે રહ્યા નથી તેમના રીશ્તેદારોને પણ વીનંતી છે કે એવા સભાસદો અંગેની માહીતી નીચે જણાવેલ સ્થળે મોકલી આભારી કરશોજી.

કાર્યકારી અધિકારી,
શ્રી સાઈબાબા સંસ્થાન, શિરડી, મુ. પો. શિરડી – ૪૨૩ ૧૦૯,
તા. કોપરગાંવ, જિ. અહમદનગર, મહારાષ્ટ્ર રાજ્ય.

## साईभक्त मंडळाच्या सदस्य आणि त्यांच्या नातेवाईकांना आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या श्री साईभक्त मंडळाच्या सर्व सभासदांना व गेल्या काही वर्षांत स्वर्गवासी झालेल्या सभासदांच्या नातेवाईकांना, या आवाहनाद्वारे कळविण्यात येते की, श्री साईभक्त मंडळाच्या सभासदांची यादी अद्ययावत करण्यात येत असून ज्या साईभक्तांना त्यांच्या नावात व निवासस्थानात दुरुस्ती सुचवायची असेल त्यांनी आणि स्वर्गवासी झालेल्या सभासदांच्या नातेवाईकांनी स्वर्गवासी झालेल्या भक्ताचे नाव व निवासस्थान याविषयी, पुढील ठिकाणी त्वरेने कळविणे.

**कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मु. पो. शिरडी - ४२३ १०९,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र राज्य.

## साईभक्त मंडल के सदस्य और उनके रिश्तेदारों से अपील

यह दुःख की बात है कि श्री साईंबाबा संस्थान, शिरडी के साईंभक्त मंडल के कुछ सदस्य अब हमारे बीच में नहीं है। लेकिन जानकारी प्राप्त न होने के कारण ऐसे साईभक्त सदस्यों के नाम साईभक्त मंडल सदस्य सूचि में सम्मिलित हैं। साईभक्त मंडल के सदस्यों की अद्यतन सूचि बनाने का काम शुरू है। विद्यमान सदस्यों से बिनती है कि संस्थान के पास उपलब्ध उनकी जानकारी में वे कुछ बदल या सुझाव चाहते हैं, तो वे निम्न पते पर लिख भेजे। परलोकवासी साईभक्त सदस्यों के रिश्तेदारों से भी बिनती है कि वे परलोकवासी साईभक्तों के बारे में संस्थान के निम्न पते पर लिख भेजें।

**कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मु. पो. शिरडी - ४२३ १०९,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र राज्य.


# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ

**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. मोहन मो. जयकर** | **(सदस्य)** | **श्री. रायभान ग. चिने** | **(सदस्य)** |
| **श्री. रमेश दा. सोनी** | '' | **श्री. भास्कर शं. बोरावके** | '' |
| **श्रीमती रेखा ग. दिघे** | '' | **श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील** | '' |
| **श्री. प्रकाश व. कारखानीस** | '' | **श्री. राजीव पुं. रोहोम** | '' |
| **श्री. मुकेश र. पटेल** | '' | **श्री. संभाजी कि. काळे** | '' |
| **श्री. मधुकर द. जोशी** | '' | **श्री. अशोक भि. खांबेकर** | '' |
| **श्री. प्रकाश प्र. वैशंपायन** | '' | **सौ. प्रेमाबाई सो. बज** | '' |
| **श्री. मधुकर ज. गर्दे पाटील** | '' | **श्री. रामचंद्र नि. गोसावी** | '' |
| **श्री. देवकीनंदन शं. सारस्वत** | '' | **श्री. प्रभाकर तु. बोरावके** | '' |
| **श्री. आप्पासाहेब खं. कोते** | '' | **श्री. सोपान मा. धोर्डे** | '' |

# रामनवमी उत्सव



रामनवमीचे कीर्तन



गोपालकाला कीर्तनात अशी रंगली फुगडी



साईनगरात 'ऑल दि बेस्ट' नाटकातील एक प्रसंग



उत्सवातील कार्यक्रमांचा रसिकतेने
आस्वाद घेताना तल्लीन साईभक्त



साईनगरात कार्यक्रम सादर करताना
गायक नितीन मुकेश व संगीतकार लक्ष्मीकांत



श्री बाबा महाराज सातारकर यांचे सत्संग प्रवचन

फोटो : नितीन भिसणे, शिर्डी.

Registered with the Registrar of News-papers for India No. MH/527

# उपराष्ट्रपती व लोकसभा अध्यक्ष यांची शिरडी भेट



उपराष्ट्रपती श्री. कृष्णकांत, त्यांच्या परिवारासह



लोकसभेचे अध्यक्ष श्री. बालयोगी, त्यांच्या परिवारासह

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक जुलै-ऑगस्ट, १९९८




# श्री साईलीला

## (गुरुपौर्णिमा विशेषांक)

रु. ८

ादक : द. म. सुकथनकर
कारी संपादक : विद्याधर ताठे



कृपा करी सद्गुरु साई ।
मजला ठाव द्यावा पायी ॥